
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक


# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल २०१२ | किंमत १५ रुपये













ती गेली तेव्हा रिमझिम, पाऊस निनादत होता

घर थकलेले संन्यासी, हळू हळू भिंतही खचते.

वाऱ्याने हलते
रान,
तुझे सुनसान
हृदय गहिवरले.

## ग्रेस




दिल्ली वर्ल्ड बुक फेअर २०१२ मध्ये ५० नवीन इंग्रजी टायटलसह
'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने प्रथमच सहभाग घेतला होता.
त्याला वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ एप्रिल २०१२ ◆ वर्ष बारावे ◆ अंक चौथा

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | १० |
| पुरस्कार | ४० |
| पुस्तक परिचय | ५२ |
| अभिप्राय | ८० |
| ओळख लेखकांची | ८८ |
| श्रद्धांजली | १०२ |
| वाचकांचा प्रतिसाद | १०४ |
| बालनगरी | १०६ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
अश्विनी कुलकर्णी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
E-mail : info@mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

***या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.***

## संपादकीय

# अनुवादाची नवी साधने

नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अकादमी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, वगैरे संस्थांतर्फे विविध भाषांतील साहित्याचे अनुवाद प्रकाशित करण्याचा उपक्रम गेली ५०-६० वर्षे सुरू आहे. सानेगुरुजींनी आंतरभारतीची संकल्पना मांडून वेगवेगळ्या भारतीय भाषांतील पुस्तकांच्या भाषांतर-रूपांतराला चालना दिली. देशातील अनेकविध प्रकाशनसंस्था, वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांनीही भारतीय साहित्याचे अनुवाद प्रसिद्ध केले. इंग्रजीतून मराठी, हिंदी, बंगाली, गुजराथी. कानडी, तमिळ वगैरे भाषांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनुवाद होत राहिले. भारतीय भाषांतील अनुवाद हे हिंदीच्या माध्यमातून अधिक प्रमाणात झाल्याचेही आढळून येते. द्विभाषात्मक शब्दकोशही खाजगी प्रयत्नातून तयार होत राहिले. परंतु एकूण ग्रंथव्यवहारच मर्यादित असल्याने अनुवादाचे क्षेत्रही सीमितच राहिले. त्यातच निखळ साहित्यापेक्षा विद्यापीठीय अभ्यासक्रमांशी संबंधित पुस्तकांचे अनुवाद अग्रक्रमाने होत गेले. परंतु उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी हेच राहिल्याने भारतातील प्रादेशिक भाषांच्या भाग्यात ज्ञानभाषा बनण्याची संधी दुर्मिळच ठरली. इंग्रज देश सोडून गेले पण इंग्रजीचे आपल्या व्यवहारावरचे वर्चस्व वाढतच राहिले. हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळाली नाही आणि घटनेने अधिकृत भाषा म्हणून मान्य केलेल्या अनेक भाषांची यादी तयार झाली. या भाषांपैकी काही भाषांमध्ये फारशी पुस्तके लिहिली वा प्रकाशित केली जात नाहीत; तर हिंदी, बंगाली, मराठी, उर्दू, तमिळ, मल्याळी वगैरे मोजक्या भाषांमध्ये ग्रंथव्यवहार मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून येते. त्या भाषांमध्ये ज्ञानकोश,

शब्दकोश यांचीही निर्मिती चालू आहे. ग्रंथालयांची संख्याही लक्षणीय आहे. अनुवादित पुस्तकांमध्ये इंग्रजीतून त्या त्या भाषेत येणाऱ्या पुस्तकांची संख्या जास्त असून, बेस्टसेलर लेखकांचे वर्चस्व दिसते. वाचक रंजनासाठी पुस्तके घेतात. वाचतात. इंग्रजी वाचता येते पण इंग्रजी पुस्तके समजणे अवघड जाते. ती अनुवादित होऊन आपल्या भाषेत वाचायला मिळाली तर वाचणे, समजणे सुकर ठरते. त्यामुळे सध्या इंग्रजीत गाजलेल्या अमेरिकन - युरोपियन पुस्तकांच्या अनुवादाला चांगली मागणी आहे. ॲकॅडमिक पुस्तकांच्या अनुवादाची प्रक्रिया खाजगी प्रकाशन संस्थांना त्या मानाने परवडत नाही; त्यासाठी शासकीय आर्थिक मदतीची गरज असते. नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अकादमी वगैरे संस्था शासकीय मदतीवरच चालू शकतात. पण त्यांच्याही कामाला मर्यादा आहेत. आपल्या अपेक्षांची पूर्तता त्या करू शकत नाहीत.

२२ घटनामान्य भाषांमध्ये साहित्य प्रकाशित करणे हे काम सोपे नाही. जगातील कुठल्याही देशात इतक्या वेगवेगळ्या भाषांमध्ये पुस्तके निघत नाहीत.

त्यासाठी केंद्र सरकारने नॅशनल ट्रॅन्सलेशन मिशन ही संस्था सुरू केली आहे. सहा वर्षांच्या परिश्रमानंतर या संस्थेने ७ शब्दकोशांचे प्रकाशन करून आपल्या अस्तित्वाची झलक दाखवली आहे. सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ इंडियन लँग्वेजेस, म्हैसूर आणि रिजनल इन्स्टिट्युट ऑफ साऊथ इंडिया या दोन संस्थांचे सहकार्य घेऊन नॅशनल ट्रान्सलेशन मिशनचे इंग्लिश-हिंदी, इंग्लिश-मल्याळी, इंग्लिश-बंगाली, इंग्लिश-ओरिया, इंग्लिश-कन्नड, इंग्लिश-तमिळ हे सहा द्विभाषिक शब्दकोश आणि इंग्लिश-कन्नड, तमिळ, मल्याळम, तेलगू हा बहुभाषिक कोश असे सात शब्दकोश प्रकाशित केले आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सहा दशकात एवढे काम होणे ही फारशी अभिमानाची बाब म्हणता येणार नाही. विशेषत: इंटरनेट, ऑनलाइन अनुवाद प्रणाली, यांत्रिक अनुवाद प्रक्रिया, ऑनलाइन डिक्शनरी, स्पेल चेक वगैरे सोई उपलब्ध असताना अशा शब्दकोशांच्या निर्मितीचे काम हे प्राथमिक पायाभूत पातळीवरचे म्हणून पाठ थोपटून घेण्याएवढे मानायचे का? विकिपीडियावर आठ वर्षात दोन कोटी लेख वा नोंदी होतात. गुगल लक्षावधी पुस्तके ऑनलाइन उपलब्ध करून देते, ॲपल ई-टेक्स्टबुक द्वारे इंटरॲक्टिव्ह

टेक्स्ट विद्यार्थ्यांना पुरवते. या तुलनेत नॅ. ट्रॅ. मिशनचे काम कालबाह्य वाटण्याची शक्यता जास्त आहे.

या नॅशनल ट्रॅन्सलेशन मिशनने विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाला उपयुक्त अशा २००० पाठ्यपुस्तकांचे भारतीय भाषांत अनुवाद करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्पही हातात घेतला आहे. एकूण ६९ विद्याशाखांपैकी फक्त २१ ज्ञानशाखांमधील पुस्तकांचीच निवड प्रारंभिक टप्प्यासाठी केली आहे. बोडो, कोकणी वगैरे भाषांमध्ये या पुस्तकांचे अनुवाद करणे कितपत व्यावहारिक ठरेल याचाही विचार करणे क्रमप्राप्त आहे. हजारो-लाखो विद्यार्थी ज्या भाषेत परीक्षा देतात, त्याच भाषांमध्ये अशा विद्यापीठीय पुस्तकांचे अनुवाद निघाले तर आर्थिक दृष्ट्या ते योग्य ठरेल. एरव्ही ती उधळपट्टी ठरेल.


'एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या यापुढे छापील प्रती निघणार नाहीत. डिजिटल स्वरूपातच तो पाहता येईल. ऑक्सफर्ड डिक्शनरीही पुढच्या काळात डिजिटल अवतारातच दिसेल. तेव्हा भारत सरकारने अशा प्रकारचे प्रकल्प राबवताना सद्य:कालीन तंत्रज्ञानाचा वापर करणेच श्रेयस्कर ठरेल.

अनुवादकांचीही फार मोठी गरज लागेल. अनुवाद उद्योग हा पुढच्या काळात मोठा उद्योग ठरणार आहे. ज्ञानाची कवाडे उघडणारा, विज्ञान लोकाभिमुख करणारा हा उद्योग चांगली कमाईही करून देईल.

परंतु इंटरनेटवर आता मेकॅनिकल ट्रॅन्सलेशनची ॲप्लिकेशन्स उपलब्ध होत आहेत. त्यामुळे कॉंप्लेक्स मजकूरही भाषांतरीत करणे शक्य होणार आहे. मोबाइलद्वारे इंटरनेटचा प्रसार झपाट्याने वाढत जाणार आहे. त्यामुळे भाषांतर प्रक्रिया ही सुलभ होईल. कालबाह्य पद्धतीला कवटाळून सरकारी पैसा उधळण्याची गरज आहे का याचीही चर्चा व्हायला हवी.

अनुवादाची नवी साधने आत्मसात करण्यातच आपले हित आहे. नवी पिढी त्यासाठी सक्षम आहे. संगणकीय सॉफ्टवेअरद्वारे अनुवाद कार्य करणाऱ्यांना मोठी मागणी राहणार आहे. ललित आणि ललितेतर सर्वच मजकूर उत्तम प्रकारे आता वेगवेगळ्या भाषांत मिळू शकेल. ❐

## टी बुक क्लब २१ मधील तीसरे आगामी पुस्तक




# झॅपड्

मॅनहॅटनच्या ब्लॅकआउटमध्ये
घडलेली रहस्यकथा

**कॅरोल हिगिन्स क्लार्क**
अनुवाद **जयंत गुणे**

लोकप्रिय अमेरिकन लेखिका कॅरोल हिगिन्स क्लार्क हिच्या रेगन रैली मालिकेतील 'झॅप्ड' ही एक उत्कंठावर्धक रहस्यकथा. लॉरेन लिली ही हॉलीवूडमध्ये पदार्पण करू पाहणारी एक नटी. न्यूयॉर्कच्या जे.एफ.के विमानतळावरून टॅक्सीतून मॅनहॅटनमधल्या तिच्या घरी परत येत असताना वाटेतच तिचा धनाढ्य नवरा फोन करून घटस्फोटाची नोटीस देत असल्याचे तिला सांगतो. तेवढ्यात न्यूयॉर्क शहराचा वीज पुरवठा खंडीत होतो आणि संपूर्ण शहर काळोखात बुडून जाते.

या काळोखात अनेक गोष्टी होत असतात. एका छोट्या जागेत 'स्टँड अप कॉमेडीचा शो' बघण्यासाठी वीकएन्डच्या निमित्ताने गर्दी झालेली असते. दोन व्यक्ती लॉरेनच्या घराचे कुलूप तोडण्याच्या खटपटीत असतात. एका निष्पाप तरुणाला आपल्या जाळ्यात फसवून जन्माची अद्दल घडवण्याच्या उद्देशाने एक तरुणी त्याच्या मागे हात धुवून लागलेली असते. सगळी तरुणाई नाक्यावरच्या बारमध्ये जमा होते. घरात बसून अंधारात दुसरे काहीच करण्यासारखे नसल्याने लोक चौकाचौकात जमून 'बार्बेक्यू पार्टी' करत धमाल करत असतात.

ब्लॅकआउटच्या रात्री वरवर वेगवेगळ्या वाटणाऱ्या या घटनांची सांगड घालत लेखिकेने मोठ्या कौशल्याने एका उत्कंठावर्धक कथानकाची गुंफण केली आहे. कथानक न्यूयॉर्कच्या मॅनहॅटन या भागात घडते. जेथे दिवे दिवसासुद्धा चालू असतात त्या मॅनहॅटनवर आता अंधाराचे साम्राज्य पसरलेले असते. रात्र सरत जाते तसा गुंता सुटत जातो आणि हडसन नदीवर सूर्याचे प्रथम किरण पडता-पडता सर्व काही आलबेल होते आणि वाचक सुटकेचा नि:श्वास टाकतो.

एका रात्रीत घडणारे हे कथानक वाचून होईपर्यंत हातातून खाली ठेववत नाही. कथेच्या ओघात लेखिकेने न्यूयॉर्क शहराचे, तेथील तरुणाईचे सुंदर वर्णन केले आहे. वाचकही मार्गारीटाचा आस्वाद घेता-घेता 'स्टँड अप' कॉमेडीचा एखादा शो बघण्यासाठी न्यूयॉर्कला जाण्याच्या मोहात पडतात.

आगामी




# इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझन्टेशन स्किल्स

**डॉ. अरुणा कौलगुड**

इंटरव्ह्यू म्हटले की इंग्रजीतून बोलणे, टाय लावणे, कडक शेकहँड करणे, अशा गोष्टींनाच अनावश्यक महत्त्व दिले जाते. इंग्रजी माध्यमाच्या शाळा-कॉलेजांत शिकलेली मुले जे काही इंग्रजी बोलतात, त्यामुळे लहान शहरांतील, गावांतील मुले-मुली भारावून जातात. आपल्याला इंग्रजी बोलता येत नाही याचा न्यूनगंड त्यांच्या मनात तयार होतो....

नोकरीसाठी अर्ज कसा लिहायचा, स्पर्धा परीक्षेसाठी ग्रुप डिस्कशनची तयारी कशी करायची या सर्व गोष्टींबद्दल त्यांच्यामध्ये अनभिज्ञता असते; त्यामुळे अनेकदा ते आपली माहिती प्रभावीपणे मांडू शकत नाहीत.

म्हणूनच हे पुस्तक महाराष्ट्रातल्या सर्व लहान-मोठ्या गावांमध्ये, शहरांमध्ये राहणाऱ्या; स्पर्धा परीक्षांची, इंटरव्ह्यूची तयारी करत असलेल्या मुला-मुलींसाठी तयार केले आहे. इंटरव्ह्यू देताना विविध प्रश्नांची उत्तरं कशी द्यायची, इंटरव्ह्यूच्या वेळी पाळायचे शिष्टाचार आणि आवश्यक देहबोली (Body Language) या बद्दलची सविस्तर माहिती या पुस्तकात देण्यात आलेली आहे.

**नवे कोरे**

# TATA

## एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती




मूळ लेखक **मॉर्गन विट्झेल**
प्रस्तावना **राम चरण**
अनुवाद **विदुला टोकेकर**

२२०रु. पोस्टेज ३०रु.

टाटा ब्रँड म्हणजे आहे तरी काय?
काय आहेत त्याची मूल्य?
जगातील आणि भारतातील लोकांना
त्यातून काय समजत?
या रंजक आणि माहितीपूर्ण पुस्तकात
मार्गन विट्झेल टाटांच्या हृदयाचा
ठाव घेतात, त्याचे मूळ समजावून सांगतात,
टाटांचं नाव आणि प्रतिमा कशी
निर्माण होत गेली आणि
या प्रतिमेचं रुपांतर एका बलवान
आणि मौल्यवान ब्रँडमध्ये
करण्यासाठी या उद्योगसमूहाने
काय केलं याचं वर्णन करतात.




*** 'दहाव्या रांगेतून...नाट्यप्रेक्षकांच्या भावना'**

व.पु. काळे यांनी आपल्या 'पार्टनर'वर अर्थात वसुंधरा काळे यांच्यावर लिहिलेल्या कवितांचे कलावंतांनी केलेले सादरीकरण... वसुंधरा बाईंनी अनेक नाटकांवर लिहिलेल्या समीक्षणाची वेगवेगळ्या वक्त्यांनी घेतलेली दखल, जुन्या नाटकांचा व नाट्यविषयक आठवणींना मिळालेला उजाळा... अशा वातावरणात 'दहाव्या रांगेतून' या पुस्तकाचे प्रकाशन २५ मार्च रोजी झाले. 'हे पुस्तक म्हणजे नाट्यप्रेक्षकांच्या भावना आहेत', असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

अतुल थिएटर्सतर्फे आयोजित समारंभात वसुंधराबाईंच्या या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते झाले. यावेळी कवी सुधीर मोघे, नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे, सुनील मेहता उपस्थित होते. प्रेक्षक म्हणून वेगवेगळ्या नाटकांवर स्वत:ला काय वाटते ते या पुस्तकात वसुंधराबाईंनी मांडले आहे. या संदर्भात अभिनेत्री लालन सारंग, अभिनेते श्रीकांत मोघे यांनी ध्वनीफितीच्या माध्यमातून अनेक आठवणींना उजाळा दिला.

डॉ. देशपांडे म्हणाल्या, ''हे पुस्तक म्हणजे नाटकांचे नुसतेच गुणगान नाही. आवश्यक तेथे नाव घेऊन त्या त्या कलावंताचे दोषही या पुस्तकात मांडले आहेत. त्यामुळे या पुस्तकाला वेगळे महत्त्व आहे.''

*** ज्ञानेश्वरी, गीतारहस्य चिनी भाषेत**

चीनसमवेत सौहार्दपूर्ण संबंध जोपासण्यासाठी ब्रीजिंग नेशन्स या केंद्राची नुकतीच पुण्यात स्थापना करण्यात आली. या भारत-चीन केंद्राचे संचालक डॉ. अरविंद येलेरी म्हणाले, 'ग्रंथसंपदा, संतांचे लिखाण भेट म्हणून देण्याची परंपरा चीनमध्ये जोपासली गेली आहे. भारतीयांकडून ज्ञानेश्वरी व गीतारहस्यापेक्षा दुसरी मौलिक भेट कोणती असणार! भारतीय इतिहास जाणून घेण्याची चिनी विद्यार्थी

पर्यटकांची इच्छा असते. त्यासाठी बुद्ध लेणी, नालंदा आदी ठिकाणी भेटीही दिल्या जातात. त्याच्याच जोडीला समृद्ध साहित्याच्या माध्यमातून भारतीय संस्कृती-परंपरेची ओळख करून दिली जाणार आहे. भारत-चीन केंद्राची वेबसाइटदेखील चिनी भाषेत करण्यासाठी प्रयत्नशील आहोत; तसेच चिनी भाषेच्या प्रशिक्षणासाठीही वर्ग सुरू केले जाणार आहेत.'

भारतीय भाषांमधील मौलिक ग्रंथसंपदा आणि संस्कृती-परंपरेचे प्रतिबिंब उमटणारे ग्रंथही इंग्रजी-मराठी वाचकांसाठी उपलब्ध करून दिले जातील.

राजनैतिक स्तरावर उभय देशांमधील संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न होत असताना त्याला हातभार लावण्याचा उद्देश आहे, असे या केंद्राचे संस्थापक डॉ. प्रकाश आंबेगावकर यांनी स्पष्ट केले.

*** इंडियन फार्मोकोपोया कमिशन**

आघारकर संशोधन संस्थेने प्रमाणित केलेल्या औषधी वनस्पतींवरील दोन पुस्तके भारतीय आयुर्विज्ञान संस्थेने प्रसिद्ध केली आहेत. त्याला इंडियन फार्मोकोपोया कमिशनने संदर्भग्रंथ म्हणून मान्यता दिलेली आहे. या पुस्तकामध्ये वनस्पतीच्या औषधी गुणधर्मांसह त्याची उपयुक्तता स्पष्ट करण्यात आली आहे.

औषधी वनस्पती ओळखण्याच्या पद्धती आणि त्यांच्यातील गुणकारी द्रव्य पडताळून त्यांचे प्रमाण निश्चित करण्यासंबंधी 'आघारकर संशोधन संस्थे'तील शास्त्रज्ञांनी विविध जातींचे संशोधन केले आहे. नवी दिल्ली येथील भारतीय वैद्यक संशोधन परिषदेच्या प्रकल्पांतर्गत गेल्या सहा वर्षांपासून याविषयीचे संशोधन सुरू होते. त्यांच्या संशोधनाचा 'क्वॉलिटी स्टॅण्डर्ड ऑफ इंडियन मेडिकल प्लॅन्ट्स' आणि 'फायटोकेमिकल रेफरन्स स्टॅण्डर्ड ऑफ सिलेक्टेड इंडियन मेडिकल प्लॅन्ट्स' या पुस्तकामध्ये समावेश करण्यात आला आहे.

मोठ्या प्रमाणावर औषधी वनस्पती आल्यानंतर नमुन्याद्वारे त्यांची पडताळणी केली जाते; परंतु नमुने सुस्थितीत नसल्यास पडताळणी करणे अवघड होते. या संशोधनामुळे औषधी वनस्पती ओळखण्याचे तंत्र सोपे होणार आहे. तसेच वनस्पतिजन्य औषधांमध्ये या वनस्पतींचा वापर करण्यासाठी त्यांच्यात गुणकारी द्रव्ये किती प्रमाणात असावी, याचे निश्चितीकरण या संशोधनाद्वारे करण्यात आले आहे.

डॉ. नाईक म्हणाले, ''औषधनिर्मिती करताना या संशोधनाचा फायदा होणार आहे. तसेच नियंत्रण प्राधिकरणाला औषधांमधील भेसळ रोखण्यासही ते उपयुक्त ठरणार आहे.''

*** मराठीचे ४ कोर्सेस मान्यतेच्या प्रतीक्षेत**

मराठी भाषा विकास-संवर्धनाच्या प्रमुख उद्देशाने पुणे विद्यापीठाची स्थापना झाली असली, तरी विद्यापीठातला मराठी विभागच आज सर्वाधिक दुर्लक्षित असल्याची

स्थिती आहे.

मराठीत एमए करून रोजगार मिळत नाही, ही वस्तुस्थिती असताना पुस्तकी शिक्षणाच्या बाहेर पडत विद्यार्थ्यांना उपयोजित शिक्षण देण्याच्या उद्देशाने मराठी विभागाने नवीन योजना आखून अमराठी भाषिकांसाठी मराठी परिचय वर्ग, विद्यार्थ्यांसाठी पटकथा लेखन वर्ग, ग्रंथनिर्मिती व्यवहार (बुक पब्लिशिंग) आणि प्रशासकीय मराठी लेखन हे चार नवीन कोसेर्स सुरू करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. या संदर्भातील विस्तृत प्रस्ताव मान्यतेसाठी विभागातर्फे गेल्या वर्षी अधिकार मंडळांकडे पाठविण्यात आला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रस्तावाला विद्वत परिषदेकडून मान्यताही मिळालेली आहे. मात्र यासंबंधीचे कोणतेही पत्र विभागाला प्राप्त झालेले नाही.


*** खासगी एसएमएस**

एखाद्या व्यक्तीने स्मार्टफोनद्वारे पाठविलेले खासगी एसएमएस वा छायाचित्रे फेसबुक, याहू व फ्लिकर ही संकेतस्थळे वाचू-पाहू शकतात. मोबाईल फोन सुविधानिर्मिती करताना या कंपन्यांनी हे अधिकार घेतलेलेच असतात. स्मार्टफोन विकत घेणारे ग्राहक मात्र बहुतेकदा अटी व नियमांचे प्रकरण वाचत नाहीत.

'अँड्रोइड' यंत्रणा वापरणाऱ्या स्मार्टफोनच्या वापरकर्त्यांचे टेक्स्ट मेसेज आपण वाचत असल्याचे वरील संकेतस्थळांनी मान्य केले आहे. स्मार्टफोनबरोबर देण्यात येणाऱ्या अनेक सुविधांचा वापर करण्यापूर्वी ग्राहकाला अटी व नियमांची जाणीव करून दिली जाते, त्यात ही वैयक्तिक माहिती पाहण्याची परवानगी या कंपन्यांना मिळते. ही माहिती अर्थातच जाहिरातदारांना विकली जाते.

*** विनोद दोशी स्मृती फेलोशिप**

'नाटक करताना अपयश येण्याची शक्यता जास्त असते, हे गृहीत धरून काम केले की त्या अपयशातूनच चांगला मार्ग सापडतो. फेलोशिप मिळालेल्या या पाचही नाट्यकर्मींनी अशाच प्रकार धडपड करत राहावी आणि नाटकासाठी काम करत राहावे,' अशी भावना ज्येष्ठ नाटककार डॉ. गिरीश कर्नाड यांनी व्यक्त केली.



**थैलीभर गोष्टी** **७वी आवृत्ती**

**सुधा मूर्ती** अनु. लीना सोहोनी

एका प्रतिभावान लेखिकेच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झालेल्या, मनात घर करून राहणाऱ्या देशविदेशच्या गमतीशीर आणि चटकदार कथा. खास बालचमूंसाठी.

**१५०रु. पोस्टेज २०रु.**

साहित्य रंगभूमी प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारी विनोद दोशी स्मृती फेलोशिप कर्नाड यांच्या हस्ते देण्यात आली.

या वेळी नाटककार सतीश आळेकर, दिग्दर्शक सुनील शानबाग, शरयू दोशी, अशोक कुलकर्णी उपस्थित होत

डॉ. कर्नाड म्हणाले, 'या फेलोशिपमुळे पूर्णवेळ नाटक करणाऱ्या तरुण कलावंताना प्रोत्साहन मिळाले आहे. तसेच, नाटक करताना येणारी पैशाची अडचण थोड्या प्रमाणात सुटल्यामुळे भविष्यात ही मंडळी उत्तम नाटक करत राहातील यात शंका नाही.'

फेलोशिप मिळालेल्या नाट्यकर्मींनी त्यांच्या आवडीचे सादरीकरण केले. त्यात हिमांशू स्मार्त यांनी 'भावंडभाव' या ललित लेखाचे वाचन केले. अनिरुद्ध खुटवड यांनी काही कवितांचे वाचन, ओंकार गोवर्धनने श्री. कृ. कोल्हटकर यांच्या पुस्तकातील 'गवई प्रकरण', हेमंत हजारे यांनी पं. सत्यदेव दुबे यांच्या 'मोन्टाज' या नाटकातील एक स्वगत सादर केले. सुरुची अवलख यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सतीश आळेकर यांना पद्मश्री मिळाल्याप्रीत्यर्थ साहित्य रंगभूमी प्रतिष्ठानतर्फे डॉ. कर्नाड यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. रूपाली भावे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

*** राम कदम कलागौरव पुरस्कार**

लावणी हा माझा प्रांत नाही. माझा आवाजही लावणीला फिट बसेल, असा नव्हता. मात्र राम कदम यांनी मला लावणीचे विविध प्रकार शिकविले. त्यांच्यामुळे माझे गाणे सुधारले, अशा शब्दात ख्यातनाम पार्श्वगायिका उषा मंगेशकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

'मी सुरुवातीला एका विशिष्ट पद्धतीने गायचे. रामभाऊंनी मला गाण्यात गावरान शब्द कुठे आणि कसे वापरायचे हे शिकवले. त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याचा खूपच आनंद वाटतो,' असे मंगेशकर यांनी सांगितले.

शरद क्रीडा आणि सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे उषा मंगेशकर यांना खासदार




**फाईव्ह पॉइंट समवन** **६वी आवृत्ती**

**चेतन भगत** अनु. सुप्रिया वकील

आयआयटीच्या घासू नसलेल्या मुलांची खट्याळ कहाणी

**२२०रु. पोस्टेज २५रु.**

सुप्रिया सुळे यांच्या हस्ते 'राम कदम कलागौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. माजी खासदार श्रीनिवास पाटील, उद्योगपती विठ्ठलशेठ मणियार, विजय कदम, श्यामला कदम-गायकवाड, श्रीराम साठे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मीकांत खाबिया आदी उपस्थित होते.

'मनातून उमलणारी गाणी रसिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम उषा मंगेशकर यांनी केले,' असे पाटील यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या पूर्वार्धात 'जनरंजनी' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यात सुवर्णा माटेगावकर, शर्वरी जमेनीस, तनुजा जोग-वैद्य, प्रशांत नासेरी आदींनी सहभाग घेतला. गणेश उजागरे यांनी आभार मानले. मंगेश वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले.

*** दिल्लीकर मराठी मान्यवरांचा सत्कार**

राजधानी दिल्लीच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त सार्वजनिक उत्सव समितीने येथे किमान ५० वर्षे स्थायिक झालेल्या सुमारे पावणेदोनशे मराठी मान्यवरांचा सत्कार केला. मुख्यमंत्री शीला दीक्षित अनुपस्थित असल्या तरी परिसरातील मराठी बांधवांची हजेरी लक्षवेधक होती. सत्कारमूर्तींना संयोजक, तसेच पाटील ज्वेलर्स यांच्यातर्फे स्मृतिचिन्ह, शाल व गुच्छ देऊन त्यांना गौरविण्यात आले. रा. मो. हेजीब व अरविंद दीक्षित यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

मराठी माणूस दिल्लीत रमत नाही, हा समज दूर करणाऱ्या शेकडो मराठी बांधवांच्या गर्दीने लोककला मंचाचे सभागृह फुलून गेले होते. 'गणपती बाप्पा मोरया' आणि 'छत्रपती शिवरायां'च्या गजरात या सर्वांचा सत्कार झाला.

विसाव्या शतकात दिल्लीतील पहिल्या साईबाबा मंदिराचे संस्थापक चिटणीस, अभ्यंकर, परांजपे, शेंडे, आगाशे, गोखले, पाटील आदी विविध मराठी लोक दिल्लीत स्थायिक होत गेले. साहित्य-शिक्षण-उद्योग-व्यापार, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांवर त्यांनी आपला ठसा उमटविला.

दिल्लीत सध्या सुमारे तीन लाख मराठी आहेत. 'कडाक्याची थंडी आणि उन्हाळा असलेली, राजकीय रंगात रंगून गेलेली दिल्ली आम्हाला नको,' असे



**मयादा इराकची कन्या** ३री आवृत्ती

**जीन सॅसन** अनु. भारती पांडे

सद्दाम हुसेनच्या भयानक अत्याचारांचा जळता इतिहास चितारणारी सत्यकहाणी

**२९०रु. पोस्टेज २५रु.**


म्हणणाऱ्या मराठी मानसिकतेला प्रत्युत्तर देत या मराठीजनांनी येथे आपले पाय रोवले. यात १९३० मध्ये जन्मलेले एम. बी. परांजपे, १९३३ मध्ये येथेच जन्मलेले चंद्रकांत खानापूरकर, शरद शेंडे यांच्यासह रामदास आगाशे, सरोज हर्णे, महाराष्ट्र सदनाच्या माजी व्यवस्थापिका ज्योती डेनिसन, पोलिटिकल सोसायटी ऑफ इंडियाचे दीर्घकाळ अध्यक्ष राहिलेले एस. आर. कुलकर्णी, दत्तराज पारख, देवदत्त चिटणीस, अनंत ऊर्फ मामा देसाई, संस्कृततज्ज्ञ मंगला कवठेकर, प्राचार्या सुशीला अंबिके, जय पानसरे आदींचा समावेश होता.

उपलब्ध इतिहासानुसार अलीकडच्या काळात दिल्लीत आलेली पहिली मराठी व्यक्ती म्हणजे नेताजी पालकर. त्यानंतर महाराणी ताराबाईंना औरंगजेबाने पकडून दिल्लीत आणले. शिंदे, होळकर, तसेच पानिपतचे युद्ध आदी निमित्तांनी दिल्ली व उत्तर भारतात स्थायिक झालेली अनेक कुटुंबे आजही आहेत. विसाव्या शतकात १९१० मध्ये दिल्लीत येऊन स्थायिक झालेले टिपणीस कुटुंबीय होते. दादासाहेब फाळके यांनी पहिल्या भारतीय चित्रपटाची निर्मिती केली त्या आधीच्या काळात हे टिपणीस विलायती मूकपट गावोगाव फिरून दाखवीत असत.

*** 'म्हशी'चा वाद**

पुलंच्या 'म्हैस' या कथेवरून चित्रपटनिर्मितीबाबत उद्‌भवलेल्या वादात अ. भा. चित्रपट महामंडळाने हस्तक्षेप करून तयार होत असलेल्या चित्रपटांची निर्मिती थांबवावी असे सांगणे योग्य होणार नाही. त्यामुळे आवश्यक त्या कागदपत्रांची पाहणी करून हा विषय मार्गी लावण्याचा महामंडळाचा प्रयत्न असेल.

पुलंच्या 'म्हैस' या कथेवर अजून दोन चित्रपट बनत असल्याचा आक्षेप घेऊन दिग्दर्शक शेखर नाईक यांनी चित्रपट महामंडळाकडे दाद मागितली आहे. 'नाईक यांनी महामंडळाकडे कागदपत्रे सादर केली असली तरी अधिकृत तक्रार दाखल केलेली नाही. अधिकृत तक्रारीवर तोडगा काढण्याची महामंडळाची स्वतंत्र प्रक्रिया आहे. सुनीताबाई देशपांडे यांनी त्यांच्या मृत्युपत्रात पुलंच्या साहित्यावर कोणीही चित्रपट करू शकतो, असे नमूद केले आहे. कथेचे हक्क घेतल्यानंतर पुढील दोन अडीच वर्षे ते वैध असतात. त्यामुळे आता या प्रश्नाबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची


**देव जो भूवरी चालिला** **५वी आवृत्ती**

**रंगास्वामी पार्थसारथी** अनु. लीना सोहोनी

साईबाबांची थोरवी विशद करणारे रसाळ चरित्र

**१९०रु. पोस्टेज२५रु.**

पाहणी करून दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले जाईल. हे चित्रपटकर्ते महामंडळाचे ‘अ’ वर्गातील सभासद आहेत. या प्रश्नात हस्तक्षेप करून चित्रपटाची निर्मिती बंद करण्यास सांगणे योग्य होणार नाही. आता चित्रपटकर्त्यांना हा विषय सबुरीने न सोडवता, जर कोर्टात जाऊनच सोडवायचा असेल तर महामंडळ काय करणार असा सवाल त्यांनी विचारला आहे.

*** जगभरातील ‘कार्टून’ पात्रे दिल्लीत**

राजधानी दिल्लीत ‘कॉमिक कॉन २०१२’ या परिषदेत विविध देशांमध्ये ‘जन्मलेल्या’ कार्टून पात्रांचे वेष परिधान केलेले उत्साही लोक सहभागी झाले होते. भारतातील कॉमिक्स लेखक, चित्रकार, प्रकाशक यांच्यातील संवादाचे व्यासपीठ असलेल्या या परिषदेत ८० प्रतिनिधी सहभागी झाले असून, या वेळी २२ नवीन कार्टून पात्रांचे अनावरण करण्यात आले.


‘मार्वेल’ आणि ‘डिस्ने’ यांच्या सहकार्याने ही परिषद आयोजित करण्यात आली. भारतातील कॉमिक्स क्षेत्रावर ठसा उमटविलेल्या ‘अमर चित्रकथे’ च्या अनंत पै यांच्या आठवणी जागविणारे ‘अनंत पै-मास्टर स्टोरीटेलर’ हे पुस्तक या वेळी प्रकाशित करण्यात आले.

दिल्ली हाट येथे भरलेल्या या परिषदेत ‘कॉसप्ले’ ही वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. १३ वर्षांखालील स्पर्धकांनी कार्टून पात्राप्रमाणे वेशभूषा केल्या होत्या. विजेत्यांना हाँगकाँग येथील डिस्ने लँडची सैर करायला मिळाली.

*** मराठी भाषा विभाग केवळ कागदावरच**

राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात ‘डंका’ पिटवून सुरू करण्यात आलेला मराठी भाषा विभाग सरकार दरबारी लालफितीत अडकला आहे.

राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या कारकीर्दीत जुलै २०१० मध्ये मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली. मराठीच्या उत्कर्षासाठी सरकारने कोणती पावले उचलायला हवीत, यासाठी माजी न्यायाधीश नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा सल्लागार समितीची नियुक्तीही करण्यात आली. मात्र, घोषणा आणि कागदी आदेश


**साक्षात्काराची देणगी** **३री आवृत्ती**

**ओशो** अनु. प्रज्ञा ओक

अध्यात्मामध्ये सातत्यानं विचारात घेतल्या जाणाऱ्या गोष्टी म्हणजे, प्रेम आणि करुणा!

**२००रु. पोस्टेज २५रु.**

यांपुढे विभाग आणि समितीचे कामकाज जाऊ शकले नाही. सरकारी अनास्थेमुळे, चपळगावकर यांनी राजीनामा दिल्यानंतर तर गेल्या आठ महिन्यांत सल्लागार समितीची एकही बैठक झाली नाही.

यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरे करण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या अधिपत्याखाली मराठी भाषा विभागाचे कामकाज चालेल, असे तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सुरुवातीला स्पष्ट केले. मात्र, त्यांच्या गच्छंतीनंतर हा विभाग राष्ट्रवादीकडे खेचून आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीमधील अंतर्गत वादामुळेच सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार, याचा निर्णय होऊ शकत नसल्याची चर्चा सुरू आहे.

*** लुधियानवी यांचा जीवनपट**

आयुष्यभर जीवनात कटुता अनुभवूनही स्वतःच्या गीतांतून जीवनाकडे सकारात्मक नजरेने पाहणाऱ्या गीतकार साहिर लुधियानवी यांच्या चित्रपट गीतांचा 'मै हर एक पल का शायर हू' हा दृक्‌श्राव्य कार्यक्रम हॅपी कॉलनीच्या सभागृहात सादर झाला.

साधना कला मंचतर्फे आयोजित कार्यक्रमाची संकल्पना, संवाद व निर्मिती आनंद देशमुख यांची होती. अनिल जोशी यांनी त्यांना साथ दिली.

'ठंडी हवायें लेहरा के आये', 'मैं हर एक पल का शायर', 'तू हिंदू बनेगा न मुसलमान बनेगा' या गीतांचे गीतकार लुधियानवी यांच्या जीवनातील घटनांचे रसभरीत वर्णन देशमुख यांनी केले. 'मै जिंदगी का साथ निभाता चला गया' या गीतावर रसिक श्रोत्यांनी ताल धरला. सचिन देव बर्मन, एन. दत्ता यांच्यासारख्या ज्येष्ठ संगीतकारांनी संगीत दिलेली त्यांची गाणी लता मंगेशकर, महमंद रफी यांसारख्या प्रसिद्ध गायकांनी गायलेली आहेत. लुधियानवींनी रचलेल्या गीतांतून त्यांच्या जीवनाची ओळख करून दिली. साधना मंचच्या मीना राव आणि गिरीश करंदीकर यांनी कलाकाराचा सत्कार केला.

*** 'ट्विटर शब्दमर्यादा वाढविणार नाही**

ट्विटरवर अधिक वेळ व्यतीत करणे आरोग्यासाठी हानिकारक आहे असा इशारा ट्विटरचे सहसंस्थापक आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर बिझ स्टोन यांनी दिला आहे.

जगभरात लोकप्रिय असलेल्या सोशल नेटवर्किंग साइटचे जवळपास ५० कोटी ॲक्टिव्ह यूजर्स आहेत. त्यातही दिवसातील कैक तास ट्विटींग करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. जे यूजर्स गरजेपेक्षा अधिक वेळ ट्विटींग आणि सोशल नेटवर्किंग साइटवर सर्फिंग करतात, ते स्वतःच्या आयुष्यातील मौल्यवान वेळ पणाला लावत आहे. या साइट्‌सवर वेळ घालविण्यापेक्षा जे मिळवायचे आहे,

त्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न करावा, अशी टिप्पणी बिझ यांनी केली.

शब्द मर्यादा असणारी ही मायक्रोब्लॉगिंग साइट ॲडिक्टिव्ह असल्याची प्रेमळ तक्रार यूजर्सकडून सातत्याने होत आहे. काही महाभाग बारा तासांपेक्षाही अधिक वेळ ट्विटरवर घालवित असल्याचे सांगून ते म्हणाले, ट्विटरवर बसल्याने फार काही साध्य होते, असे नाही. मला विचाराल तर, गरजेपेक्षा अधिक वेळ बसणे धोकादायक आहे. कोणत्याही परिस्थितीत ट्विटरची कॅरॅक्टर्सची मर्यादा वाढविणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

*** प्रभुणे यांच्या संस्थेस 'श्रीगमा' पुरस्कार**

'माणूस'कार श्री. ग. माजगावकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा 'श्रीगमा विधायक कृतिशीलता पुरस्कार' यंदा चिंचवड येथील गिरीश प्रभुणे यांच्या 'पुनरुत्थान समरसता गुरुकुलम्' या संस्थेला देण्यात आला. २१ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पारधी, वडार, डोंबारी, कोल्हाटी शिकलगार अशा अनेक भटक्या विमुक्त जातींतील शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांना आधुनिक आणि पारंपरिक ज्ञानाची सांगड घालून शिक्षण देण्याचा उपक्रम या संस्थेत राबविला जातो.

*** बालसाहित्यामुळे मुलांवर संस्कार**

सध्या मराठी साहित्यात लहान मुलांसाठी बालसाहित्य मोठ्या प्रमाणावर असणे आवश्यक आहे. या बालसाहित्यामुळे मुलांवर संस्कार होऊन त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण होऊ शकते. यासाठी पालकांनीच पुढे यावे असे आवाहन ज्येष्ठ वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांनी केले.

कुमुदिनी कुलकर्णी लिखित 'बालसरिता आणि अंकुर' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांनी केले. यावेळी प्रा. रंजना फडके, मंजिरी ताम्हणकर, स्नेहल बावडेकर आदी उपस्थित होत्या.

कुलकर्णी यांनी आपल्या वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली आहे. या वयातही त्यांनी आपले लेखन सुरूच ठेवले आहे. याबद्दल फुटाणे यांनी त्यांचे कौतुक केले. कुलकर्णी या शिक्षिका आहेत.





**प्लेझर बॉक्स भाग - १**

**७वी आवृत्ती**

**व. पु. काळे**

वपुंच्या लेखनाला मिळालेली दाद आणि त्याला वपुंनी दिलेला प्रतिसाद म्हणजे हे पुस्तक

**१६०रु. पोस्टेज २५रु.**

फुटाणे म्हणाले, सध्या मुले टी.व्ही. पाहण्यात व व्हिडीओ गेम्स खेळण्यात दंग असतात. त्यामुळे त्यांना वाचनाची आवड निर्माण होत नाही. पालकही त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत. परिणामी वाचनसंस्कृती कमी होत आहे.

*** मसाप अध्यक्षपदी डॉ.प्र.चिं. शेजवलकर**

ज्येष्ठ साहित्यिक द.मा.मिरासदार यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दिलेला अध्यक्षपदाचा राजीनामा मंजूर करत, डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांची महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी रावसाहेब कसबे यांची निवड करण्यात आली.

महामंडळाच्या महाकोशाचे विश्वस्त असलेल्या डॉ. सतीश देसाई यांची मुदत मार्चमध्ये संपली. त्यांच्या जागी डॉ. कल्याणी दिवेकर यांची नियुक्ती केली गेली.

*** मराठी सिनेमांत यंग फॅक्टर'**

मध्यंतरी एका टिपिकल विनोदी साच्यामध्ये मराठी सिनेमा अडकला होता. त्यातील तोचतोचपणाला प्रेक्षक कंटाळले. तरुणांनी मराठी सिनेमांकडे पाठ फिरवली. आता ही परिस्थिती बदलत आहे.

मराठी सिनेमांनी आशयाच्या बाबतीत दर्जेदार झेप घेतली. शिवाय मराठी सिनेमांमध्ये एक नवीन फॅक्टर येऊ पाहतोय, तो म्हणजे फ्रेश लूक आणि ग्लॅमरचा.

नवीन-तरुण चेहरे, दिग्दर्शनाची वेगळी शैली, दमदार संगीत, देखणी सिनेमॅटोग्राफी यामुळे मराठी चित्रपट पहायला तरुण मंडळींची गर्दी वाढू लागली आहे. 'श्वास', 'वळू', 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय', 'मोरया', 'बालगंधर्व', 'हरिश्चंद्राची फॅक्टरी', 'देऊळ', 'शाळा' आणि 'सप्तरंगी रे', आदी सिनेमे तरुण प्रेक्षकांना जोडू पाहताहेत.

ग्लॅमरस लूक, ॲक्शनबाजी, रफ अँड टफ बॉडीचा हिरो, देखणी हिरॉइन आणि दमदार कथा यामुळे आत्ता आलेले मराठी सिनेमे प्रेक्षकांच्या या अपेक्षांची पूर्तता करत असल्याचे दिसते.

'स्वराज्य : मराठी पाऊल पडते पुढे'साठी राजेश शृंगारपुरेनं सिक्स पॅक बिल्ट करणं, 'अर्जुन'साठी सचित पाटीलनं आपल्या स्टनिंग लूकवर भर देणं हे बदल




**कातळ** **६वी आवृत्ती**

**रणजित देसाई**

मस्तक सुन्न करणाऱ्या दोन दीर्घ कथांचा अविस्मरणीय संग्रह

**१००रु. पोस्टेज २०रु.**

दिग्दर्शकानं आजच्या तरुण प्रेक्षकांना समोर ठेवून केले आहेत. ‘फक्त लढ म्हणा’नंही प्रेक्षकांना ॲक्शनपॅक्ड सिनेमाचा अनुभव दिला. ‘सतरंगी रे’मधले चेहरेही फ्रेश असल्यानं प्रेक्षकांना ते आपलेसे वाटले. हिरॉइन्सच्या बाबतही असंच समाधानकारक चित्र आहे. सिनेमाचं बजेट वाढवल्यानंतरही आशय आणि मांडणीमध्ये गुणवत्ता येत आहे, हेही दखल घेण्याजोगं आहे.

संगीतकार अजय नाईक, दिग्दर्शक अमित अभ्यंकर, संकलक अभिजित देशपांडे, लेखक समीर जोशी, सुजय डहाके या नव्या दमाच्या टीमनं आपल्या सिनेमाची धुरा पेलली आहे.

*** ‘यू ट्यूब’वरचा रॅम्पवॉक**

सोशल मिडियाच्या आगमनाने सगळ्याच व्याख्या आणि संकल्पना बदलल्या, त्याचबरोबर फॅशन जगतातही मोठे बदल झाले. केट अपटॉन... वय १९ या सध्या युट्यूबवर गाजत असलेल्या मॉडेलने फॅशन वीक किंवा रॅम्पपेक्षा सोशल मीडियाच्या माध्यमातूनच फॅशन क्षेत्रात पदार्पण केले आहे.

न्यूयॉर्क फॅशन वीकमध्ये ॲगाथा, हॅना, फ्रेंडा, जोआन अशा वेगवेगळ्या नावांनी गाजत असलेल्या या मुलीने लॉस एंजेलिसमध्ये स्वत: केलेल्या एका नृत्याचा व्हिडिओ ‘यू ट्यूब’वर पोस्ट केला. हा व्हिडिओ युट्यूबवर खूपच गाजला. तीस लाखांपेक्षा अधिक हिटस मिळालेल्या या व्हिडिओने हैदी क्लम, केट मॉस सारख्या सुपर मॉडेल्सचा गॉडफादर इव्हान बार्ट याचे लक्ष वेधून घेतले.

केट अपटॉन म्हणते की, फार पूर्वीपासून सेलिब्रिटीज करतात ती फॅशन व्हायची. मॉडेल्सकडे कुणी बघायचेच नाही. मॉडेल्सही सेलिब्रिटी बनू शकतात आणि त्यांचे स्वत:चेही फॅशन स्टेटमेंट असू शकते हा विचार होत नव्हता. पण आत्ताच्या सोशल मीडियाने या संकल्पनेलाच छेद दिला आहे. कारण या प्रकारात आपल्याला काय बघायचे आहे आणि काय नाही, याचा निर्णय घेतला जातो. हा विचार पुढे येणाऱ्या बदलाची एक प्रकारे नांदीच आहे.

*** संत साहित्य संमेलन**

संतांचे साहित्य केवळ वारकऱ्यांपुरते मर्यादित न राहता ते शालेय विद्यार्थ्यांपर्यंत





**वाइज अँड अदरवाइज** **१६वी आवृत्ती**

**सुधा मूर्ती** अनु. लीना सोहोनी

आपल्या व्यवसायात कार्यमग्न असतानाही सामाजिक जाणिवांचे भान ठेवून टिपलेले अनुभव.

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

गेले पाहिजे, असे प्रतिपादन दिनकरशास्त्री भुकेले यांनी नाशिकच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनातील परिसंवादामध्ये केले.

ते म्हणाले, संत साहित्याचा आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये समावेश केल्यास अहिंसेच्या मार्गाने चालणारा उद्याचा भारत निर्माण होईल, तसेच संतांनी रचलेल्या आध्यात्मिक शिक्षणामुळे भारतीय संस्कृती टिकून आहे. भविष्यामध्ये संस्कारयुक्त भारत पाहायचा असेल तर आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये संत साहित्य आणि आध्यात्मिक शिक्षण समाविष्ट केले पाहिजे.  शरीराबरोबरच विचार स्वच्छ करणारे तसेच निद्रा, भय आणि संयम या विषयांचे शिक्षण दिल्याने खरा ज्ञानवर्धक विद्यार्थी घडतो.

व्यसनमुक्तीसाठी प्रवचन करणारे संताचे विचार विद्यार्थ्यांना दिले पाहिजेत. परंतु आज काही शाळांमध्ये गुटखा खाऊन विद्यार्थ्यांसमोर थुंकणारे शिक्षक विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे शिक्षण देत आहेत.  गुटखा खाऊन विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे शिक्षण कसे देणार, हा प्रश्न पडतो.

आध्यात्मिक शिक्षण ही प्रक्रिया आजच्या काळाशी जोडता येत नाही. कारण आज आधुनिक शिक्षणाची परंपरा भौतिक शिक्षणपद्धतीवर अवलंबून आहे, असे मत प्रा. माणिक गुट्टे यांनी व्यक्त केले. आजचे शिक्षण कालबाह्य झाले आहे, असे प्रतिपादन परिसंवादाचे अध्यक्ष प्राचार्य शिवाजीराव मोहिते यांनी केले. यावेळी आदिवासी विकास मंत्री बबनराव पाचपुते, संमेलनाध्यक्ष सदानंद मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

* **बर्डफेस्ट**

विविध जातींच्या पक्ष्यांची प्रत्यक्षात पाहणी... त्यांच्यासाठी कृत्रिम घरटी... दृक्‌श्राव्य पद्धतीने सादरीकरण अन् पक्षीविश्वाची जवळून झालेली ओळख.. या सगळ्यांचा अनुभव आबालवृद्धांनी ‘बर्डफेस्ट’ मध्ये घेतला.

नेचर वॉक, पुणे महापालिका व इंद्रधनुष्य पर्यावरण केंद्र यांच्या तर्फे ‘बर्डफेस्ट’चे आयोजन करण्यात आले होते. पक्षी अभ्यासक किरण पुरंदरे व प्रा. संजय नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली कवडीपाट येथे तीनशे निसर्गप्रेमींनी पक्षी निरीक्षणाचा आनंद





**तो आणि ती** **१०वी आवृत्ती**

**जॉन ग्रे** अनु. डॉ. रमा मराठे

‘मेन आर फॉर मार्स वुमन आर फ्रॉम व्हिनस’ या जगप्रसिद्ध पुस्तकाचा मराठी आविष्कार

**२५०रु. पोस्टेज ३०रु.**

घेतला. यावेळी पक्ष्यांच्या ४८ प्रजातींची नोंद करण्यात आली. त्यानंतर पक्षी मित्र विश्वजीत नाईक यांनी 'पक्ष्यांचे कृत्रिम घरटे' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यामध्ये पक्ष्यांकडून कृत्रिम घरट्यांचा वापर, वेगवेगळ्या स्लाइड्स दाखवून झाडांवर घरटी कशी लावायची याचे प्रात्यक्षिकही दाखविले. छायाचित्रकार राजेश कुंचूर यांनी नवोदितांना पक्ष्यांची छायाचित्रे काढणे व कॅमेरा हाताळणे या संबंधी माहिती दिली.

गिधाडांची दिवसेंदिवस कमी होणारी संख्या, समस्या व संवर्धन, तसेच पक्ष्यांवरील दुर्मिळ माहितीपटांचे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये सुरेश एल्मॉन, शेखर दत्तात्री यांच्या माहितीपटांचा समावेश होता. बारामती, नगर, सोलापूर, मुंबई आदी ठिकाणांहून आलेल्या निसर्गप्रेमींनी असे उपक्रम सातत्याने करण्यात यावेत, अशी मागणी केली. ''बर्डफेस्ट'मुळे निसर्ग व पक्षिसंवर्धनाबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत आहे. भविष्यात अशा उपक्रमांद्वारे निसर्गाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास मदत होईल.'' अशी अपेक्षा किरण पुरंदरे व अनुज खरे यांनी व्यक्त केली.

*** पहिले पर्यावरणप्रेमी साहित्य संमेलन**

महाराष्ट्र साहित्य परिषद आणि किर्लोस्कर वसुंधरा यांच्या वतीने आयोजित पहिल्या पर्यावरणप्रेमी साहित्य संमेलनाचे उद्घाटन ना. धों. महानोर यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी महाराष्ट्र साहित्य परिषद ते बालगंधर्व रंगमंदिर वृक्षदिंडी काढण्यात आली. पालखीतील वृक्षाला जल अर्पण करून संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी, क्लब वसुंधराचे वीरेंद्र चित्राव आदी उपस्थित होते.

''ऋषी आणि कृषी संस्कृती असलेला आपला देश एक काळ जगाला आदर्श होता. पण आज हे सगळे आम्ही घालविले आहे. माती, पीक, शेतीची रया गेली. यातून बाहेर पडण्यासाठी जैविक शेती हाच पर्याय आहे. वनविकास आणि त्यातून शेती, पाणी याबाबत छत्रपती शिवाजी महाराज यांचे आज्ञापत्र होते. अहिल्याबाई होळकर यांनी पाणी, तलाव, जंगल झाडी, पशू-पक्षी, शेतीकडे बारकाईने पाहिले. संत तुकोबा, सावता माळी अशा संतांचे विचार समाजाने त्या काळात अंगीकारले होते. आता हिरवाई सोडून गेली आहे. निसर्गाची मोडतोड पाहून खिन्नता वाटते,




**तुम्ही अन तुमची मुलं!** **११वी आवृत्ती**

**रुपांतर : अविनाश भोमे**

मुलांशी कसे वागावे हा प्रश्न पडणाऱ्या पालकांची गीता

**९५रु. पोस्टेज २०रु.**

''बदलत्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे शेतीपासून लोक दूर जात आहेत. निसर्ग धनाढ्यांच्या हातात जात आहे. अशा वेळी साहित्यिकांनी निसर्गाचे दु:ख लेखणीद्वारे मांडले पाहिजे,'' अशी अपेक्षा महानोर यांनी व्यक्त केली, त्यांनी 'पाण्याविना दाही दिशा आम्ही अनवाणी' ही कविता सादर केली. डॉ. वैद्य यांनी प्रास्ताविक आणि मृणालिनी कानिटकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मिलिंद जोशी यांनी आभार मानले.

*** कुसुमाग्रजांचा जीवनप्रवास**

कुसुमाग्रज जन्मशताब्दी सांगतेनिमित्ताने महाराष्ट्र साहित्य परिषद, विवेक व्यासपीठ आबासाहेब गरवारे महाविद्यालय व संस्कार भारती यांच्या वतीने 'एक किरण सूर्याचा' ही मैफल आयोजिण्यात आली होती. 'सकाळ' या कार्यक्रमाचे माध्यम प्रायोजक होते. 'हे स्वरांनो चंद्र व्हा...', हसरा नाचरा जरासा लाजरा...', 'गर्जा जयजयकार...', 'दर्शनाला आलात या...', 'प्रेम कुणावर करावं...', 'पुरे झाले चंद्र सूर्य...', 'उठा उठा चिऊताई...', 'हजार जिव्हा तुझ्या गर्जू दे...', 'साऱ्याच कळ्यांना जन्मसिद्ध हक्क आहे फुलण्याचा...' अशा एकाहून एक सरस कविता गीतांचा रंगमंचीय आविष्कार अरुणा ढेरे, गिरीश साळवी, तुषार दळवी, स्पृहा जोशी, विश्वजित बोरवणकर, केतकी भावे, मधुरा कुंभार यांनी सादर केला.

कवितांबरोबरच 'नटसम्राट'मधील प्रसंग सादर करीत कुसुमाग्रजांची जडणघडण व त्यांच्या दुर्मिळ आठवणींनाही उजाळा देण्यात आला. या प्रसंगी 'सकाळ'चे कार्यकारी संपादक नवनीत देशपांडे, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रवींद्र वंजारवाडकर, मराठी विभाग प्रमुख श्यामा घोणसे, प्रा. मिलिंद जोशी, 'विवेक'चे आबासाहेब पटवारी, 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे सुनील देशमुख, 'पीएनजी'चे अजित गाडगीळ उपस्थित होते. सारंग कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

*** सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे सुवर्णकमळ 'देऊळ'ला**

सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी राष्ट्रपतींचे सुवर्णकमळ पटकावून 'देऊळ'ने ५९ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये मराठीची पताका डौलाने फडकावली. कन्नड चित्रपट 'ब्यारी'सह विभागून मिळालेल्या सर्वोत्कृष्ट चित्रपटासह सर्वोत्कृष्ट अभिनेता, संवाद,




**कर्वालो** २री आवृत्ती

**के.पी. पूर्णचंद्र तेजस्वी** अनु. उमा कुलकर्णी

उडता सरडा, एक दुर्मिळ प्राणी त्याच्या शोधयात्रेत विविध स्तरावरचे यात्री. निसर्गरम्य पार्श्वभूमीवरील सशक्त, जिवंत, रसरशीत, नर्मविनोदी लेखनशैलीतून साकारलेली कलाकृती

**१००रु. पोस्टेज २०रु.**

मेक-अप आणि वेशभूषा अशा सात पुरस्कारांवर मराठीची मोहोर उमटली.

'शाळा' हा मराठीतील चित्रपट सर्वोत्कृष्ट ठरला. याच चित्रपटासाठी कादंबरीवरून रूपांतरित पटकथेचा पुरस्कार अविनाश देशपांडे यांना जाहीर झाला. चित्रपटबाह्य विभागात 'विष्णुपंत दामले' या लघुपटानेही पुरस्कार मिळविला.

'देऊळ' आणि 'शाळा'सह बहुचर्चित 'बालगंधर्व' चित्रपटालाही तीन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. 'बालगंधर्व' यांची गायकी पडद्यावर तेवढ्याच ताकदीने उतरविणाऱ्या आनंद भाटे यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायन, विक्रम गायकवाड यांना सर्वोत्कृष्ट 'मेक-अप', तर नीता लुल्ला यांना 'सर्वोत्कृष्ट वेषभूषे'च्या पुरस्काराने गौरविले जाणार आहे. तीन मे रोजी नवी दिल्लीत राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.

'देऊळ'च्या निमित्ताने सुवर्णकमळाचा मान मराठी चित्रपटाला तिसऱ्यांदा प्राप्त झाला आहे. संदीप सावंत दिग्दर्शित 'श्वास'ने २००४ मध्ये, तर तत्पूर्वी आचार्य अत्रे दिग्दर्शित 'श्यामची आई'या चित्रपटाने १९५४ मध्ये पहिल्याच वर्षी हा बहुमान पटकाविला होता. २१ व्या शतकाच्या सुरुवातीला चित्रपटांची घटलेली निर्मितीसंख्या आणि प्रेक्षकांनी फिरवलेली पाठ या पार्श्वभूमीवर 'श्वास'ला मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारामुळे मराठी चित्रपटसृष्टीला नवसंजीवनी प्राप्त झाली. त्यानंतर, मराठी चित्रपटसृष्टीने कात टाकली. नवे विषय, नवे कलाकार-तंत्रज्ञ, उच्च निर्मितीमूल्ये यामुळे मराठी चित्रपट निर्मिती वाढली. एवढेच नाही, तर मल्टिप्लेक्सच्या जमान्यात हिंदीशी स्पर्धा करत प्रेक्षकांना खेचून आणणारे सकस विषयही हाताळले गेले. त्यामुळे, सलग दुसऱ्या वर्षी राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये मराठीने मोठे यश संपादन केले आहे. तसेच, पुरस्कारप्राप्त सर्व चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले असल्याने लोकमान्यतेसह त्याला राज्यमान्यताही मिळाल्याचे समाधान चित्रसृष्टीत व्यक्त केले जात आहे.

*** विष्णुपंत दामलेंवरील माहितीपटाला रजतकमळ**

भारतीय चित्रपटसृष्टीत महत्त्वाचे योगदान दिलेल्या विष्णुपंत दामले यांच्यावर आधारित बोलपटांचा मूकनायक या माहितीपटानेही 'नॉन फिचर' विभागात राष्ट्रीय





**पहिले प्रेम** **१६वी आवृत्ती**

**वि. स. खांडेकर**

माणसाच्या पहिल्या प्रेमाबद्दल...

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

पुरस्कार पटकावला आहे. माहितीपटाचे दिग्दर्शक वीरेंद्र वळसंगकर म्हणाले, 'या राष्ट्रीय पुरस्कारामुळे दामले यांच्या अमूल्य योगदानाचा गौरव झाला असे आम्हाला वाटते. हा माहितीपट असला तरी एखाद्या चित्रपटाइतकीच आम्ही मेहनत घेतली होती. या कष्टांचे चीज झाले.'

विष्णुपंत दामले यांनी संत तुकाराम हा चित्रपट दिग्दर्शित केला होता. अयोध्येचा राजा या पहिल्या बोलपटाचे ते ध्वनिलेखक होते. त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीसाठी केलेले काम ही आधुनिक चित्रपटांची पायाभरणी होती. 'विष्णुपंत दामले यांनी केलेले काम लोकांपर्यंत पोहोचले नव्हते. त्यांनी पडद्यामागे राहून खूप मोठे काम केले होते. म्हणूनच त्याचे नाव 'बोलपटाचा मूकनायक' ठेवण्यात आले आहे.

विष्णुपंत दामले यांच्यावरील लघुपटाने राष्ट्रीय पुरस्कारांची हॅट-ट्रिक साधण्यात दामले कुटुंबीयांना यश आले आहे. २००० मध्ये ४७ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांत अरुणा दामले यांनी लिहिलेल्या 'चित्रपटाची वाटचाल' या पुस्तकाला 'सर्वोत्कृष्ट पुस्तका'चा बहुमान प्राप्त झाला होता. त्यानंतर ५२ व्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये 'इट्स प्रभात' या लघुपटालाही रजत कमळ मिळाले होते.

*** 'पुणेकर' लिसा स्थळेकरचे आत्मचरित्र**

पुण्यातील अनाथाश्रम ते ऑस्ट्रेलियाची आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू... लिसा स्थळेकरचा हा प्रवास 'स्नेकर' या तिच्या आत्मचरित्रात शब्दबद्ध करण्यात आला आहे. ३२ वर्षांची लिसा २००१ पासून आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व करत आहे.

लिसा म्हणाली, ''मी पुण्यातील एका अनाथाश्रमात होते. तिथून मला दत्तक घेण्यात आले आणि मी आता माझ्या दत्तक देशाकडून क्रिकेट खेळण्यासाठी मायदेशी आले आहे. हा सारा प्रवास शब्दबद्ध करण्याची प्रक्रिया जवळपास अडीच वर्षे सुरू होती. यात त्या अनाथाश्रमापासून ऑस्ट्रेलियापर्यंतचे माझे अनुभव आहेत. पुन्हा एकदा 'तो' प्रवास अनुभवणे माझ्यासाठी आनंददायी होते.'' भारतीय वडील आणि ब्रिटिश आई अशा दाम्पत्याने लिसाला दत्तक घेतले. हे दाम्पत्य नंतर ऑस्ट्रेलियामध्ये स्थायिक झाले. लिसाच्या पुण्यासह भारताविषयीही सुखद आठवणी




**ताजमहालमध्ये सरपंच** **९वी आवृत्ती**

**शंकर पाटील**

कायम टवटवीत वाटणाऱ्या कथांचा संग्रह

**१००रु. पोस्टेज २०रु.**

आहेत. ''या आठवणी हा ठेवाच आहे. इथले खाद्यपदार्थ, कॅरम खेळणे, पतंग उडविणे, पान खाणे यातील मजा अजूनही कायम आहे,'' असे लिसा म्हणाली.

*** 'दासबोधातून व्यवस्थापनाचे धडे'**

''स्वामी समर्थांचा दासबोध हा ग्रंथ वाचला, तर संपूर्ण व्यवस्थापनाचे धडे आपल्याला मिळतात,'' असे मत स्वामी स्वामी समर्थांच्या साहित्याचे अभ्यासक डॉ. राम साठे यांनी व्यक्त केले.

ज्ञान प्रबोधिनी येथे डॉ. उषा खिरे लिखित 'समर्थ जीवनासाठी समर्थ विचार' या पुस्तकाचे प्रकाशन साठे यांच्या हस्ते झाले. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश बापट, इंद्रायणी प्रकाशनचे श्याम कोपर्डेकर उपस्थित होते. डॉ. साठे म्हणाले, ''वाद, भेद, अहंता, अनीती ही खरी दु:खाची कारणे आहेत. स्वामी समर्थांचे विचार मानवी मनाचे समुपदेशन करून त्याला वास्तव स्वीकारण्यास तयार करतात. देहबुद्धी ही आत्मबुद्धी व्हावी. समर्थांचे आणि विवेकानंदांचे विचार सारखेच आहेत.'' डॉ. वृषाली खिरे यांनी आभार मानले, तर रजनी रत्नपारखी यांनी सूत्रसंचालन केले.

*** महिला चित्रपट महोत्सव**

जगाचे तत्त्वज्ञान पुरुषांनी मांडले; मात्र ते अर्ध्या जगाचेच झाले. स्त्रीवाद ही अशा जगाकडे पाहण्याची एक दृष्टी आहे. म्हणूनच तिच्या नजरेतून तयार झालेल्या चित्रपटांमधून वेगवेगळ्या संवेदना व्यक्त होतात,'' असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. पुष्पा भावे यांनी व्यक्त केले.

आशय व आयाम यांच्यातर्फे आयोजित 'स्त्री मुक्ती' संकल्पनेवर आधारित 'महिला चित्रपट महोत्सवा'चे उद्घाटन झाले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, आशयचे वीरेंद्र चित्राव, सतीश जकातदार,फडणीस इन्फ्रास्ट्रक्चरच्या अनुराधा फडणीस, चित्रपट संग्रहालयाचे किरण धिवार या वेळी उपस्थित होते.

पंचाहत्तरीनिमित्त विद्या बाळ यांचा सत्कार करण्यात आला.

पत्रकार प्रतिभा चंद्रन यांना 'आयाम पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. भावे म्हणाल्या, ''जगाच्या इतिहासात केवळ पुरुषांनाच व्यक्त होता येते असे चित्र मांडले तर स्त्रीने व्यक्त होणे म्हणजे सार्वजनिक अवकाशात पाऊल टाकण्यासारखे असल्याचे




**हिरवा चाफा** **१४वी आवृत्ती**

**वि. स. खांडेकर**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील जीवनपद्धतीतील बदलांचा पट मांडणारी कादंबरी

**१७०रु. पोस्टेज २५रु.**

समजले जाते. गरीब, परिस्थितीला बळी पडलेली अशा स्वरूपात स्त्रियांना नाटक, सिनेमात दाखविले जात होते. हे चित्र आता बदलत आहे. जगाविषयीचे जे दर्शन आहे ते बदलले तर कॅमेरा, अभिनय व चित्रपटातील कालसंकल्पना बदलेल.''

विद्या बाळ म्हणाल्या, ''आताच्या काळात वृत्तपत्रे ही श्रीमंत आहेत. आम्ही आर्थिक कोंडीतही स्वातंत्र्य भोगत आहो. पत्रकारितेत मेहनती व चांगली माणसे आहेत; परंतु वैचारिक भूमिकेची बांधिलकी असणाऱ्यांची उणीव भासते.''

विद्या बाळ यांच्या जीवनावर आधारित लघुपटाचे सादरीकरण या वेळी करण्यात आले. त्यानंतर 'द डे आय बिकेम अ वुमेन' या इराणी चित्रपटाने महोत्सवास प्रारंभ झाला.

*** 'आयटी'च्या वापरात महिला मागे**

आयटीच्या क्षेत्रात महिला नोकरदारांची संख्या वाढत असली तरी, मोबाईलच्या वापरात महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा १२ टक्के कमी असल्याचे ताज्या अहवालातून उघड झाले आहे.

इंटरनेटच्या वापरातही महिला मागेच आहेत. एकूण युजर्सच्या केवळ १७ टक्के वापर महिला करतात. महिलांबाबत इंटरनॅशनल सेंटर फॉर रिसर्च ऑन विमेन (आयसीआरडब्लू) यांनी केलेल्या पाहणीतून ही आकडेवारी उघड झाली आहे. अन्य उद्योगांपेक्षा आयटी क्षेत्रात महिलांचे प्रमाण ३५ टक्के आहे. ही आकडेवारी २००८ मधील असून, २०१०-२०११ मध्ये हे प्रमाण ४५ टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज पाहणीनंतर व्यक्त करण्यात आला होता. २८ टक्के महिलांकडे स्वत:चे मोबाइल आहेत. पुरुषांच्या बाबतीत हे प्रमाण ४० टक्के आहे. २० टक्के महिला इतरांचा मोबाइल वापरतात. मोबाइल वापरणाऱ्या एकूण महिलांपैकी ६३ टक्के महिला शहरी भागात वास्तव्य करतात. भारतातील ३० शहरांत तीन कोटी २० लाख यूजर्सची २००७ मध्ये नोंद आढळली. त्यातही स्त्री-पुरुष असमानता आढळली आहे. ग्रामीण भागात सुरू असलेल्या विविध स्वयंरोजगारात महिलांचा सहभाग २६ टक्के आहे, तर शहरी भागांत तो केवळ १४ टक्के आहे. उद्योग, व्यवसायातील महिलांचा टक्का २००४-०५ आणि २००९-१० या वर्षांत घटला होता, असेही पाहणीतून उघड





**द मॅजिक ऑफ थिंकींग बिग** **७वी आवृत्ती**

**डेव्हिड जोसेफ श्वार्झ** अनु. प्रशांत तळणीकर

उच्च ध्येय गाठण्यासाठी तुमचे बोट धरून नेणारा महान मार्गदर्शक

**२००रु. पोस्टेज ३०रु.**

झाले आहे.

*** 'ॲपल'चा ४ जी आयपॅड थ्री लाँच**

टॅब्लेट पीसीचा जनक असलेल्या ॲपल या कंपनीने आयपॅड या टॅब्लेट पीसीचे ४ जी वर आधारित आयपॅड थ्री मॉडेल लाँच केले. मात्र, भारतात हा टॅब यायला वेळ लागणार आहे. आयपॅड वायफाय आणि आयपॅड वायफाय ४ जी ही दोन व्हर्जन यात असून, किंमत अनुक्रमे ६२९ आणि ८२९ डॉलर आहे. कंपनीने जुन्या टॅबच्या म्हणजे आयपॅड टूच्या किंमतीत कपात केली असून, तो १०० ते ३९९ डॉलरना मिळणार आहे. भारतात मात्र आयपॅडच्या किमतीत कपात करण्यात आलेली नसून, २८ हजार ५०० ते ४७ हजार रुपयांना उपलब्ध आहे.

कंपनीने सुरुवातीस अमेरिकेसह ऑस्ट्रेलिया, कॅनडा,फ्रान्स, जर्मनी, हाँगकाँग, जपान, सिंगापूर, ब्रिटन आदी देशांत उपलब्ध करून दिला आहे.

गेल्या वर्षी या टॅबच्या विक्रीमुळे कंपनीला पंचवीस अब्ज डॉलरचे उत्पन्न मिळाले होते. मॅक कम्प्युटर्सचे विक्रमही या टॅबने मोडले आहेत. जगातील टॅब या सेगमेंटमध्ये आयपॅडचा हिस्सा ६० टक्क्यांहून अधिक आहे.

ई-मेल, वेबवर सर्व नोट लिहिणे, व्हाइस डिक्टेशन याची सोय आहे. त्यामुळे एखादी गोष्ट लिहण्याऐवजी कीबोर्डवरील मायक्रोफोनचा पर्याय निवडा. जे काही लिहायचे ते बोला आणि त्यानंतर 'डन'चा पर्याय क्लिक केल्यावर बोलण्याचे रूपांतर आयपॅडवर शब्दांत होईल. अन्य ॲपवरही डिक्टेशनची सुविधा काम करते. त्यामुळे फेसबुकवरील स्टेटस अपडेट करा, विचार शेअर करा किंवा ट्विटरवर फीड शेअर करा.

४ जी वेगवान नेटवर्कवर वेगाने डाउनलोडिंग, व्हिडीओ, ब्राउजिंग करणे शक्य. ४जी नेटवर्क नसताना किंवा ज्या ठिकाणी हे नेटवर्क नाही, अशा ठिकाणी हे नेटवर्क नाही, अशा ठिकाणी ३ जी नेटवर्कशी कनेक्टिव्हिटी शक्य.

*** एक दिवस गझलेचा**

प्रसिद्ध गझलकार सुरेश भट यांच्या तिथीनुसार स्मृतिदिनाचं औचित्य साधून





**छत्रपती राजर्षी शाहू महाराज** ६वी आवृत्ती

**तु. बा. नाईक**

पुरोगामी विचारांना आचाराने दृढमूल करणाऱ्या लोकनेत्याचा एकमेव चरित्रग्रंथ

**१३०रु. पोस्टेज २५रु.**

गझलोत्सवाचं आयोजन केले. या गझल कार्यक्रमाला प्रसिद्ध गझलकार बशर नवाज, किशोर पटे, राम पंडित, मधुकर निराळे, सुरेश खोपडे, आप्पा ठाकूर,संदीप माने आदींची उपस्थिती होती.

'उज्ज्वल पुण्याची, नव्या दमाची' हा पुण्यातील नव्या कलावंतांचा मुशायऱ्याचा कार्यक्रम पार पडला.यात वैभव जोशी, चित्तरंजन भट, ह.भा. शिंदे, वैभव देशमुख, नचिकेत जोशी, मनीषा नाईक, सुप्रिया जाधव, मिलिंद, निशिकांत देशपांडे, ममता सपकाळ गझलकार सहभागी झाले होते. श्रृंगारिक,सामाजिक, विनोदी अशा वेगवेगळ्या गझला पेश करण्यात आल्या.

'मी वेड्यांच्या जत्रेमध्ये मांडून बसलो पाल,
बघता बघता थकलो मी अन् वाया गेला माल.'


अशा गझलेतून काही विचार, विसंगती मांडण्याचा प्रयत्न या गझलकारांनी केला होता. तर काहींनी परस्पर संबंध, प्रेम, भवतालचं वातावरण आदींवर टिप्पणी करणाऱ्या गझला सादर केल्या. 'दु:खालाही घट्ट उराशी घेतो आणि त्याची सुंदर कविता करता येते' अशी भावनाही व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटच्या सत्रात संगीतकार कौशल इनामदारने स्वत: संगीतबद्ध केलेल्या सुंदर गझला पेश केल्या. त्याला कल्याणी पांडे-साळुंखे यांनी गायनसाथ, तर आदित्य ओक आणि विनायक नेटके यांनी संगीतसाथ केली.

*** द लव्ह कलेक्शन**

ग्रे ओक वेस्टलँड आणि लँडमार्क यांच्या तर्फे एक लघुकथा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात देशभरातून अनेकजण सहभागी झाले. एकूण २७ लेखकांच्या ३१ प्रेमकथांचा समावेश असलेल्या द लव्ह कलेक्शन या पुस्तकाचं प्रकाशन नुकतंच पुण्यातील लँडमार्क बुकस्टोअर इथं झालं.

संपादक स्नेह ठाकूर म्हणाल्या, 'खरं सांगायचं, तर यातले २२ लेखक नवीन आहेत. यापूर्वी कोणत्याही विशिष्ट पद्धतीच्या लेखनातून ते फारसे ओळखीचे नाहीत. या पुस्तकात अशा नव्या लेखकांचा आणि नव्या विषयांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे.' प्रकाशनप्रसंगी 'अर्बन शॉट्स लव्ह कलेक्शन'वर आधारित 'रिश्ता' ही

**ती दोघं** **२री आवृत्ती**

**डॉ. रमा मराठे**

वेगवेगळ्या स्वभावांची, वेगवेगळ्या काळातील, नातं एकच. पती-पत्नी, नर-मादी, प्रियकर-प्रेयसी पण भावबंध अनेकविध. भावना त्याच आदिम.

**१३०रु. पोस्टेज २५रु.**

शॉर्ट फिल्मही दाखवण्यात आली.

*** नाशिकमध्ये कुसुमाग्रज जन्मशताब्दी सांगता सोहळा**

प्रभू रामचंद्राच्या वास्तव्याप्रमाणेच तात्यासाहेबांचे वास्तव्य हा नाशिकचा ठेवा आहे. त्यांच्या रूपाने साहित्य व सांस्कृतिक वारसा लाभला. त्यांनी साहित्य क्षेत्रात केलेले कार्य विसरता येणार नाही. कुसुमाग्रज हे चैतन्य देणारे आदराचे स्मृतिस्थान आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री छगन भुजबळ यांनी कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यात केले.

जन्मशताब्दी समारोह समितीचे अध्यक्ष व माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, कवी मंगेश पाडगावकर, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, उपाध्यक्षा रंजना पाटील, कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर, लोकेश शेवडे, आमदार हेमंत टकले आदी उपस्थित होते.

श्री. भुजबळ म्हणाले, ''कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ मिळाले त्यावेळी मी मुंबईचा महापौर होतो. त्यांच्या सूचनेनुसार माटुंगा येथे नाट्यमंदिर उभारले. त्यांचा जन्मदिन मराठी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने सादर केलेले कार्यक्रम पुढेही सुरू ठेवले तर मराठी भाषेचा उत्कर्ष होईल, त्यासाठी शासनातर्फे प्रोत्साहन मिळेल.''

*** विविध बोलींमधील शब्दांच्या संग्रहाचा प्रकल्प सुरू**

मराठीची ज्ञानभाषेच्या दिशेने वेगाने वाटचाल होण्यासाठी आणि त्यामधील शब्दांचा संचय वाढविण्यासाठी मराठीच्या विविध बोलींचा साहित्य संस्कृती महामंडळाने अभ्यास सुरू केला आहे. त्याच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील चार विद्यापीठांकडे बोलीभाषांतील शब्द गोळा करण्याचा प्रकल्प सोपविण्यात आला आहे.

महाराष्ट्रात मालवणी, आगरी, वऱ्हाडी, अहिराणी, खानदेशी, झाडी आदी विविध बोलीभाषा आहेत. विविध भौगोलिक टापूत त्या वापरल्याही जात आहेत. त्यांमधील शब्द त्या त्या भागांतील प्रमाणभाषेतही डोकावतात. मात्र, या सर्व बोलीभाषांतील शब्दांचा एकत्रित संग्रह नाही. तो करण्यासाठी आणि त्याद्वारे मराठीचे


**भारतीय साहित्यिक** २री आवृत्ती
**डॉ. सुनीलकुमार लवटे**
विविध भारतीय भाषांतील निवडक पंचवीस साहित्यिकांचा समीक्षेच्या अंगाने साक्षेपी परिचय
**१४०रु. पोस्टेज २५रु.**

शब्दवैभव वाढविण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे साहित्य संस्कृती महामंडळाचे कार्याध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी सांगितले.

'बोलीभाषांबाबत आपल्याकडे विशेष संशोधन झालेले नाही. वास्तविक संस्कृती जिवंत राहण्यात बोलीभाषांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे त्या जिवंत ठेवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी त्यांमधील शब्द, वाक्प्रचार, म्हणी जाणून घेणे आवश्यक आहे. या गरजेच्या पूर्ततेसाठी आम्ही योजना आखली. मात्र, यासाठीचे मनुष्यबळ आणि प्रावीण्य नसल्याने त्या त्या विद्यापीठांना प्रकल्प दिले असून प्रकल्प कशा प्रकारे पूर्ण करावा, याचे स्वातंत्र्य विद्यापीठांना दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुंबई विद्यापीठात आगरी आणि मालवणी या भाषांचा अभ्यास सुरू आहे. अहिराणीसाठीचे काम उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरू आहे. अमरावती विद्यापीठात वऱ्हाडी भाषेचा अभ्यास सुरू असून, या विद्यापीठाने त्यासाठी ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ यांची नियुक्ती केली आहे. याकरिता वाघ यांनी विदर्भातील ३३ तालुक्यांमध्ये शब्दयात्रा काढली आणि शब्द गोळा केले. वाघ म्हणाले, 'बोलीभाषांना बहिष्कृत केल्याने आपला शब्दसंग्रह तोकडा झाला आहे. वास्तविक प्रमाणभाषेपेक्षा बोलीभाषा जास्त समृद्ध आहे. सर्व बोलीभाषांतील शब्द एकत्र केल्यास त्यांची संपन्नता प्रमाण मराठी भाषेतही येईल.'

बोलीभाषांचा अभ्यास वाढविण्यासाठी बोलीभाषा अकादमी स्थापण्याचा प्रस्ताव असल्याचे मधु मंगेश कर्णिक यांनी सांगितले. त्याचबरोबर या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील अन्य विद्यापीठांचाही समावेश करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मराठीतील वचनकोश, महाशब्दकोश आणि नाट्यसंज्ञाकोश यांबाबतचे प्रकल्प चालू असल्याचे साहित्य संस्कृती महामंडळाचे माजी सचिव सुरेश वांदिले यांनी सांगितले.

*** डॉ. मुणगेकर 'शांतिनिकेतन'वर**

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेल्या विश्वभारती विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर राज्यसभा सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांची निवड झाली आहे.





**सिलेक्टिव्ह मेमरी** **७वी आवृत्ती**

**शोभा डे** अनु. अपर्णा वेलणकर

एका विलक्षण स्त्रीच्या संपन्न, सकस अनुभवविश्वाचं दर्शन घडवणाऱ्या हृद्य आठवणी

**३९०रु. पोस्टेज ३०रु.**

विश्वभारती विद्यापीठाच्या नियमानुसार एका राज्यसभा सदस्याची त्यांच्या कार्यकारिणीवर नेमणूक करता येते. त्याप्रमाणे उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांनी ही नेमणूक केली. डॉ. मुणगेकर १५ डिसेंबर २०१३ पर्यंत या पदावर राहतील. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू राहिलेले मुणगेकर शिमलास्थित भारतीय उच्च अध्ययन संस्थेचे सहा वर्षांहून अधिक काळासाठी अध्यक्ष होते. योजना आयोगाचेही ते सदस्य होते.

*** 'मृत्यूपूर्वीची मुलाखत'**

चीनच्या हेनान प्रांतात कोट्यवधी लोक एक टीव्हीवर खास कार्यक्रम बघतात. त्या कार्यक्रमाचे नाव आहे 'इंटरव्ह्यूज बिफोर एक्जीक्यूशन' अर्थात मृत्युपूर्वीची मुलाखत' या कार्यक्रमामध्ये ज्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे अशा खून केलेल्या आरोपींशी अँकर 'डिंग यू' ही बोलते. हा कार्यक्रम हेनन्सवरच्या टॉप टेन कार्यक्रमामधला एक आहे. दर सोमवारी सकाळी 'डिंग यू' आणि तिचे सहकारी कार्यक्रमासाठी कोर्टाच्या फाइलमधून खटले शोधतात. कारण या कैद्यांना शिक्षा सुनावल्यानंतर एक आठवड्यात फाशी दिली जाऊ शकते. चीन मध्ये खून, लाचखोरी, देशद्रोह, तस्करी अशा ५५ गुन्ह्यांसाठी फाशीची शिक्षा दिली जाते. काही लोकांनी या कार्यक्रमावर टीका केली आहे, पण डिंग म्हणते यातल्या काही गुन्हेगारांनी मला सांगितले की, 'आम्ही तुमच्याशी अनेक गोष्टी बोलू शकलो. त्यामुळे आम्हाला खूप मोकळे वाटते आहे.'

'शिक्षा झालेले काही लोक इतके तरुण होते की त्यांच्याकडे बघून वाटले यांना पुढे कधीच जग बघायला मिळणार नाही. आयुष्य उपभोगायला मिळणार नाही. त्यांनी चुकीचे पर्याय निवडले आणि त्यांचे आयुष्य बरबाद झाले.

१८ नोव्हेंबर २००६ रोजी पहिल्यांदा हा कार्यक्रम हेनान लीगल चॅनेलवर दाखवण्यात आला. तेव्हापासून दर आठवड्याला एका कैद्याचा इंटरव्ह्यू घेतला. जीवन मौल्यवान आहे, याची लोकांना जाणीव करून देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

*** मंगेश पाडगावकर 'महाराष्ट्र भूषण'**

'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे...' असा मंत्र देणारे कविवर्य मंगेश





**झटपट व्यक्तिमत्त्वविकास** **५वी आवृत्ती**

**संजीव परळीकर**

या पुस्तकातल्या सूचना आमलात आणल्या तर यश तुमच्याच हातात, अगदी झटपट!

**६०रु. पोस्टेज २०रु.**

पाडगावकर यांची कविता जगण्यासाठी नवे बळ देणारी, ऊर्मी देणारी आहे', असा गौरव करीत ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित जसराज यांनी पाडगावकर यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान केला. निमित्त होते 'महाराष्ट्र टाइम्स' आयोजित 'राम बंधु मटा सन्मान २०१२'च्या दिमाखदार सोहळ्याचे. काश्मीरमधील अनाथ मुलींच्या भल्यासाठी झटणाऱ्या अधिक कदम या तरुणास पहिल्याच 'युथ आयकॉन' पुरस्काराने याच सोहळ्यात गौरवण्यात आले.

महाराष्ट्रातील सांस्कृतिक वर्तुळात, तसेच चित्रपट, नाटक, टीव्ही या क्षेत्रांत मानाचे स्थान असलेला 'राम बंधु मटा सन्मान' सोहळा 'आयटीसी ग्रँड मराठा' हॉटेलात मोठ्या दिमाखात साजरा झाला. या वेळी पाडगावकर यांनी उपस्थितांशी संवाद साधताना 'या सन्मानाचा खूप आनंद होत आहे,' अशा भावना नोंदवल्या. मी 'मटा'चा पहिल्या अंकापासून वाचक आहे, असे सांगून त्यांनी 'मटा'शी असलेले जिव्हाळ्याचे संबंध उलगडले.

*** रमा-श्रीधर स्मृती पुरस्कार सोहळा**

आज समाजात निःस्वार्थपणे समाजकार्य करणाऱ्या लोकांची मोठी संख्या आहे. हे समाजाचे भाग्यच आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

रमा-श्रीधर स्मृती न्याय या संस्थेद्वारे दिला जाणारा 'रमा-श्रीधर स्मृती' पुरस्कार जलसाक्षर कार्याबद्दल डॉ. दत्त देशकर व मागासवर्गीय समाजातील मुलांच्या शिक्षण कार्याबद्दल डॉ. धर्मराज साठे यांना देण्यात आला. स्वारगेट येथे अनेकांना चिरडणाऱ्या एसटी चालक संतोष मानेला पकडणाऱ्या शरीफ कुट्टीचा सत्कार करण्यात आला. प्रमोद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन, डॉ. शरद कुंटे यांनी आभार मानले.

*** मराठीचे ४५३ संगीतकार 'कोशबद्ध'**

जाहीर समारंभाचे व्यासपीठ टाळणारे संगीतकार... प्रकाशात न येणारे संगीतकार... यशाचे श्रेय न घेणारे संगीतकार... यांच्यासह नावाजलेल्या तब्बल ४५३ संगीतकाराचा समावेश असलेला कोश प्रथमच तयार झाला आहे. त्याचे प्रकाशन प्रभाकर जोग, अशोक पत्की आणि आनंद मोडक या तीन संगीतकारांच्या उपस्थितीत झाले.





**महोत्सव** **१०वी आवृत्ती**

**व.पु. काळे**

हा एक प्रकारे वपुंच्या लेखनाचाच महोत्सव आहे.

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

प्रतीक प्रकाशनातर्फे हा प्रकाशन सोहळा आयोजित केला होता. या प्रसंगी कोशाचे लेखक मधू पोतदार आणि अ.भा. चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष प्रसाद सुर्वे उपस्थित होते. पत्की म्हणाले, 'कोश तयार करणे हा कटकटीचा विषय आहे. इतिहास समजण्यास कोश उपयोगी ठरतात.'

मोडक म्हणाले, 'ध्यास, कामावर निष्ठा आणि उत्तमतेची निष्ठा असेल तरच असे कोश तयार होऊ शकतात. कोश काही वर्षांत तयार होत नसतात, त्यासाठी आयुष्य वेचावे लागते.'

पोतदार म्हणाले, 'एका-एका संगीतकारावर पूर्ण ग्रंथ लिहावा, इतक्या ताकदीचे कलावंत मराठी चित्रपटसृष्टीत होऊन गेले. त्यांची दखल योग्य वेळी घ्यायला हवी.' 'कलावंताचा मृत्यू झाल्यानंतरच त्याची दखल का घेतली जाते. जिवंत असेपर्यंत त्याचे माठेपण का समजत नाही,' असा प्रश्न मोडक यांनी उपस्थित केला.

*** पदवी अभ्यासक्रमांत ३० टक्के भर व्होकेशनल कोर्सेसवर**

केवळ पुस्तकी शिक्षणावर भर न देता पूरक अशी व्यावसायिक कौशल्ये विद्यार्थ्यांना देण्याच्या हेतूने पदवी अभ्यासक्रमात व्होकेशनलचा समावेश करण्याची केंद्राची योजना आहे. त्यानुसार सर्व प्रकारच्या पदवी शिक्षणातील तीस टक्के भाग व्यावसायिक अभ्यासक्रमांशी जोडण्याची सूचना बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या उच्च शिक्षणासाठीच्या उद्दिष्टपत्रात करण्यात आली आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात नोकरी-व्यवसायाच्या संधी अफाट वाढत असल्या तरी दुसरीकडे पदवीपर्यंतच्या पुस्तकी अभ्यासाने मिळालेल्या डिग्रीच्या प्रमाणपत्राचे मूल्य घटत आहे. या पार्श्वभूमीवर पदवीसोबतच व्हॅल्यू ॲडिशन म्हणून विशेष व्होकेशनल कोसेर्सचा अभ्यासक्रमातच समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

व्होकेशनल कोसेर्सचे स्वरूप ठरवताना भारतासह अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया या परदेशी बाजारपेठांत उपलब्ध संधींचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यानुसार मीडिया कम्युनिकेशन, इन्फर्मेशन कम्युनिकेशन टेक्नोलॉजी, टुरिझम, मेडिकल अँड हॉस्पिटॅलिटी, टेस्टिंग, मॅन्युफॅक्चरिंग अँड प्रॉडक्शन अशा पदवी अभ्यासक्रमाला पूरक ठरणाऱ्या कोसेर्सचा अंतर्भाव केला जाणार आहे.

हे कोसेर्स घेणाऱ्या खासगी संस्था सध्या देशात मोठ्या प्रमाणात असल्या, तरी त्यांचे शुल्क, दर्जा याबाबत मोठे प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे विद्यापीठांनी खासगी संस्था, उद्योगांशी भागीदारीतून हे कोर्सेस सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.

दिल्लीमध्ये जर्मनीच्या सहाय्याने १०० नवीन इंडस्ट्री ट्रेनिंग इन्स्टिटयूट सुरू होत आहेत. याशिवाय अमेरिका, जपान, ब्राझील, ऑस्ट्रेलिया या देशांशीही उच्च

शिक्षणातील विविध क्षेत्रांमध्ये भारताचे करार झाले आहेत.

पुणे विद्यापीठानेही या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. बीए, बीकॉम, बीएस्सी या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्यांसाठीचे अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. पहिल्या टप्प्यात सर्व कॉलेजांमध्ये संवाद कौशल्याचे कोसेर्स सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

*** ॲपलचा नवा 'रिझोल्युशनरी आयपॅड'**

'आयफोन फोर एस'प्रमाणे सुस्पष्ट स्क्रीन असणारे 'नवीन रिझोल्युशनरी आयपॅड' अमेरिकेबरोबरच इतर १० देशांच्या बाजारपेठांत उपलब्ध झाला आहे. मानवी मेंदू प्रमाणे वेगात काम करू शकणारा नवीन प्रोसेसर आणि त्याला जोरदार पाठबळ देणारी अधिक क्षमतेची बॅटरी हे या नव्या आयपॅडचे खास वैशिष्ट्य आहे.

दिसताक्षणी त्यातील नावीन्य जाणवावे, असा कोणताही दृश्य बदल आयपॅडच्या रचनेत केलेला नाही. असे असले तरी त्याचे रिझोल्युशन वाढविण्यात आले आहे. यापूर्वी आयफोनच्या चौथ्या आवृत्तीसाठी ॲपलने अशा प्रकारचा सुस्पष्ट डिस्प्ले असलेले रिझोल्युशन वापरले होते. याशिवाय दुसरा महत्त्वाचा भाग हा नवीन प्रोसेसरमध्ये आहे. मेंदूच्या वेगात काम करू शकणारा प्रोसेसर, असे त्याचे वर्णन ॲपलने केले आहे. त्या वेगात काम करण्यासाठी त्याला अधिक ऊर्जा लागणार हे गृहीत धरून नव्या बॅटरीची क्षमताही ७० टक्क्यांनी वाढविण्यात आली आहे. एरवी ही बॅटरी पूर्वीच्या आयपॅडसाठी वापरल्यास नियमित १० तासांऐवजी १७ तास काम करू शकेल. मात्र वाढविण्यात आलेले स्क्रीनचे रिझोल्युशन आणि नवीन वेगवान प्रोसेसर यामुळे बॅटरीची क्षमता वाढल्यानंतरही ती ऊर्जा त्यात खर्च होणार असल्याने ही बॅटरीदेखील १० तास पुरेल एवढीच असेल. बॅटरीवर काम करण्याचे तास वाढवायचे की रिझोल्युशन यात ॲपलने रिझोल्युशनचा पर्याय निवडला आहे. या नव्या आयपॅडची किंमत ४९९ अमेरिकन डॉलर्स आहे. मात्र यापूर्वीच्या आयपॅडच्या किमती १०० डॉलर्सने कमी करण्यात आल्या आहेत. टॅब्लेटच्या बाजारपेठेत ॲमेझॉन, सॅमसंग आदींनी कमी किमतीतील आवृत्त्या बाजारात आणून ॲपलला स्पर्धा निर्माण केली आहे. आता आयपॅडच्या मूळ आवृत्तीच्या किमती १०० डॉलरने कमी केल्याने बाजारपेठेत आपले स्थान पक्के करता येईल, असा ॲपलचा कयास आहे.

*** ई-निरागसचे प्रकाशन**

'निश्चित भूमिका असलेल्या दिवाळी अंकांची संख्या आजकाल कमी झाली आहे. दिवाळी अंकांकडे केवळ उत्पादन म्हणून पाहिले जाते आहे. त्यातील सर्जनशीलता, प्रतिभा आणि साहित्यातील अभिजातपणा कमी होऊ लागला आहे. त्यामुळे दिवाळी अंकांची परंपरा समृद्ध करणे हे यापुढचे आव्हान आहे. लेखकांची लेखनावरची निष्ठा

कमी झाली आहे.' असे मत 'मौज'च्या संपादिका आणि कथाकार मोनिका गजेंद्रगडकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे आयोजित कार्यक्रमात 'ई-निरागस' या मसापच्या पहिल्या ई-बुकचे प्रकाशन आणि दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. मोनिका गजेंद्रगडकर, धनंजय दातार, मसापच्या कार्यवाह डॉ. माधवी वैद्य, मिलिंद जोशी उपस्थित होते.

दिवाळी अंक स्पर्धेत ललित, इत्यादी, अनुभव, पुरुष स्पंदनं, माऊस, लेखक संतोष शिंत्रे यांची कथा गुलाबी सिर, पिंक हेडेड डक, लक्ष्मण लोंढे यांची कथा निसर्गाची रंगपंचमी यांना पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून संजय भास्कर जोशी, वंदना बोकील-कुलकर्णी यांनी काम पाहिले.

'आम्हीही लिहितो असे सांगणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. लेखक झाल्याच्या थाटात साहित्य लिहिले जाते सर्जनशीलता शोधावी लागते आहे. लेखकांची लेखनावरची निष्ठा कमी झाली आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले.

*** राजा परांजपे यांचे चित्रपट**

दिग्दर्शक व अभिनेते राजा परांजपे यांच्या पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात असलेल्या शंभरपेक्षा अधिक चित्रपटांपैकी बहुतांश नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, अशी माहिती त्यांची नात अर्चना राणे यांनी दिली. त्यांनी स्थापन केलेल्या 'राजा परांजपे प्रतिष्ठान'तर्फे यातील काही चित्रपटांचे डिजिटलायझेशन सुरू झाले असून, दहा सर्वोत्तम चित्रपट जतन करण्यात येणार आहेत. मात्र या कामात त्यांना निधीची चणचण भासत आहे.

राजा परांजपे यांनी १९४८ ते १९७५ या कालावधीत शंभरहून अधिक चित्रपटांसाठी काम केले. त्यातील २८ चित्रपटांचे दिग्दर्शन केले, तर दहाहून अधिक चित्रपटांचे ते निर्माते होते. त्यांनी मराठी, हिंदी आणि दक्षिणेतील चित्रपटांमध्ये काम केले. राणे म्हणाल्या, 'बॉम्बे स्टुडिओला आग लागल्यानंतर परांजपे यांचे सर्व चित्रपट पुण्यातील संग्रहालयात हलवण्यात आले. काळाच्या ओघात या चित्रपटांची रिळे खराब झाली आहेत. त्यातच ते नाईट-राइट बेस मटेरिअलचे असल्याने त्याचा भुसा होणे, फॉगसारख्या समस्या येत आहेत. आम्ही आयोजित करत असलेल्या महोत्सवात त्यांचे चित्रपट दाखवताना रेघा येणे किंवा दृश्ये तुटण्यासारखे प्रकार घडत आहेत. या चित्रपटांचे वेळीच जतन न केल्यास ते कायमचे नष्ट होण्याचा धोका आहे.'

संग्रहालयातर्फे हिंदी आणि मराठी चित्रपट जतन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी केंद्र सरकारकडून निधी पुरविला जातो. मात्र राजा परांजपे यांच्या चित्रपटांचा नंबर कधी येणार हे कळत नाही. त्यामुळे त्यातील दहा चित्रपटांचे

डिजिटलायझेशन आणि रिस्टोरेशन करण्याचा निर्णय प्रतिष्ठानतर्फे घेण्यात आला आहे. चित्रपटाच्या डिजिटलायझेशनसाठी एक लाख आणि जतनासाठी आठ लाखांपर्यंत खर्च येतो. एका चित्रपटाचे काम पूर्ण करतानाच आमचा निधी संपत आला आहे. परांजपे यांच्या गाण्यांचे विविध कार्यक्रम करुन त्याचे उत्पन्न या कामासाठी वापरले जात आहे. राज्य सरकारने या कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्यास रीळ वाचविण्यात मदत होणार आहे.

❒



**आगामी**


अनलाइकली हिरो

# ओम पुरी

**नंदिता सी. पुरी**

अनुवाद

**अभिजित पेंढारकर**




'अनलाइकली हिरो' या पुस्तकात ओम पुरी यांचे खासगी आयुष्य, त्यांनी केलेला संघर्ष, त्यांची अस्वस्थता, त्यांच्या हृदयातील वेदना यांचे दर्शन घडते. पंजाबातून डोळ्यांत स्वप्ने घेऊन आलेला मुखदुर्बळ कलाकार, 'एनएसडी'मधील जातिवंत 'फ्लर्ट', खाण्याचा शौकीन व उत्तम कूक आणि पूर्णतः कुटुंबवत्सल माणूस! ओम पुरी यांची ही विविध रूपे या पुस्तकात पाहायला मिळतील. कुटुंबातील सदस्यांबरोबरच्या गमतीदार प्रसंगांची मालिका, भारतीय आणि ब्रिटिश चित्रपटसृष्टीतील व्यक्तींच्या सहवासातील अनेक धक्कादायक घडामोडी, प्रेमप्रकरणांतील रहस्य यांचा उलगडा या पुस्तकातून होईल.

अतिशय दुर्मीळ आणि वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रांचाही आस्वाद घेता येईल. मार्मिक, प्रामाणिक आणि उत्साहपूर्ण शैलीत लिहिलेली कहाणी.


'सिटी ऑफ जॉय' या चित्रपटात ओम पुरींसोबत काम केलेल्या पॅट्रिक स्वेझ या दिवंगत अभिनेत्याने त्यांचा त्याच्या आयुष्यावर पडलेला प्रभाव पुस्तकात सांगितला आहे. प्रसिद्ध समीक्षक डेरेक माल्कम यांनी ओम यांची अफाट गुणवत्ता आणि कलेचा प्रचंड परीघ यांचा आढावा घेतला आहे.

नसीरुद्दिन शाह यांनी 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'पासून सुरू झालेल्या त्यांच्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांच्या क्षितिजावर ओम पुरी या ताऱ्याचा उदय होण्याची कहाणीही पुस्तकात वाचायला मिळेल.

**आगामी**




संपादक **प्रदीप ठाकूर/ पूजा राणा**

अनुवाद

**धनंजय बिजले**

भारतीय राजकारणातील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुकारलेल्या लढ्याचा सर्वांगीण ऊहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध कडक पावले उचलण्यासाठी, भ्रष्ट नोकरशहांना लगाम घालण्यासाठी आतापर्यंत कोणती विधेयके आणण्यात आली याचा इतिहास या पुस्तकात मांडण्यात आला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध कडक कायदा आणण्यात ज्यांनी अडथळे आणले त्यांच्याविरुद्ध समाजाचा असलेला रागसुद्धा येथे प्रकट करण्यात आला आहे.

समाजाच्या संतापाचे अण्णा हजारे यांनी व्यापक जनआंदोलनात रूपांतर केले. यामुळे यासंदर्भातील विधेयक संसदेत मांडणे किती तातडीचे आणि आवश्यक आहे, हे खासदारांना उमगले. सार्वजनिक क्षेत्रात भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांविरुद्ध कारवाई करण्यास सध्याच्या कायद्यात कशा त्रुटी आहेत, यावरही हे पुस्तक प्रकाश टाकते.

अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिद्धी या गावातील यादवबाबा मंदिरास लागून असलेल्या एका छोट्या खोलीत अण्णा राहतात आणि केवळ खादी परिधान करतात. मात्र अण्णा हजारे जेव्हा आंदोलन सुरू करतात तेव्हा मुंबईपासून दिल्लीपर्यंत सर्व नेत्यांना त्याची दखल घ्यावीच लागते. देशभरातील सामान्य लोकांना एकत्रित करण्याची आणि सरकारला हादरा देण्याची क्षमता केवळ या एका व्यक्तीमध्ये आहे, ही वस्तुस्थिती त्यांचे विरोधक टीकाकारही मान्य करतात. १९७५मध्ये सार्वजनिक जीवनात आल्यापासून त्यांनी अनेक वेळा उपोषणे, आंदोलने करीत महाराष्ट्र पिंजून काढला. याचा त्यांचा शरीरावर तसेच प्रकृतीवरही परिणाम झाला. मात्र मानवसेवा हे त्यांच्या जीवनाचे ध्येय कायम राहिले. अण्णा हजारे भ्रष्टाचारविरोधी लढ्याचे प्रतीक बनले आहेत. 'आधुनिक भारताचे गांधी' अशीच त्यांची ओळख झाली आहे.




*** आशा बगे यांना दांडेकर पुरस्कार**

लेखिका आशा बगे यांना  साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे मालतीबाई दांडेकर पुरस्कार देण्यात आला. प्रशस्तिपत्र, पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सध्या मालतीबाई दांडेकर यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे. बगे यांच्या चार कथासंग्रहांना राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले आहेत. 'भूमी' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

*** प्रा. लछमन हर्दवाणी यांना सिंधी अकादमीचा पुरस्कार**

सिंधी साहित्यनिर्मिती क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल प्रा. लछमन हर्दवाणी यांना नवी दिल्लीच्या सिंधी अकादमीच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

प्रा. हर्दवाणी यांनी मराठीतील अनेक नावाजलेल्या साहित्यकृती भाषांतरित करून सिंधीत नेल्या. ज्ञानेश्वरीच्या सिंधी भाषांतराचे चांगलेच स्वागत झाले होते. सिंधी-मराठी शब्दकोशही त्यांनी तयार केला.

शब्दकोश, संशोधन व भाषांतराच्या त्यांच्या कामाची यापूर्वीही दखल घेऊन त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

सिंधी अकादमीचे उपाध्यक्ष डॉ. मुरलीधर जेटले यांच्या हस्ते प्रा. हर्दवाणी यांना सन्मानपत्र देण्यात आले. या वेळी प्रा. हर्दवाणी यांनी सिंधीची मूळ लिपी देवनागरी असल्याचे सांगितले. सिंधी भाषेकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल खंत व्यक्त करून, मातृभाषेचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. गोवर्धन शर्मा यांनी सूत्रसंचालन केले.

*** पं. राम नारायण यांना 'टागोर रत्न'**

ज्येष्ठ सारंगीवादक पद्मविभूषण पं. राम नारायण यांना संगीत नाटक अकादमीचा

मानाचा 'टागोर अकादमी रत्न' पुरस्कार देण्यात आला. संगीतातील एकल वादनातील वाद्य म्हणून सारंगी हे वाद्य कीर्ती आणि प्रतिष्ठा पावले. वयाच्या ८५ वर्षी जगभरात सोलो कार्यक्रम करणाऱ्या पं. राम नारायण यांच्या वादनाने संगीतप्रेमींमध्ये गारुड निर्माण केले आहे. फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत त्यांचे सारंगीवादन प्रसिद्धी पावले आहे. साथसंगीतास उपयोगी ठरणाऱ्या सारंगीस त्यांनी एकल वादनाने प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांचे अनेक अल्बम रसिकांमध्ये चांगलेच लोकप्रिय ठरले आहेत.

*** पाडगावकर, माशेलकर यांना जीवन साधना पुरस्कार**

पुणे विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापनदिनानिमित्त कविवर्य मंगेश पाडगावकर आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासह सहा जणांना जीवन साधना गौरव पुरस्कार १० फेब्रुवारीला ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांच्या हस्ते देण्यात आला.

प्रसिद्ध अभिनेते डॉ. मोहन आगाशे, नाना पाटेकर, उत्तम कांबळे आणि कै. डॉ. वसंत पवार यांनाही पुरस्कार देण्यात आले.

*** डॉ. अमर्त्य सेन यांना नॅशनल ह्युमॅनिटीज मेडल**

भारताचे नोबेल विजेते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांना अमेरिकेचे प्रतिष्ठेचे 'नॅशनल ह्युमॅनिटीज सन्मान मेडल' देऊन गौरविले गेले. या सन्मानाची सुरुवात झाल्यापासून गेल्या१६ वर्षांत हे पदक मिळविणारे सेन पहिले भारतीय ठरले आहेत. अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता म्हणून तसेच 'गरीबी, दुष्काळ आणि अन्याय' या विषयी सेन यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली. 'युनायटेड नेशन्स'चा ह्युमन इंडेक्स तयार करण्यातही सेन यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

*** जॉब्ज यांना मरणोत्तर ग्रॅमी पुरस्कार**

'ॲपल'चे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी स्टीव्ह जॉब्ज यांना मरणोत्तर ग्रॅमी पुरस्कार जाहीर झाला आहे. संगीत तंत्रामध्ये केलेल्या क्रांतीबद्दल १२ फेब्रुवारीस रेकॉर्डिंग अभियंता रूडी वान गेल्डर आणि संगीतकार डेव बथरेलोमेव यांच्या साक्षीने या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सर्जनशील जॉब्ज यांनी आयपॉड आणि ऑनलाइन ट्यून्स स्टोअरच्या माध्यमातून संगीताचा प्रसार करण्यामध्ये मोठी क्रांती केली आहे. 'त्यांनी विकसित केलेल्या तंत्रामुळे कोट्यवधी रसिकांपर्यंत संगीताच्या धून पोचणे आणि संगीताचा प्रसार होणे सहज शक्य झाले आहे, तसेच दूरचित्रवाणी, चित्रपट पाहणे आणि पुस्तक वाचण्यासाठीही सहजता निर्माण झालेली आहे', अशा शब्दांत ग्रॅमीच्या संकेतस्थळावर जॉब्ज यांचा गौरव करण्यात आला.

## * धम्मक्रांती पुरस्कार

कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ आदी विषयांतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपण अभ्यासले आहेत. आता तत्त्वज्ञ म्हणून डॉ. आंबेडकर अभ्यासण्याची आणि त्यावर लिखाण करण्याची गरज आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रतनलाल सोनग्रा यांनी व्यक्त केले.

आडकर फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा 'धम्मक्रांती' पुरस्कार देहूरोड येथील धम्मक्रांती केंद्राचे संस्थापक टेक्सास गायकवाड यांना देण्यात आला. कवी म.भा. चव्हाण, मकरंद आडकर व्यासपीठावर उपस्थित होते.

सोनग्रा म्हणाले, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले बुद्ध आणि त्यांचा धम्म हे पुस्तक क्रांती घडवणारे आहे. ज्याला बुद्ध समजला त्यालाच समता, बंधुता, मानवता या मानवी मूल्यांचे महत्त्व समजते. बुद्धांचे विचार हे माणसाला त्याच्या शाश्वत मूल्यांची जाणीव करून देतात. हे विचार तळागाळातील माणसांपर्यंत पोचविण्यासाठी आंबेडकरांनी हे पुस्तक लिहिले.''

गायकवाड म्हणाले, ''रक्ताच्या नात्यापेक्षा वैचारिक नात्यांमध्ये वेगळा आनंद असतो. जातीच्या भिंती ओलांडून धम्मक्रांतीचे बिगुल वाजविणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या धर्मपरिवर्तनाच्या निर्णयावर टीका होते, परंतु हा निर्णय त्यांनी मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र आदी अनेक विषयांचा सखोल अभ्यास करून घेतला होता.''गायकवाड यांनी हा पुरस्कार भीमशाहीर चौरे यांना अर्पण केला. मकरंद आडकर म्हणाले, ''मानवाला धर्माची गरज असते. त्यातून मानवी मूल्ये मिळतात. 'स्वत: प्रकाशमान व्हा,' अशी बौद्ध धर्माची शिकवण असल्याने डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला. बौद्ध धर्म शांततेची शिकवण देतो. मात्र सध्या काही अपवाद वगळता बौद्ध धर्माचा खरा गाभाच आपण विसरत चाललो आहोत.''

## * 'सर्च'ला कदम पुरस्कार

''आदिवासींना बांबू काढण्याचा अधिकार मिळाला आहे; परंतु वनाधिकार मिळाल्यास ते आर्थिक विपन्नावस्थेतून बाहेर येतील. जंगल भागातील वने विरुद्ध शेती असा संघर्ष थांबवायचा असेल, तर आदिवासींना सार्वजनिक वितरण व्यवस्थे मार्फत दुप्पट प्रमाणात आणि कमी किमतीत अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्यांची धान्य पिकविण्याची चिंता मिटली, तर आपोआप जंगलांचे संरक्षण होईल,'' असे मत समाजसेवक डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केले.

अभिजित कदम मेमारिअल फाऊंडेशनतर्फे आयोजित कार्यक्रमात सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल बंग यांच्या 'सर्च' संस्थेला 'वनराई'चे संस्थापक मोहन धारिया यांच्या हस्ते 'मानवता पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्वारगेट दुर्घटने वेळी जीव धोक्यात घालून एसटीचालक संतोष माने याला रोखणाऱ्या शरीफ कुट्टी या युवकालाही मानवता पुरस्काराने गौरविण्यात आले.

यावेळी 'सिंबायोसिस'चे डॉ. शां. ब. मुजुमदार, वनमंत्री पतंगराव कदम, फाउंडेशनचे कार्यकारी विश्वस्त विश्वजीत कदम आदी उपस्थित होते.

बंग म्हणाले, ''स्वातंत्र्य मिळवून साठ वर्षे झाली, तरी आपण महाराष्ट्र धर्म पाळलेला नाही. कारण गडचिरोली भागातील आदिवासींना जगण्यालायक काही दिलेले नाही. आपण ज्या तऱ्हेचा विकास करतो आहोत, त्यासाठी जंगले, आदिम संस्कृती यांचा बळी दिला जातो. भारत जेव्हा महासत्ता बनेल, तेव्हा हा आदिवासी कुठे जाणार आहे? ही आदिवासी जमात जगली, तर प्राणवायू बनविणारी जंगले जगणार आहेत. त्यामुळे सामाजिक भान म्हणून नव्हे, तर स्वार्थ म्हणून त्यांना जगविले पाहिजे.''

गडचिरोली आणि अन्य भागातील नक्षलवादाची समस्या बंदुकीच्या धाकाने नव्हे तर मानवतावादाच्या आधारेच सुटू शकेल, असे सांगून धारिया म्हणाले, ''विकासाचा दर मोजून भारत मोठा होणार नाही, तर मानवी मूल्यांची जोपासनाही विकासाची मोजपट्टी असायला हवी.''


पतंगराव कदम म्हणाले, ''सरकार आदिवासींच्या उन्नतीसाठी प्रयत्न करीत आहे. वनसंपत्तीचे संरक्षण केल्यास त्यातून मिळणारा निम्मा नफा आदिवासींना देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. 'आदिवासी असेल तर वने आणि वने असतील तर आदिवासी' हे आमच्या धोरणाचे सूत्र आहे. आदिवासींसाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद आहे; आदिवासी मात्र तसाच आहे. त्यामुळे हा पैसा गेला कोठे याचा शोध घ्यावा लागेल.''

*** रवींद्र बागडे यांना ग.द. आंबेकर साहित्य पुरस्कार**

राष्ट्रीय मिल मजदूर संघ, मुंबई तर्फे ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र बागडे यांना गृहनिर्माण राज्यमंत्री मा.ना. श्री. सचिनभाऊ अहिर यांच्या हस्ते स्व. गं.द. आंबेकर मार्ग, परळ येथे प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणुन सकाळचे कार्यकारी संपादक पद्मभूषण देशपांडे व अन्य मान्यवर उपस्थित होते. शाल, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, श्रीफळ व वीस हजार रुपयांचा चेक देण्यात आला. सन्मानपत्रामध्ये बागडे यांच्या गटुळं व बोचकं ह्या गाजलेल्या कादंबऱ्यांचा उल्लेख केला आहे.

❒

नवे कोरे




# साल्व्हेशन क्रीक

एक अनपेक्षित जीवन

**सुसान डंकन**/अनुवाद **वसु भगत**

३९५रु. पोस्टेज ३०रु.

'मी जेव्हा एका पत्र्याच्या, पाणी झिरपणाऱ्या होडग्यातून 'लव्हेट बे'ला घर पाहायला निघाले, तेव्हा मला माहीत नव्हतं की, माझा प्रवास सुरू झाला होता. फिकट पिवळा रंग, भक्कम खांब आणि प्रशस्त व्हरांडा असलेल्या उंच खडबडीत टेकडीवरच्या त्या बंगल्यात माझ्या नव्या आयुष्याची पहाट होणार होती.'


हृदयद्रावक, गमतीदार आणि दाहक प्रामाणिक! 'साल्व्हेशन क्रीक' ही अशा एका स्त्रीची गोष्ट आहे, जिच्यात यशस्वी कारकीर्दीचा त्याग करून नव्याने आयुष्य सुरू करण्याची हिंमत आहे.

ही अशा एका स्त्रीची कथा आहे जिच्यात जगण्यासाठी लढताना अडचणींवर मात करण्याचं धैर्य आहे.

परिचित जगापासून दूर अशा छोट्याशा निसर्गरम्य किनाऱ्यावर तिला सापडलेल्या नव्या आयुष्याची – नव्या प्रेमाची रोमहर्षक कहाणी.

नवे कोरे

# ओंकाराची रेख जना





**मंजुश्री गोखले**

२९५रु. पोस्टेज ३०रु.

जनीनं हरिश्चंद्र आख्यानाचा आणि कीर्तनाचा समारोप केला.सगळी इतकी भारावून गेली होती की, कीर्तन संपल्यावर विठूनामाचा गजर करण्याचं भानही कुणाला राहिलं नव्हतं. जनीच्या चेहऱ्यावरचे बधिर भाव बघून नामदेवाला भडभडून आलं, तर ज्ञानेश्वर गहिवरले. त्या दोघांना समोर बघून जनी लहानाहूनही लहान झाली.
लटपटत्या पावलानं थरथरत उभी असलेली जनी
खाली कोसळणार तोच ज्ञानेश्वर-नामदेवांनी तिला सावरलं. पोटाशी धरलं. प्रेमभरानं तिच्या पाठीवर थोपटून तिला सामोरी केली. आणि ते म्हणाले,
''धन्य ऽऽ! धन्य हो जनाबाई तुम्ही! जनाबाई, तुम्ही एक स्त्री, त्यातही शूद्र;
पण इतकी अर्थपूर्ण आणि भावगर्भ रचना तुम्ही करू शकता हा या युगातला चमत्कार मानावा लागेल. तुमचा प्रत्येक हुंकार म्हणजे ओंकार आहे.
ओंकार ही त्या ईश्वराची मोहोर आहे. देवाची स्वाक्षरी आहे. आणि जनाबाई,
तुम्ही त्या 'ओंकाराची रेख' आहात, ओंकाराची रेख!''
चंद्रभागेचे पाणी रोमांचले. त्यावर मोठाले तरंग उठले. त्या तरंगांवर चंद्रकिरणे नाचत होती. त्यांनी ते ओंकार तरंग अवकाशात आणले. त्यांना लक्ष धुमारे फुटले. त्यांनी अवघे गगन मंडळ व्यापले आणि मंदिराच्या कळसाला वेढा दिला. तिथून ते तरंग गर्भागारात उतरले.
त्याचा प्रकाश विठूच्या सावळ्या मुखावर पडला. त्याच्या आनंदाला तर पारावार राहिला नाही. डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागल्या. रात्रीनं या सगळ्या दृश्याला मानवंदना देत आपला अंधार आवरता घेतला.
काकड आरती करायला आलेल्या सदा गुरवाला मात्र दोन गोष्टींचा अर्थ लागला नाही.
एक म्हणजे विठ्ठलाच्या दगडी मूर्तीच्या डोळ्यांतून पाणी का वाहत होतं
आणि दुसरी म्हणजे गर्भागारात नेहमीच्या 'विठ्ठल विठ्ठल' या ध्वनिगुंजनाऐवजी
'ओंकाराची रेख', 'ओंकाराची रेख' असा ध्वनी कसा घुमत होता याचा!

# दुसऱ्याला प्रकाश देणारे 'भाऊ'

*'रुचिरा'च्या लेखिका कमलाबाई ओगले यांचे सुपुत्र व मेहता पब्लिशिंग हाऊससाठी आदरणीय व्यक्ती असलेले श्री. विश्वनाथ ओगले यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याचा हा प्रयत्न*



१९६९ सालची गोष्ट. कमलाबाईंनी एखादा पदार्थ अनेक वेळा करून, त्याची अचूक मोजमापे घेऊन नोंदी करून ठेवल्या होत्या. अनेक पदार्थांच्या अशा नोंदी करून झाल्या होत्या. दादा ओगलेंनी आपल्या पत्नीच्या या धडपडीला अत्यंत मोलाची साथ दिली. ते सर्व लिखाण अत्यंत काटेकोरपणे तपासून, दुरूस्त करून एक उत्तम मुद्रणप्रत तयार केली.

दादा म्हणाले, ''अरे बाळ, हे आपले बाड आपण आता एखाद्या प्रकाशकाला दाखवू या.''

''हो. मी लागतोच त्या कामाला.'' बाळ.

त्यानंतर अनेक प्रकाशकांकडे भाऊंनी खेटे घातले. अनेक ठिकाणांहून या लिखाणाला नकार मिळाला.

''अगं उषाताई, अजून काही या पुस्तकासाठी प्रकाशक मिळत नाही. पण हे पुस्तक तर व्हायलाच पाहिजे. वहिनीने एवढे कष्ट करून, हे तयार केले आहे. तिची हौस आपण पुरी करू या.''

''बरोबर आहे, तू म्हणतोस ते. तू आणि मी मिळून हे पुस्तक काढू या. आपण तयारीला लागू.''

''थांब, अजून थोडा प्रयत्न करू या. आजच मी किर्लोस्कर प्रेसकडे जाणार आहे. पाहू या ते काय म्हणतात ते.''

शेवटचा प्रयत्न म्हणून भाऊ किर्लोस्कर प्रेसमध्ये गेले. त्यांनी हस्तलिखित पाहण्यासाठी ठेवून घेतले. एक महिना झाला. अजून काहीच उत्तर नाही. शेवटी भाऊ पुन्हा किर्लोस्कर प्रेसमध्ये गेले.

''अहो, मी दिलेल्या लिखाणाबद्दल तुमच्याकडून काहीच कळले नाही. आपला काही निर्णय झालाय का?''

''होय, आमच्याकडच्या २/३ व्यक्तींनी ते वाचले आहे व ते प्रकाशित

करावे, असा आम्ही विचार करीत आहोत. परंतु आम्हालाही हे पुस्तक कितपत चालेल याचा अंदाज नाही. यामुळे तुम्हाला मान्य असेल तर आपण खर्च वाटून घेऊन पुस्तक काढू या. जर तोटा झाला तर तोही दोघांनी सहन करावा.''

''होय, आमची तयारी आहे. माझ्या आईच्या कष्टाचं चीज व्हावं, हीच आमची इच्छा आहे.''

अशा तऱ्हेने 'रुचिरा'ला पहिला 'प्रकाश' दाखवण्यासाठी भाऊंनी अविरत धडपड केली आणि त्याचं चीजही झालं.

'रुचिरा'ची पहिली आवृत्ती मार्च १९७० मध्ये प्रकाशित झाली. ५००० च्या या आवृत्तीच्या सर्वच्या सर्व प्रतींचं बुकिंग झालं होतं. एकही प्रत शिल्लक राहिली नाही. 'रुचिरा'ची ही घोडदौड २० व्या आवृत्तीपर्यंत सुरळीतपणे चालू राहिली.

२०व्या आवृत्तीनंतर किर्लोस्कर प्रेस बंद करण्याचा निर्णय किर्लोस्करांनी घेतला आणि भाऊंपुढे प्रश्नचिन्ह निर्माण झालं.

२१वी आवृत्ती एका प्रकाशकाकडून काढली; परंतु त्यांचा खूप वाईट अनुभव आल्यामुळे पुन्हा प्रकाशकाचा शोध सुरू झाला. अनेक प्रस्ताव आले. या वेळी भाऊंनी खूप सावधपणे शोध घेतला. प्रकाशकाची माहिती, पुस्तकांचा दर्जा, त्यांची वितरणव्यवस्था आणि लेखकांशी असलेली वागणूक या सर्व बाबतीत उत्तम असलेला प्रकाशकच निवडायचा असे त्यांनी पक्के ठरवले. या शोधादरम्यानच 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे नाव समोर आले.

श्री. अनिल मेहतांशी प्रत्यक्ष भेट झाल्यावर भाऊंच्या सगळ्या शंकाचे निरसन झाले आणि १९९० सालापासून मेहता पब्लिशिंग हाऊसचा 'रुचिरा' बरोबर जोमाने व वेगाने प्रवास सुरू झाला. आता रुचिरा (भाग१) ५० व्या आवृत्तीच्या वाटेवर आहे.

भाऊंबद्दल बोलताना अनिल मेहता म्हणतात, ''एवढी चांगली व्यक्ती एखाद्या प्रकाशकाला भेटणं, हे त्याचं भाग्य असतं. लेखक आणि प्रकाशक यांच्यातील आदर्श नात्याचा एक मापदंड म्हणजे भाऊ होते.''

सुनील मेहता त्यांची आठवण सांगताना म्हणाले बाजीराव रोडवरील कार्यालयाचे बांधकाम नुकतेच झाले होते. 'रुचिरा'च्या मानधनाचा चेक त्यांच्याकडे पाठवला तर तो परत घेऊन आले आणि म्हणाले की ''तुमचा एवढा खर्च झाला आहे मला काही लगेच चेक देऊ नका. काही मदत हवी असेल, तर जरूर सांगा मीच तुम्हाला चेक पाठवतो.'' प्रकाशकाचा एवढा विचार करणारा लेखक विरळाच!

८ जुलै १९२९ रोजी सांगलीत जन्म झालेले भाऊ डी.एम.इ. झाल्यावर

सरकारी नोकरीत रुजू झाले. 'स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट' या संस्थेतून निवृत्त होताना ते 'डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज ऑफ महाराष्ट्र स्टेट' या पदावर होते. इतक्या मोठ्या पदावर असतानाही ते शेवटपर्यंत सायकलवर जात होते. त्यांच्या प्रत्येक कृतीतून त्यांची कल्पकता व्यक्त होत असे. कोणाला भेटवस्तू द्यायची असेल तर ती भाऊंनीच द्यावी कारण त्यांनी बनवलेली वस्तू ही सुंदर आणि एकदम 'हटके' असायची, 'साखरपुडा' बनवण्यात भाऊ निष्णात होते. अनेकांसाठी त्यांनी सुंदर आणि वैविध्यपूर्ण 'साखरपुडे' बनवून दिले आहेत.

त्यांची लहानपणची आठवण सांगताना कालिंदी रास्ते (आत्ते बहीण) म्हणाल्या, ''तो निरशा दुधाचा चहा करायचा आणि त्यात मीठ व लोणी घालून द्यायचा. आणि वर सांगायचा एकदा हा चहा प्यायलास की, तू दुसरा कुठला चहा पिणारच नाहीस! माझ्या दहावीच्या परीक्षेच्या वेळी रोज मला भेटायला यायचा. त्याने मला तेव्हा घड्याळ दिलं होतं. त्याची आठवण मला अजूनही आहे.''

सतत दुसऱ्यासाठी काम करणे, हा भाऊंचा स्थायीभाव होता. त्यांचं कोणी कौतुक केलेले किंवा त्यांनी केलेल्या मदतीबद्दल बोललेले त्यांना अजिबात आवडत नसे. खरोखरच दुसऱ्यांना प्रकाशझोतात आणणारा, त्यासाठी अथक परिश्रम करणारा तो एक कर्मयोद्धा होता. त्यांच्या सगळ्या गोष्टीत अनुराधा वहिनीनेही तितकीच समर्थ साथ त्यांना दिली आहे.

अनुराधा वहिनी एकदम शांत, आनंदी. हे दोघे म्हणजे व्यक्ती वेगळ्या पण अस्तित्व एकच. या दोघांच्यात असलेले संतुष्टपणा, ना मत्सर, ना हेवेदावे, आनंदीपणा, दुसऱ्यांसाठी झटण्याची वृत्ती हे गुण एकत्रितपणे दुसऱ्या कुणा जोडप्यात आढळणे कठीणच. या दोघांचा प्रेमविवाह. हे बंधन अव्याहत त्रेपन्न वर्षं अतूट राहिले.

भाऊंची बहीण उषा नांदुरकर त्यांची आठवण सांगताना म्हणतात, ''आमचा भाऊ एवढा हुशार, हरहुन्नरी. त्याच्यात जर टाइम मॅनेजमेंट असते, तर जगातील सर्वश्रेष्ठ व्यक्तीत त्याची गणना झाली असती. पण त्याच्या सारखा माणूस बनण्यासाठी मला अनेक जन्म घ्यावे लागतील.''

वंदना ओगले यांना २०१०चा सकाळ मिटकॉन पुरस्कृत 'यशस्वी उद्योजकता' पुरस्कार मिळाला. तेव्हा त्यांना लिहिलेल्या पत्रात भाऊ म्हणतात, 'आपल्या घराण्यातील कर्तृत्ववान स्त्रियांपैकी एक वहिनी(कमलाबाई ओगले) व दुसरी तू आहेस, याचा मला अभिमान वाटतो.'यातून भाऊंचा मोठेपणा जाणवतो.

वास्तविक वंदना ओगलेंना पुरस्कार मिळवून देण्यासाठी सारी धडपड भाऊंनीच केली होती. त्या पुरस्कारासाठी कोणत्या पद्धतीने माहिती द्यायची, याचा सर्व अभ्यास भाऊंनी केला व त्यांनीच सर्व गोष्टी जमवून आणल्या. हा पुरस्कार खरे तर भाऊंचाच आहे, अशी वंदना ओगले यांची भावना आहे.

भाऊंचा स्वभाव मिश्किल होता, गोवर्धन मंगल कार्यालयात एकदा एका

लग्नाच्या जेवणावळी चालू होत्या. खूप आग्रह चालला होता. गोवर्धन कार्यालयाची रचना अशी आहे की चारी बाजूंनी गॅलरी आहे. भाऊंनी आग्रह करायची नामी शक्कल काढली. जिलब्या दोरीला बांधून वरून गॅलरीतून अलगद पानात वाढल्या. किती वेळ लोकांना कळलेच नाही, जिलब्या आल्या कुठून?

गोवर्धनचे मालक श्री. लेले हे भाऊंचे जानी दोस्त. एकदा त्यांचे लस्सी बनवण्याचे यंत्र बिघडले. आता काय करणार? लस्सी तर लगेच बनवणे गरजेचे होते. भाऊंनी पाच मिनिटे विचार केला आणि लगेच लाकडाच्या तुकड्यापासून विशिष्ट डिझाइन बनवले. आणि ते डिझाइन ड्रिल मशीनला जोडले. ड्रिल मशीन चालू करून १० मिनिटात लस्सी तयार!

भाऊंच्या अंगी अनेक गुण होते. भाऊंना घरकामाची प्रचंड आवड होती. शिरा, पुडिंग, रस्सा, अंडाकरी हे त्यांचे 'खास' पदार्थ. ते फक्त भाऊंनीच करावेत. घराची साफसफाई म्हणजे तर छतापासून अक्षरश: धुवून काढायचे.

भाऊंचा सर्वांत उठून दिसणारा गुण म्हणजे त्यांचे मातृ-पितृ प्रेम. ते फक्त प्रेम नव्हते तर ती भक्ती, सेवा होती. आईची सेवा प्रसन्नतेने, आनंदाने त्यांनी शेवटपर्यंत केली. कुटुंबाला एकत्र प्रेमाने, आपुलकीने बांधून ठेवण्याचे कसब भाऊंमध्ये होते. सोळा वर्षांनी लहान असलेल्या भावाचा, अरुणचा सांभाळ त्यांनी आपल्या मुलासारखाच केला. दोन्ही भावंडांच्या मनात आपुलकीचा, प्रेमाचा धागा भाऊंनी विणला. कुटुंबातील मोठा मुलगा, मोठा भाऊ म्हणून त्यांनी जे ओगले कुटुंबीयांसाठी केले, ते कधीही न विसरण्यासारखे आहे.

मुलं म्हणजे भाऊंचा 'वीक पॉइंट.' मुलांना बक्षीस देणं आणि त्यांचे लाड करणं हे रोजचंच. घरभर पसारा घालणे आणि मुलांबरोबर मनसोक्त खेळणे भाऊंना फार आवडायचे त्यामुळे प्रत्येकालाच 'भाऊ आजोबा' हवे असायचे.

वैशाली (मुलगी) ची मैत्रीण उज्ज्वला राजे ही दोन वर्षे घरी राहिली होती. ती या घरात इतकी मिसळून गेली की, तिला हे घर आपलेच वाटू लागले. एकदा तिला परीक्षेला जाताना छोटा अपघात झाला. हाताला लागले. ती तशीच परीक्षेला गेली. कॉलेजमधून घरी फोन आला व तिला लागल्याचे भाऊंना कळले. औषधे, बँडेज, गोळ्या घेऊन भाऊ कॉलेजवर गेले. या गोष्टीची आठवण तिच्या मनात कायम राहिली आहे.

भाऊंकडची रंगपंचमी काही औरच असे. वेगवेगळ्या रंगाची मोठमोठी पिंपे असत आणि सगळी लहान मुलं बेफाम रंगपंचमी खेळत.

भाऊंना वेगवेगळी मॉडेल्स बनवण्याचे विशेष कौशल्य प्राप्त होते. त्यांनी बनवलेल्या असंख्य मॉडेल्समधील सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी बनवलेला १९८६-८७ साली शिवाजी पार्क येथे जवळ जवळ १२००/१३०० स्क्वे. फूट एवढा अखंड भारताचा नकाशा. स्वा. सावरकर जन्मशताब्दीनिमित्त हा उपक्रम होता. हा

नकाशा त्यांनी कागदाच्या लगद्यापासून बनवला होता. सावरकरांच्या चरित्रातील त्यांच्या विशेष ठिकाणांची मॉडेल्सही त्यांनी बनवली होती. अत्यंत भव्य अशा या प्रकल्पाची तेव्हा खूपच वाखाणणी झाली होती.

वाचनाचे खतपाणी घालून भाऊंनी आपला ज्ञानवृक्ष वाढवला होता. शेवटपर्यंत भाऊ उत्साही, कार्यमग्न, प्रेमळ, विनोदी होते. कुटुंबाची जबाबदारी व नातेसंबंध हळुवारपणे त्यांनी जपले. त्यांच्या आठवणी आज एखाद्या पावसासारख्या भासतात. सरीवर सरी कोसळाव्यात तशा एकापाठोपाठ एक आठवणी समोर येतात. सहस्त्रचंद्रदर्शनाच्या कार्यक्रमात कोणीही माझ्याबद्दल काहीही बोलता कामा नये अशी त्यांची सक्त ताकीद होती. प्रसिद्धीपराङ्मुखता म्हणजे काय, हे भाऊंकडे पाहून समजते. आपल्या प्रेमाने, मृदू स्वभावाने त्यांनी सर्वांनाच आपलेसे केले होते. अनेकांना पुढे जाण्यासाठी परिश्रम करणारे, सतत दुसऱ्यांसाठी झटणारे भाऊ आज आपल्यात नाहीत, हेच अजून खरे वाटत नाही.

अनुराधा वहिनींच्या पंचाहत्तरी निमित्त भाऊंनी लिहिलेली कविता आज प्रत्येकाच्याच मनात चलबिचल निर्माण करते.

**अमृत शुभकामना व अखेरची आज्ञा**

*अन्नपूर्णा आहेस, अनसूया आहेस,*
*घरादाराची आई आहेस*
*मालकीण आहेस, दासी आहेस*
*घरादाराची लक्ष्मी आहेस*
*तुझा सुरकुतला हात, आज माझ्या*
*सुरकुतल्या हातात,*
*संध्याकाळच्या सावल्याही पुसट झाल्या बघताबघता*
*आयुष्याचा ग्रंथही आटोपत आला बोलताबोलता*
*तोच तुझा मायेचा हात आज माझ्या हातात*
*सुख तुडुंबल्या मनाने राहतोय, आपल्या घरात*
*आजपर्यंत माझा शब्द कधी डावलला नाहीस*
*माझ्यापुढे शब्दानेही कधी तू गेली नाहीस*
*एकच आज्ञा शेवटची, करावयाची आहे तुला*
*माझ्या आधी जायचे नाही, एकटे सोडून मला.*

**सुनीता दांडेकर**
**पुणे**

❒




**नवे कोरे**

# लेफ्ट टू टेल

**इम्माकुली इलिबागिझा**

**स्टीव्ह एर्विन**

अनुवाद

**ज्योत्स्ना लेले**


२८०रु. पोस्टेज ३०रु.

अफ्रिकेतील रवांडा या देशात
१९९४ साली ‘हूतू’ आणि ‘तुत्सी’
या जमातींमध्ये भीषण हत्याकांड घडून आले.
जवळपास दहा लाखाहून अधिक माणसांचा बळी गेला.
या दंगलीने देशात अजराजकाचे सत्र निर्माण झाले.
या भयावह कत्तलीच्या
काळ्या सावलीत
एक लहानशी मुलगी
जीव मुठीत धरून
तो हिंसाचार अगतिकपणे बघत होती.
या नरसंहारात तिचं कुटुंब नामशेष झाले.
त्याबद्दल संयतपणे बोलणाऱ्या
इम्माकुली इलिबागिझाची ही कहाणी.
माणसांमधील असीम कुरूपता आणि क्रौर्य पाहूनही
त्यांच्यामधील ईश्वराचे अस्तित्व शोधणारी
आणि माणसांच्या जगातील प्रेम, दया, शांती
या जाणीवांना आवाहन करणारी ही इम्माकुली
पुस्तकाच्या प्रत्येक पानागणिक वाचकाला
अधिकाधिक अंतर्मुख बनवत जाणारी आहे.

पुस्तक परिचय

# रामायणातील पात्रवंदना

## वाल्मीकींच्या मूळ रामायणात काळाच्या ओघात झालेले बदल




मूळ गुजराथी लेखक **दिनकर जोषी** /अनुवाद **अंजनी नरवणे**

१८०रु. - सभासदांना सवलतीत

गुजराती लेखक दिनकर जोषी यांच्या 'महाभारतातील मातृवंदना' आणि 'महाभारतातील पितृवंदना' या पुस्तकांचे मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेले आहेत आणि मराठी वाचकांनी त्यांचे उत्साहाने स्वागत केले आहे.

दिनकर जोषी यांनी गुजरातीत दीडशेवर पुस्तके लिहिली आहेत. अंकरहित शून्याची बेरीज, अ-मृत पंथाचा यात्री वगैरे त्यांच्या कादंबऱ्याही मराठीत आल्या आहेत. रामायण, महाभारत, वेद, उपनिषदे वगैरे ग्रंथांचा सखोल अभ्यास करून त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. चिकित्सक, मूलगामी दृष्टीमुळे मानवी नात्यांमधील गुंतागुंत, संवाद-विसंवाद यांचा नेमका वेध घेण्याचा तिसरा डोळाच त्यांना लाभला आहे.

'रामायणातील पात्रवंदना' या त्यांच्या नव्याने मराठीत आलेल्या पुस्तकामुळे महाभारतातील मातृपितृवंदनाच्या मालिकेतली पुढची कडी जोडली गेली आहे.

दिनकर जोषी यांनी पहिल्याच प्रकरणात 'रामायणा'च्या आणि महाभारताच्या संदर्भात काही निरीक्षणे नोंदवली आहेत. रामकथा देशविदेशात ज्या प्रमाणात पसरली त्या प्रमाणात महाभारत पसरले नाही. लोकांना रामायण जितके आवडते आणि समजते, तितके महाभारत आवडत नाही. मात्र कृष्णाची कथा आणि व्यक्तिरेखा लोकांना खूप प्रिय आहे हेही खरे आहे. रामकथा ही त्यामानाने साधी सरळ कौटुंबिक कथा आहे.

रामायणातील पात्रांच्या वर्तनाला एक निश्चित दिशा आहे. राम-लक्ष्मण-भरत-हनुमान-दशरथ, रावण-कुंभकर्ण, सीता-कौसल्या यांच्या विशिष्ट परिस्थितीतील विशिष्ट वर्तनात एक सूत्र आहे. सुसंगती आहे. महाभारतातील पात्रांच्या वर्तनात त्यापेक्षा जास्त गुंतागुंत आणि वैचित्र्य आढळते. रामायणाला तुलसीदास मिळाला, त्यामुळे उत्तर भारतात रामकथा सर्वत्र पोचली. महाभारताला कोणी तुलसीदास मिळाला नाही, याकडे जोषी आपले लक्ष वेधतात.

रामायणाच्या अनेक आवृत्त्या उपलब्ध आहेत. त्यात कमालीची भिन्नता आहे. जवळजवळ ३०० वेगवेगळी रामायणे उपलब्ध आहेत. संस्कृतमध्ये १८ रामायणे आहेत. वाल्मीकी रामायणात २४ हजार श्लोक आहेत. पण काही रामायणात सव्वालाख श्लोक आहेत. जैनांचे पऊमचरित हे रामायण आहे तर बौद्धांची दशरथजातक, आनंद रामायण इत्यादी. मुस्लीम धर्म प्रभावी असणाऱ्या जावा-सुमात्रा, मलेशिया यातही रामायणकथा प्रचलित आहे. या सर्व रामायणात खूपच विविधता आहे. स्थलकालानुसार घटना-प्रसंगात वैचित्र्य आढळते.

वाल्मीकी रामायणातील सर्व पात्रे गूढ व सत्त्वशील आहेत. परस्परांवरील प्रेमभावाने ती जोडली गेली आहेत. आदर्श पत्नी, आदर्श पती, आदर्श भाऊ, सखासेवक – अनेक आदर्श नाती रामायणातील व्यक्तींमध्ये दिसतात.

दिनकर जोषी म्हणतात, 'रामायण ही मुख्यत: एक प्रेमकथा आहे... एक

कालातीत, शाश्वत प्रेमकथा.' रामायणातील प्रत्येक व्यक्ती जणू ठरवून दिलेले काम करते. रामाकडे आपण देव म्हणून बघत नाही. एक मनुष्य म्हणून बघतो. दशरथ-कौसल्येचा पुत्र, अयोध्येचा राजकुमार, भरत-लक्ष्मणचा भाऊ, सीतेचा पती, सुग्रीव-बिभीषणाचा मित्र, हनुमानाचा स्वामी, रावणाचा शत्रू अशा मानवी नात्यांमध्ये आपल्याला रामायणाचे दर्शन घडते. रामाकडे मनुष्याच्या अपूर्णत्वातून बघणे सोपे जाते. परमेश्वराच्या पूर्णत्वातून नाही. रामाने संकटांना वीरपुरुषाप्रमाणे तोंड दिले. विजय मिळवला. आभाळाएवढे प्रेम व्यक्त केले. जरूर तेव्हा त्याग केला. माणूस म्हणून तो भिडतो.

रामनामाचा जप केल्याने वाटमारी करणाऱ्या वाल्या कोळ्याचे वाल्मीकी झाले अशी एक उपकथा आढळते. महर्षी झालेले वाल्मीकी इक्ष्वाकु वंशाच्या दशरथ-रामाचे समकालीन होते असे रामायणाच्या आरंभीच नमूद केले आहे. म्हणजे रामाच्या काळातच रामकथा लिहिली गेली. रामकथेचे जे संक्षिप्त सार देवर्षी नारदांनी वाल्मीकींना दिले त्यात श्लोक ७ ते ८९ पर्यंतची वर्तमानकालीन कथा आहे. ८९ व्या श्लोकात लंका विजयानंतर राम अयोध्येला परत आला आणि त्याचे राज्यारोहण झाले असे म्हटले आहे. त्यानंतरच्या १० श्लोकांमध्ये रामाच्या भविष्यकाळासंबंधी लिहिले आहे. याचा अर्थ उत्तरकांड हे नंतर लिहिले गेले असावे.

दिनकर जोषी यांनी अर्थातच वाल्मीकी रामायण प्रमाण मानून रामकथेतील विविध पात्रांच्या वर्तनाची आणि विचारांची संगती लावण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. हनुमान, दशरथ, राम, लक्ष्मण, भरत, सीता, रावण, कौसल्या, सुमित्रा, कैकेयी या प्रत्येक पात्राचे व्यक्तिमत्त्व समजावून घेताना त्या त्या वेळच्या नीतिविचाराचा आणि सामाजिक स्थितीचा संदर्भ लक्षात घेतला आहे. पात्रानुसार विश्लेषण केल्याने कुठे कुठे द्विरुक्ती झाली आहे. वाल्मीकी रामायणात वाल्मीकींनी काही बाबींकडे कानाडोळा केला आहे, काही ठिकाणी मौन बाळगले आहे. काही संभ्रमात टाकणारी विधाने केली आहेत.

वाल्मीकींनी लिहिलेल्या तपशीलातील काही तपशील काळाच्या ओघात सोयीस्करपणे विसरून जनसामान्यांनी काही कल्पित घटनाप्रसंग त्यात घुसडले. श्रवणकुमाराची कथा, अहल्येची शिळा होणे, रावणाची दहा मुखे, रामाचा विवाह व राज्यारोहण प्रसंगी भरताला टाळण्याची दशरथाची कसरत वगैरे घटनांबाबत विविध मते आढळतात. वाल्मीकी रामायणात ईश्वाकु राजवंशाच्या 'रघुकुलनीती'चा बडिवार माजवलेला नाही. तुलसीदासांनी मात्र रघुकुलनीतीचा गौरव करीत रामकथा ही कौटुंबिक नातेसंबंधाची आणि राज्यप्रशासनाची आदर्श पद्धती असल्याचा संस्कार केला.

रामाच्या विजयातील हनुमानाचे महत्त्व वादातीत आहे. महाभारतातील श्रीकृष्णाची जी भूमिका आहे तशीच रामायणात हनुमानाची आहे. हनुमानाचे संपूर्ण जीवन श्रीरामाला समर्पित आहे. हनुमान वानर होता याचा अर्थ शब्दशः न घेता, एक

वंशविशेष म्हणून घेण्याची गरज आहे. वाली, सुग्रीव हे समर्थ राजे होते. वालीचा वध करणे हे रामचरित्रातले एक अनाकलनीय प्रकरण आहे. नैतिक मूल्यांच्या दृष्टीतून रामाच्याच नव्हे तर अन्य पात्रांच्या वर्तनाचा पंचनामा करण्याचीही मानसिकता हवी, असा दृष्टिकोन जोषींचा आहे.

'वाल्मीकी रामायणा'चे वाचन करताना विशेष वाटलेल्या अशा विधानांची जोषींनी झलक दाखवली आहे. रामायणात रामचंद्र असा शब्दप्रयोग कुठेही नाही. सीतेची सुवर्णमूर्ती यज्ञप्रसंगी रामाने शेजारी ठेवली होती असेही त्यांना रामायणात आढळले नाही. दशरथाने साठ हजार वर्षांचे आयुष्य जगल्याचा उल्लेख दिनकर जोषींना खटकत नाही. राम-लक्ष्मण-भरत-शत्रुघ्न यांच्या जन्मात काही दिवसांपेक्षा जास्त अंतर नसावे याकडेही ते लक्ष वेधतात. रामायणाच्या आपल्या एकूणच आकलनात त्यामुळे भर पडते, असे म्हणायला हरकत नाही.

रामायणातील अनेक गोष्टींकडे या पुस्तकामुळे आपण काहीशा वेगळ्या भूमिकेतून बघू शकू. त्या दृष्टीने पुढे काही उदाहरणे देत आहे.

* भरत अयोध्येचा राजा होणार हे त्याच्या जन्माच्याही आधी ठरलेले होते. दशरथाचे कैकेयीशी लग्न लावण्याआधी कैकेयीच्या पित्याने तशी अटच घातलेली होती. ही गोष्ट रामालाही ठाऊक होती. अयोध्या कांडातील १०७/३ या सर्गात प्रत्यक्ष रामाने चित्रकूटला भरत भेटल्यावर सांगितली होती.(३९)

* पित्याची आज्ञा हा माझा धर्म आहे असे म्हणणाऱ्या रामाने चौदा वर्षांच्या वनवासानंतर पुन्हा राज्यावर बसण्यास मान्यता द्यावी ही एक प्रकारची तडजोडच आहे असे म्हणायला हवे.(४३)

* रामाच्या राजप्रशासन काळात भरताने सिंधू नदीकाठच्या गंधर्वांशी युद्ध केल्याची हकीकत उत्तर कांडाच्या शंभराव्या सर्गात आली आहे. गंधर्व हे शांतताप्रिय होते. अयोध्येशी त्यांचे कसलेही वाद नव्हते, असे असताना त्यावर स्वारी करून भरताने त्यांचा नाश केला आणि त्यांचे राज्य स्वत:च्या दोन मुलांकडे सोपवले. हा एकूण प्रकार रघुकुल परंपरेला काहीसा उणेपणा आणणारा वाटतो.(४६)

* महर्षी भरद्वाजांना आपल्या आईची-कैकयीची ओळख करून देताना भरत म्हणतो, 'ही रागीट स्वभावाची, अशिक्षित, बुद्धिवान, गर्विष्ठ, सुंदर व भाग्यवान, राज्यलोभी, दिसायला आर्य पण संस्कारांनी पूर्णत: अनार्य अशी माझी आई आहे.'(६४)

* रावणाला दहा मस्तके आणि वीस हात होते असे कथाकीर्तनकारांनी जनमानसात पक्के रूजवले आहे. उत्तरकांडात या कथेला थोडा आधारही आहे. दहा माना आणि दहा जिभा असल्याने पिता विश्रवाने त्याचे नाव दशग्रीव ठेवले होते. दिनकर जोषींना ही कल्पना केवळ प्रतीकात्मक वाटते. रावणाच्या सामर्थ्याची सूचक म्हणून ती वापरलेली असावी.(६८)

* दशग्रीवाला रावण हे नाव का पडले याची कथा उत्तरकांडात १६व्या सत्रात

आली आहे. राव म्हणजे हाक किंवा किंकाळी. भगवान शंकर विराजमान होते तो पर्वत मुळापासून हलवण्याचा प्रयत्न गर्विष्ठ दशग्रीव करतो तेव्हा ते आपल्या पायाच्या अंगठ्याने पर्वत खाली दाबतात. त्याखाली रावणाचे दोन्ही हात दाबले जातात. तो किंचाळू लागतो. म्हणून त्याचे नाव रावण पडले. रावण हा शब्द त्याच्या मर्यादा दाखवतो; पण काळाच्या ओघात तो शक्ती या अर्थाने रूढ झाला असा तर्क जोषी देतात.

* रावणाने केलेल्या अत्याचारांच्या बहुतेक कथा उत्तरकांडात आहेत. रावणाला अत्याचार, जुलूम, बलात्कार, अपहरण वगैरे अधर्माच्या कृत्यांमुळे १८ शाप मिळाले होते. हे उत्तरकांड मूळ रामायणाचा भाग नव्हे असे काही तज्ज्ञ मानतात. ओरिएंटल इन्स्टिट्युटच्या अधिकृत प्रतीत मात्र ते समाविष्ट आहे. बालकांडात रामाचा लंका विजय आणि अयोध्या पुनरागमन या घटनांशीच कथा थांबते.

* युद्ध संपल्यावर चौदा वर्षे वनवास पूर्ण केल्यावर शेवटच्या दिवशी राम भरताकडे पोचला हा हिशोब ध्यानात घेण्यासारखा आहे.

* हनुमानाने अशोक वाटिकेत घुसून विध्वंस केला. चैत्य प्रसाद हे राक्षसांच्या कुलदेवतेचे मंदिर, त्याचा कळस मोडतो. पुजाऱ्याला मारतो. हे कृत्य आर्य परंपरेतील धार्मिक परंपरेला न शोभणारे. आर्य परंपरेत कुठेही शत्रूचे पूजास्थान मोडून तोडून टाकण्याचे उदाहरण सापडत नाही.

* दशरथाला तीनच राण्या होत्या. ही समजूत अर्धसत्य आहे. असे सांगणे हे वाल्मीकीवर अन्याय करण्यासारखे आहे. दशरथाला ३५० बायका होत्या असे ३४/१३ आणि ३९/३६ या सर्गात म्हटले आहे. त्यावेळच्या समाजव्यवस्थेत बहुपत्नीत्वाची प्रथा होती. एकच पत्नी करणारा राम हा अपवाद.

* विश्वामित्रांना जे काही हवे असेल ते दिले जाईल असे दशरथ वचन देतो. यातून दशरथाचा मऊ व निष्पाप स्वभाव दिसून येतो. आधुनिक दृष्टिकोनातून विचार केला तर एक शासक म्हणून त्याचा भोळेपणा दिसतो. विश्वामित्रांनी रावणाच्या आदेशाने येणाऱ्या मारिच वैगेरे राक्षसांचा संहार करण्यासाठी रामाची मागणी केली तेव्हा मात्र दशरथ भयभीत होते. येथे त्याच्या मनात चालणारा श्रेयस प्रेयस यामधील संघर्ष प्रथमच दिसून येतो. राम विश्वामित्राच्या यज्ञाचे रक्षण करतो.

* दशरथाने कैकेयीला दिलेल्या वचनाप्रमाणे भरताला गादीवर बसवायला हवे. परंतु ज्येष्ठ पुत्रालाच राज्याभिषेक करण्याची रघुकुलाची परंपरा. त्यामुळे दशरथाच्या पुढे पुन्हा प्रेयस आणि श्रेयस यांच्यातील संघर्ष उभा राहिला.

* श्रवणकुमाराची जी कथा कीर्तनकार सांगतात ती वाल्मीकी रामायणात नाही. श्रवणकुमार, त्याची कावड, त्याचे ब्राह्मण कुटुंब, त्यांचा शाप हा भाग वाल्मीकी रामायणात नाही. वैश्य पिता आणि शूद्र माता यांच्या संबंधातून झालेला एक

मुनिकुमार आश्रमात असतो. त्याच्यावर चुकून शस्त्रप्रहार होतो. त्यात तो मरतो. त्याच्या आईवडिलांकडून दशरथ आपल्या अपराधाचे प्रायश्चित्त म्हणून हा शाप मागून घेतो.

* दशरथावर अंत्यसंस्कार कोणी केले हे वाल्मीकी रामायणात दिलेले नाही. भरत आणि कैकेयी यांनी राजाच्या मृत्यूनंतर तिलांजली देऊ नये, दाह संस्कार करू नयेत असे सांगणे हे क्रोध व तिरस्काराचे दिसते.

* विनासायास हातात आलेल्या राज्यलक्ष्मीचा आपण होऊन त्याग करणारा माणूस दुसरा सापडणार नाही असे उद्‌गार निषाद राजा गुह भरताबद्दल काढतो.

* भरताने १४ वर्षे अयोध्येबाहेर नंदिग्राम येथे एखाद्या साधूप्रमाणे आयुष्य व्यतीत केले. भरताचा त्याग राम-लक्ष्मण-शत्रुघ्न यांच्यापेक्षाही मोठा आहे. भरतावर भरपूर अन्याय झालेला आहे.


* रामाने वालीवर जो प्रहार केला त्याचा त्या काळच्या धर्मयुद्धाच्या कुठल्याही नियमांनी बचाव करता येत नाही. वालीने रामाला या अधर्माच्या वर्तनाबद्दल जाब विचारला तेव्हा रामाने दिलेले उत्तर हे दिनकर जोषींना पंचतंत्रातल्या लांडगा-बकरीचे पिलू यांच्या गोष्टीसारखे वाटते. वाली, सुग्रीव आणि तारा यांच्याभोवती विणल्या गेलेल्या घटनांमधून त्या काळच्या आर्यावर्तात राहणाऱ्या एका विशिष्ट जातीची प्रजा आणि संस्कृती यांची माहिती मिळते. वाली, सुग्रीव, हनुमान, तारा, अंगद हे सर्व वेदवेदान्ताचे जाणकार होते. वानर म्हणजे शेपूट असलेले प्राणी असे त्यांचे स्वरूप नव्हते. वाल्मीकी किष्किंधेच्या स्त्रियांना उद्देशून वानरी असा शब्द कधीच वापरत नाहीत. रमणी, सुंदरी, स्त्री असे शब्द वापरतात.

* रामापाठोपाठ सर्वात जास्त सक्रिय भूमिका लक्ष्मणाची असली तरी त्याच्या तोंडी मोजकेच संवाद आले आहेत. त्यातील काही संवाद हे त्याचा क्रोध वा राग प्रकट करणारे आहेत.

* रामाच्या आज्ञेचे उल्लंघन केल्याचे दोनदाच लक्ष्मणाबाबत दिसते. सीताहरणाचा प्रसंग आणि उत्तरकांडात कालपुरुष आणि राम भेटीच्या वेळी. रामाच्या आज्ञेचे उल्लंघन करून लक्ष्मणाने केलेला प्रवेश. राजाज्ञा मोडल्यावर लक्ष्मण सरळ शरयू नदीवर गेला आणि श्वासविरोध करून त्याने देह त्याग केला.

* देवलोकांवर विजय मिळवण्यासाठी आणि स्वर्गलोकात जाण्यासाठी तपश्चर्या करणाऱ्या शंबूकाचा शिरच्छेद राम करतो. शंबूक शूद्र होता. त्याचा वध करून टाकणे हे कितपत योग्य म्हणता येईल? रामाच्या शंबूकवधाच्या कृत्याला उद्देशून गुजराती कवी झवेरचंद मेघाणी यांनी पाप म्हटले आहे. राम पूर्ण पुरुषोत्तम नव्हते. मर्यादा पुरुषोत्तम होते. लक्ष्मणापाठोपाठ रामानेही शरयू नदीत उडी मारून सदेह स्वर्गगमन केले.

❒


आपली सृष्टी
लेखक
प्रा. डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार
अनोख्या विश्वाची सफर घडविणारी मनोरंजक मालिका.
आपल्या सृष्टीतील विविध पक्षी, प्राणी, जलचर, उभयचर, सर्पसृष्टी अशा विविध प्राण्यांच्या जगाची सफर तसेच त्यांच्या शास्त्रीय व मनोरंजक माहितीचा एकत्र खजिना वाचकांना नक्कीच आवडेल.
किंमत ११०/- रु. प्रत्येकी
प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार
सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग



प्रा. सौ. नलिनी पवार
पक्षी
प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार
डायनोसॉरचे अद्भुत विश्व
प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार
अनोखे सस्तन प्राणी
प्रा. सौ. नलिनी पवार
प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार
अनोखी मत्स्यसृष्टी
प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार
आकाशसम्राट पक्षी
प्रा. सौ. नलिनी पवार
मासे
प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार
अजब सर्पसृष्टी
प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार
उभयचरांचे अनोखे विश्व




# नारायण मूर्ती

मूल्य जपणारं एक अद्वितीय आयुष्य

भारतीय माहिती तंत्रज्ञान सेवाउद्योगाला जागतिक प्रतिष्ठा मिळवून
देणारे अग्रगण्य व्यक्तिमत्त्व




मूळ लेखक **एन. चोक्कन** /अनुवाद **अंजनी नरवणे**

१२०रु. - सभासदांना सवलतीत

इन्फोसिस या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सॉफ्टवेअर कंपनीने एक आदर्श आंतरराष्ट्रीय कंपनी म्हणून लौकिक संपादन केला असून अनेक मानसन्मान मिळवले आहेत. अनेक मानदंड प्रस्थापित केले आहेत. भारतात नोकरीसाठी सर्वश्रेष्ठ कंपनी (बिझनेस टुडे २००६), न्यू एज एम्प्लॉयर ऑफ व्हाइस (मनीकंट्रोल डॉट कॉम २००७), व्हेंडर ऑफ द इयर (एमिटी प्राइस फायनान्शियल २००७) वुमन कॉर्पोरेट पुरस्कार (नेस्कॉम इंडिया टुडे-२००७), इंटरनॅशनल सुपरस्टार सर्व्हिस एक्सपोर्ट हाऊस (भारत सरकार - १९९९), डेटाक्वेस्ट आयटी पाथब्रेकर पुरस्कार (१९९९), टेक्नोलॉजी पायोनियर पुरस्कार (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम - २०००), सप्लायर एक्सलन्स ॲवॉर्ड (टेक्सास इनस्टुमेंटस - २००३), सर्वश्रेष्ठ रोजगार देणारी कंपनी (बिझनेस टुडे - हेविट - २००१), संघटन कौशल्य आणि ट्रेनिंग प्रोग्रॅम (अमेरिकन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट - २००६), परफॉर्मन्स एक्सलन्स ॲवॉर्ड (बोइंग कंपनी - २००७), एका वर्षाच्या कालावधीत १००० कोटी रुपये नफा मिळवणारी पहिली भारतीय सॉफ्टवेअर कंपनी (२००४), ग्लोब मॅकहॉल ऑफफेम (२००५), अशा मानसन्मानांनी इन्फोसिस चे कर्तृत्व दशदिशात दुमदुमत राहिले. या कंपनीचे मुख्य संस्थापक-प्रवर्तक नारायण मूर्ती यांनी गांधीवादी साधेपणा पाळून, मूल्यांची कास न सोडता हे यश मिळवले, भारताला सॉफ्टवेअर क्षेत्रात अग्रगण्य स्थान मिळवून दिले. त्यांचे अवघे आयुष्य हे प्रेरक आणि मार्गदर्शक आहे. एन चोक्कन यांनी तमिळ मध्ये लिहिलेल्या चरित्राच्या गुजराती अनुवादावरून अंजनी नरवणे यांनी केलेला मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकताच प्रसिद्ध केला आहे.

मूळ लेखक एन. चोक्कन यांनी चरित्र लेखनाची रूढ चौकटच प्रमाण मानून नारायण मूर्ती यांच्या जीवनातील घटनांचे निवेदन केले आहे. नारायण मूर्ती यांचे चिंटल गट्टा (कोलार) येथील बालपण (जन्म - २० ऑगस्ट १९४६), वडील नागावारा रामाराव यांची माध्यमिक शाळेतील अध्यापकीय कारकीर्द, पाच मुली आणि तीन मुले असा आठ अपत्यांचा कुटुंबकबिला, आर्थिक ओढाताण, वरचेवर होणाऱ्या बदल्या, नारायणमूर्ती यांची अभ्यासातली हुशारी, सायन्स आणि गणितातील प्रावीण्य, शालान्त परीक्षेत मेरिट लिस्टमध्ये आलेला चौथा क्रमांक (वडिलांची प्रतिक्रिया-पहिल्या तीनमध्ये का नाही?) आयआयटीमध्ये जाण्याची इच्छा, परंतु प्रवेश परीक्षेत १७ वा नंबर येऊनही आर्थिक अडचणीमुळे इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची आलेली पाळी, १९६४ मध्ये बी.ई. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण, नंतर कानपूर आयआयटी मधून एम.टेक. पदवी संपादन, त्यामुळे नोकरीसाठी चांगल्या पगाराच्या ऑफर्स; परंतु अहमदाबादच्या आय आय एम मध्ये (इंडियन इन्स्टिट्युट

ऑफ मॅनेजमेंट) पगार कमी म्हणजे आठशे रुपये असूनही त्यांनी प्राध्यापक होण्याचे ठरवले. तेथे नवा अद्ययावत संगणक बसवण्यात आला होता. त्या संगणकावर ते वीस वीस तास काम करीत. या कामामुळे संगणकाच्या विविध शक्यता त्यांच्या लक्षात आल्या. इसीआयएलसाठी बेसिकमध्ये लिहिलेल्या प्रोग्रॅमला ॲक्टिव्हेट करण्यासाठी त्यांनी एका इंटरप्रिटरची रचना करून सर्वांना थक्क केले. तीन वर्षे आय आय एम मधील सर्व्हिस नंतर त्यांना परदेशी जाण्याची संधी मिळाली. त्यांच्या एका रिसर्चपेपर मुळे फ्रान्समधील सेसा या कंपनीने त्यांना नोकरीची ऑफर दिली. मूर्ती पॅरिसला गेले. पॅरिस विमानतळावर येणाऱ्या व जाणाऱ्या मालाची नोंद अचूक व्हावी म्हणून एक ऑपरेटिंग सिस्टिम तयार करण्याची कामगिरी सेसाकडे होती. मूर्तींनी त्यात काम केले. एका वेळी चारशे लोक या सिस्टिमचा उपयोग करू शकत. प्रचंड गुंतागुंतीची कामे संगणकाद्वारे ऑपरेशन सिस्टिमद्वारे हाताळता येतात. त्याचे तंत्र जाणून घेण्याचा हा अनुभव पुढे 'इन्फोसिस'च्या कार्याला पोषक ठरला.

यूरोपच्या दौऱ्यात कम्युनिस्ट देशात मूर्तींना अकारण ६० तास तुरुंगात ठेवण्यात आले. त्यामुळे मूर्तींचे डाव्या विचारसरणीचे आकर्षण संपुष्टात आले. संपत्ती निर्माण करणे, श्रीमंत होणे, चांगले काम करून पैसा मिळवणे यात गैर काही नाही. श्रीमंती हा अपराध नव्हे, सरकारने प्रत्येक नागरिकाला रोजगाराची, निर्वाहाची संधी द्यायला हवी, असे त्यांचे मत बनले.

बल्गेरिया- युगोस्लोव्हाकिया प्रवासात एका बल्गेरियन स्त्रीशी गप्पा मारताना भांडवलशाहीचा प्रश्न निघाला. त्यावरून नारायण मूर्ती यांना हेरगिरी आणि डाव्यांचे विरोधक मानून स्थानिक पोलिसांनी विनाचौकशी अटक करून तीन दिवस अन्न-पाणी न देता अमानुषपणे वागवले. या घटनेचा फार मोठा परिणाम त्यांच्यावर झाला. दक्षिण आफ्रिकेत गांधीजींना रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर सामानासह फेकून देण्यात आले, त्या सारखाच हा आत्मसाक्षात्कार घडवणारा प्रसंग होता.

भारतात परतल्यावर नारायण मूर्तींनी १९७५ मध्ये सिस्टिम रिसर्च इन्स्टिट्युट (एस आर आय) ही स्वत:ची कंपनी एका प्राध्यापक मित्राच्या सहकार्याने सुरू केली. रस्ते, पाणी, वीज, विमानतळावरील वाहतूक, रेल्वे तिकिट बुकिंग वगैरे भारताच्या सामाजिक प्रश्नांबाबत त्यांनी सरकारला अनेक प्रस्ताव पाठवले. परंतु आणीबाणीमुळे त्याकडे दुर्लक्ष केले गेले. तेव्हा पटणी कंप्युटर सिस्टीममध्ये सल्लागार म्हणून त्यांनी ऑगस्ट १९७७ मध्ये काम आरंभले. उत्तम जाणकार तरुणांची टीम तयार केली. १० फेब्रुवारी १९७८ रोजी सुधा कुलकर्णी यांच्याशी त्यांचा विवाह झाला.फक्त ८०० रुपये खर्चात साध्या पद्धतीने हे कार्य पार पडले. लग्नानंतर पटणी कंप्युटरतर्फे त्यांना अमेरिकेला कामासाठी पाठवण्यात आले. परतल्यावर मुंबईला मूर्तींनी संसार

थाटला. बांद्रा येथे फ्लॅट घेतला. नरीमन पॉईंटला ऑफिस. नव्या तरुण सहकाऱ्यांसह पटणीला त्यांना नावारूपाला आणले. तरीही मूर्तींना आपल्या सर्व कल्पना 'पटणी'मध्ये राबवता येत नव्हत्या. त्यासाठी स्वतंत्र संस्था काढण्याचे त्यांनी ठरवले.

मूर्तींना जागतिक स्तरावर सॉफ्टवेअर उद्योगाला फार मोठी संधी आहे अशी खात्री वाटत होती. माहिती तंत्रज्ञानात द्रुत गतीने जम बसविण्यासाठी तो काळ अत्यंत अनुकूल होता. मूर्तींनी आपल्या काही सहकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली. या सर्वांना परदेशात उत्तम नोकऱ्या मिळण्याच्या संधी होत्या; परंतु त्यांना भारतातच राहायचे होते. भारतालाच आपली कर्मभूमी बनवून भारताला या क्षेत्रात आघाडीवरचे स्थान मिळवून द्यायचे होते. न्यूयॉर्कच्या डाटाबेसिक्स या कंपनीने त्यांना काम देण्याची तयारी दाखवली. तेव्हा 'पटणी' सोडून आम्ही हे काम करून देऊ अशी खात्री त्यांनी पटवून दिली. आपल्या काही सहकाऱ्यांना अमेरिकेला पाठवून डाटा बेसिक्ससाठी सॉफ्टवेअर बनवून दिले आणि ते सुरू करून दिले (१९८१). त्या कामामुळे इतर कामेही मिळू लागली.

एन.आर.नारायण मूर्ती आणि त्यांचे सहा सहकारी यांनी प्रत्येकी १० हजार रुपये भांडवल घालून पुण्यात इन्फोसिस कन्सल्टंटस प्रा.लि.चे रजिस्ट्रेशन केले. १९८३ मध्ये बंगलोरच्या मायक्रो कंपनीने इन्फोसिस ला सव्वा कोटीचे काम दिले. १९८४ मध्ये कंपनीला कर्नाटक औद्योगिक आणि विकास महामंडळाने साडेतीन लाख डॉलर्सचे कर्ज दिले. इन्फोसिसला पुण्यातील बँकांनी कर्ज देण्याचे नाकारले. उलट बंगलुरू मध्ये नवे ग्राहक आणि शासकीय प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे पुण्याहून बंगलुरू मध्ये मुख्य कार्यालय हलवले. बंगलुरू मधील आयटी क्षेत्रातील ही पहिली कंपनी. त्यावेळी कंपनीकडे कंप्युटर, टेलिफोन, वाहन काहीही नव्हते. आरंभी आर्थिक अडचणी खूपच होत्या. इन्फोसिस विकत घेण्याचीही काही कंपन्यांची तयारी होती; परंतु नारायण मूर्ती यांनी ती कल्पना धुडकावून लावली. कोणताही व्यवसाय ही शंभर मीटर्सची रेस नसते; ती मॅरेथॉनची दीर्घकालीन रेस असते असे ते म्हणत असतं.

१९९१ मध्ये इन्फोसिस ला ५ कोटींचा फायदा झाला.

१९९२ मध्ये इन्फोसिस टेक्नोलॉजीज् प्रा.लि. असे नामांतर करण्यात आले.

१९९३ मध्ये इन्फोसिस चे शेअर बीएसईवर लिस्टेड झाले. आयएसओ ९००१ प्रमाणपत्र आणि टीआयसीकेआयटी क्वॉलिटी सर्टिफिकेट मिळाले. पाच एकर जमीन ऑफिससाठी घेण्यात आली.

१९९५ मध्ये ई व्यवसायाला आरंभ झाला. फ्रेमांट, इंग्लंड, टोरांटो येथे विकास केंद्रे सुरू झाली.

१९९६ इन्फोसिस फाउंडेशनची स्थापना, सॉफ्टवेअर कनेक्टिव्हिटीकडे लक्ष केंद्रित

१९९७ सीएमएम लेव्हल ४ सर्टिफिकेट
१९९८ पॅकेज्ड ॲप्लिकेशनचा आरंभ
१९९९ अमेरिकेत दोन विकास केंद्रे सुरू. इन्फोसिस बिझनेस कन्सल्टन्सीचा आरंभ. एक हजार लाख डॉलर्सची कमाई. लेव्हल ५ सर्टिफिकेट.
२००० कमाई दोन हजार लाख डॉलर्स
२००१ कमाई चार हजार लाख डॉलर्स
२००२ कमाई पन्नास कोटी डॉलर्स, नंदन नीलेकणी नवे सीईओ
२००३ चीन, ऑस्ट्रेलिया, पुणे, येथे सहाय्यक कंपन्या
२००४ एक अब्ज डॉलर्सची कमाई. १००० कोटी रुपये नफा मिळवणारी पहिली भारतीय सॉफ्टवेअर कंपनी
२००५ रौप्य महोत्सवी वर्ष, कार्यकारी अध्यक्षपदावरून मूर्ती मुक्त
२००८ ४०० कोटी डॉलर्स कमाई. ९० हजार कर्मचारी.
शेअरची आजची किंमत २८०० रुपयांपेक्षा जास्त आहे.

२०११ मध्ये इन्फोसिस ने ६६० कोटी डॉलर्सची उलाढाल केली. १४९ कोटी डॉलर्सचा फायदा मिळवला. ७०० कोटी डॉलर्सची एकूण मालमत्ता आणि १४५ हजार कर्मचारी एवढा पल्ला गाठला. १९८१ मधील ७० हजार रुपये भांडवलावर तीस वर्षात उभे केलेले हे साम्राज्य विलक्षण आहे यात शंकाच नाही.

इन्फोसिस ने हे अभूतपूर्व वैभव मिळवताना सर्व व्यवहार सचोटीचे ठेवले. कुठलाही शॉर्टकट वा आडमार्ग चोखाळला नाही. खोटी आश्वासाने प्रलोभने दाखवली नाहीत. इन्फोसिस ची काही अलिखित सूत्रे, काही मूल्ये येथे नमूद करावीशी वाटतात.

१. वंशपरंपरागत पदे हा प्रकार पूर्णतया त्याज्य.

२. गुणवत्ता असेल त्यालाच योग्य ते पद द्या.

३. देशातील कोणताही कायदा मोडायचा नाही.

४. आपल्या अडचणींबद्दल ग्राहकांशी बोलून वेळकाढूपणा करायचा नाही.

५. रात्री शांत झोप यायला हवी असेल तर लबाडीने कुठलाही व्यवहार करायचा नाही.

६. वैयक्तिक हितापेक्षा समाजाच्या हिताचा विचार करणे हा लोकशाहीचा खरा अर्थ आहे. स्वत:च्या अधिकाराचा बडिवार माजवण्याआधी स्वत:चे कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडण्यावर लक्ष केंद्रीत करा.

७. एकजुटीनं काम करण्यावर आणि त्यासाठी देवाण घेवाण करण्यावर पूर्ण

श्रद्धा हवी.

८. इन्फोसिस मध्ये योग्यता आणि कामामध्ये तत्परता यांनाच महत्व राहील.

इन्फोसिस ने बँकिंग, दूरसंचार, उत्पादन, रिटेलिंग, आरोग्यरक्षण, वगैरे क्षेत्रांसाठी सॉफ्टवेअर तयार करणे आणि त्यांचे इम्प्लीमेंटेशन, सोल्युशन डेव्हलपमेंट, कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या स्वरूपाच्या कामात जगभर आदर्श निर्माण केला आहे.

नारायण मूर्ती आता इन्फोसिस मधून निवृत्त झाले आहेत; परंतु जनताजनार्दनाच्या दृष्टीने नारायण मूर्ती म्हणजेच इन्फोसिस हे समीकरण अतूट आहे.

नारायण मूर्ती, सुधा मूर्ती या दांपत्याने भारताची प्रतिमा नवीनतम तंत्रज्ञान क्षेत्रात हिमालयासारखी उंचीवर नेली आहे. या चरित्रात या दांपत्याच्या गृहजीवनाचेही अनेक हृद्य पैलू प्रकट झाले आहेत.

❐



**नवे कोरे**




# तळं

**स्नेहल जोशी**

१९५रु. पोस्टेज ३०रु.

माणसाचे मन हे एखाद्या अथांग जलाशयासारखे,
तळ्यासारखे आहे.
वरून शांत दिसणाऱ्या, निळेशार पाणी आणि कमळे
यांनी भरलेल्या तळ्याच्या तळाशी काय काय असते
ते फक्त तळेच जाणते. संवेदनशील मनाचे हे भावविश्व,
त्याची डूब ही त्याच्या खोलीवर अवलंबून असते.
त्या भावविश्वाला वयाचे बंधन नाही, नाही गरिबी-श्रीमंतीचे.
येणारा अनुभव, प्रसंग ह्यामुळे त्यावर उठणारे तरंग,
कधी खूप मोठे तर कधी हळूच उमटणाऱ्या लहरींसारखेही.
पण वरून शांत दिसणाऱ्या, सुंदर कमळांनी भरलेल्या
त्या सुंदर जलाशयात कमळांच्या बिसतंतूंसारखी
पार गुंतागुंत असते
आणि मग उठणारे तरंग...
ह्या अशाच तरंगांचे चित्रण
ह्या कथांतून करण्याचा केलेला हा प्रयत्न...

# Exhibition News

## 20th New Delhi World Book Fair




Over 1,300 Indian and foreign publishers participated in the "20th New Delhi World Book Fair-2012." The nine-day event also recorded a heavy footfall with seven lakh visitors this year. The theme of the fair this year was Indian Cinema. Several film and theatre personalities participated in various panel discussions and literary events held at the theme pavilion.


Interactive kiosks had been set up at various spots in the halls to provide information regarding publishers.

This year we participated in the 20th New Delhi World Book Fair which was from 25th February to 4th March 2012 at Pragati Maidan, New Delhi.

# New Books




The Gift




Tamil Tigress




Mexican Cooking



## Melissa G. Moore

is the daughter of Keith Jes-person, a man infamously known as the Happy Face serial killer. She is a strong advocate for protecting victims of violence and keeping children safe. Her passions involve raising a healthy, beautiful family and developing resources for the emotional, physical, and spiritual needs of other children and families.

# Book review

## Shattered Silence - Mellisa G. Moore

*'Shattered Silence'* is an extraordinary tale of a young girl's courage and sense of justice in bringing to light the life and circumstance of a murderer's family. Melissa G. Moore is the daughter of Keith Jesperson, a serial killer by the name 'Happy face killer.' Born in Canada, today she is an author and an international speaker who strongly advocates the importance of protecting victims of violence and keeping children safe.

In her book *'Shattered Silence'* she shares with the readers, her life as the daughter of a serial killer, in a simple and straightforward fashion without overtly dramatising any of the events. And yet we are not spared any of the horrors of a child trapped in a life of fear and insecurity.

The book opens with the story of a little girl playing with her small kittens. But far from an innocent tale of a child and her kittens, the very first few lines give a sense of a foreboding which unfolds soon after as a father of three small children murders the kittens in front of his daughter's horrified eyes and hangs them on the clothes line. What is even more chilling is the non-challant acceptance of the murders by a submissive mother who refuses to listen to the child's desperate pleas to save her kittens. Melissa writes unjudgementally about a submissive mother trapped in not one but two marriages one after the other, with abusive partners.




After the parents' seperation, shunted from place to place by a desperate mother, the young children ironically perceive their father's infrequent visits as a solace and a ray of hope in their miserable lives of poverty & uncertainty.

But as the realisation of what her father truly is slowly dawns on her, Melissa finds herself connecting the dots and taking the blame and responsibility for his gruesome crimes. It is her intuition or what she calls her '*knowing'* which saves her own life which the killer father intended to end just as remorselessly as he did his other victims.

All through the story, we see Melissa grasping at seemingly small straws to stay positive and in control of her own life. A teacher who asks the class to 'dream big' gave her 'a tool to deal with uncertainty'. A session with Dr. Phil changed her entire outlook towards life. Even through her horrors, Melissa has been able to keep her sights fixed on the hope for a better future and this is what remains with us rather than the despondency and hopelessness of Melissa's life.

The language is simple and communicative and the choice of words evoke vivid images.The apple orchards in Yakima, the angry signing of the deaf and mute stepfather, her own father's angry outburst at the ATM machine, are brought to life by the simply written and yet hard hitting descriptions. But she edits out Keith Jesperson's gory descriptions to his own daughter, of his sexual exploits with other women, thus safe-guarding her own and our sense of decency and propriety.


Mellisa does not recieve any kind of guidance or support from the elders, whether it is her own mother or the school counsellors. It is only when she turns inwards that she finds the strength to accept and face her life as it is. This in turn helps her to overcome her guilt about having a serial killer for a father whom she loves.

**- Yasmin Dandekar**

# Backlist




Awa Maru
Titanic of Japan




Betrayed




Plato's Shadow




The Breadwinner




## The Spare Room

by Helen Garner

Type -Paperback
Category - Fiction
Pages - 204
Price - Rs. 250.00

## Praise


‘This novel’s extraordinary feat is to be at once affecting, involving and sharply funny.’ *- Peter Kemp, Sunday Times*

‘Poignant and sharply funny in its honesty . . . the confidingly chatty style is unsentimental yet compassionate, making this insightful account remarkable.’ *- Daily Mail Books of the Year*

‘A most appealing feature of this novel is the elegance and taut style of the narrative voice as she gives expression to large and small questions – friendship, death, tolerance, truthfulness and the work of the day.’
*- Irish Times*

‘Understated and unsentimental, Garner’s first novel in sixteen years fleshes out the intricate bonds of affection and annoyance that emerge as Helen invites her cancer-ridden friend Nicola to live with her for three weeks.’
*- Ángel Gurría - Quintana, Financial Times Books of the Year*


## Forthcoming





Novgorod Diary




Paper Cranes





Saris on Scooters




The Woman on the Mountain

# The Heart of Kolkata

It's a messy road that branches out into several dingy lanes. Sounds of speeding buses and iconic trams fill the air. On either side of the road are top academic institutions and bookstores. Hawkers have invaded the pavements, and if you appear to be heading towards a big bookstore, they will start their sales pitch: “Sir, why are you going to those big stores? I will give you more discount.” Welcome to College Street, the most popular hangout of Kolkata. Featured among the best Asian landmarks in the Times list, College Street is located close to the birthplace of Swami Vivekananda. It is home to several prestigious educational institutions like Calcutta University, Presidency College, Sanskrit College and




Calcutta Medical College. The students seem to have no trouble with the noise and disturbance from the street. “In fact, if College Street goes mute, students get bored,” said Sadhan Pramanik, a bookseller.

There are about 2,000 bookstalls in College Street, frequented by nearly one lakh people every day. They stock all kinds of books, from school and college textbooks to medical and engineering books. The biggest attraction is, however, priceless old books, sold

at low prices. “Many poor students who can't afford new books depend on this old book market,” said Subol Kar, a stall owner. Business peaks in the evenings when people throng the stalls, after work.

Still, College Street is not all about books. Indian Coffee House, the famous hangout of students, lovers, professionals and cultural luminaries of Bengal, is located here. Set up 70 years ago in the historic Albert Hall, where Rabindranath Tagore and Subhas Chandra Bose addressed freedom fighters, the coffee shop used to attract prominent people, like filmmaker Satyajit Ray, musician Manna De, Nobel laureate Amartya Sen, writer Sunil Gangopadhyay and actor Aparna Sen. The popularity, unfortunately, is on the wane now. "As today's students are moving out of the city, the coffee house and College Street are losing their old charm," said medical practitioner A.K. Deb, who had spent many memorable hours on College Street in the 70s, during his college days.

Thanks to its proximity to famous educational institutions, College Street saw  major student movements in the 70s. A number of brilliant minds from Bengal, who could have led the country in different spheres, joined the Naxalite movement. Many of them lost their lives in police encounters in the alleys of College Street. Political protests and demonstrations take place here even today. But, elders who were witnesses to the bloodbath in the 60s and 70s warn students not to get embroiled in violent movements.

A junction of three major roads in north Kolkata, College Street could see a major transformation in the coming days. New shopping malls, food courts and a market complex are being proposed by the government. Talks are on to shift the bookstalls to new buildings. Stall owners oppose the move. “If bookstalls are shifted, College Street would lose its shine. No one could then say that our book market is the biggest in the country,” said Kar. Perhaps he is right. If these stalls are shifted elsewhere, the biggest hangout of Kolkata would remain in history books alon.

Rabi Banerjee

The Week - 1 April 2012

अनुवादित कथा

# बघू किती वाट मी...

**मूळ जपानी लेखक : जिरो अकागावा**

**भाषांतर - निसीम बेडेकर**

''गुड मॉर्निंग, बाबा.''

कंपनीमालकांच्या खोलीत आलेल्या आपल्या मुलाकडे केन्जीकडे - हिराता त्सुनेयोशीने कडवटपणे पाहिले.

''आता किती वाजलेत असं वाटतंय तुला?''

''नऊ वाजून सात मिनिटं, माझ्या डिजिटल घड्याळानुसार.'' वडिलांच्या प्रश्नाला केन्जीने सहजपणे उत्तर दिले आणि स्मित केले.

''हे बघ, साडेआठ वाजता मी या खुर्चीवर नाही असं कधी झालेलंच नाही. तूही तसं वागावंस असं मी म्हणणार नाही, पण नऊ वाजताही तू येऊ शकला नाहीस तर इतर लोकांनाही काहीच शिस्त राहणार नाही. तू या कंपनीचा उपसंचालक आहेस आणि माझ्यानंतर तुलाच सांभाळायचंय सगळं.''




केल्याने भाषांतर

आता वाचा थेट मराठीत...

फ्रेंच,जर्मन,रशियन,स्पॅनिश,चीनी, जपानी इ. भाषांतील उत्कृष्ट साहित्य

**एक अभिनव त्रैमासिक-**

**मराठीवर प्रेम करणाऱ्यांसाठी,मराठीच्या उत्कर्षासाठी...**

**कलासक्त, पुणे : फ्लॅट नं.३, ज्ञानेश्वरी अपार्टमेंट्स,**

**२ प्रभा हाऊसिंग सोसायटी, कोथरुड, पुणे ४११०३८.**

**दूरध्वनी : २५४३९०७३ मो. ९८८१४८९४७३**

वार्षिक वर्गणी रुपये १५०/- त्रैवार्षिक रु.३७५/-(टपालहशीलासह)

वर्गणी डिमांड ड्राफ्टने अथवा मनीऑर्डरने पाठवावी.

डिमांड ड्राफ्ट 'कलासक्त, पुणे' या नावाने पाठवावा.

वडिलांच्या उपदेशामृताची एव्हाना सवय झालेल्या केन्जीने ते काही फारसे मनावर घेतले नाही.

तो म्हणाला, ''माफ करा. त्यावेळी व्यवस्थित वेळ पाळेन हो मी. पण बाबा, वेळ कटाक्षानं पाळणं किंवा कंपनीला रोज रेल्वेनंच येणं हे कितीही आदर्श असलं, तरी तुम्ही आपल्या हृदयविकाराचाही जरा विचार करा. अतिपरिश्रम अजिबात सोसणार नाहीत असं डॉक्टरांनीही सांगितलंय ना?''

''छे छे, माझी तर कसलीच काळजी करू नकोस तू. त्या भुक्कड डॉक्टरचं बोलणं- त्याची किंमतही तेवढीच. - बरं, काही काम होतं का?''

''हो, खरं तर... युनियनकडून पगारवाढ आणि शनिवार-रविवार सुट्टीची मागणी करणारं पत्र आलंय. तुम्हीही एकदा वाचून बघितलंत तर...''

त्सुनेयोशीने त्याचे बोलणे तोडले, ''बघण्याचीही गरज नाही.''

केन्जाने पुन्हा स्मित केले, ''मला वाटलंच होतं असं होणार.''

''आताची आपली परिस्थिती कठीण आहे. स्पर्धकही वाढलेत. येणारे दिवसही फारसे चांगले नसणार आहेत. आता जमेल तेवढा नफा कमावत राहिलं पाहिजे आपण.''

''पण बाबा, हेच सांगून गेली तीन वर्षं पगारवाढ दिलेली नाही आपण, लोकांचा असंतोषही हाताबाहेर जायची वेळ आलीय.''

''काहीतरी करून काबूत ठेव तो.''

''अवघड आहे हो! आठवड्यात दोन दिवसांची सुट्टी तरी.''

''त्याचा तर प्रश्नच येत नाही. आमच्या वेळी महिन्यातून एक दिवस सुट्टी मिळते की नाही असं वाटायचं. सुट्टीच्या दिवशीही सगळेजण आपणहून ऑफिस मध्ये येऊन काम करायचे. आजकालच्या या आळशी लोकांना फक्त सुट्ट्या पाहिजेत सुट्ट्या!''

''तुमच्या वेळी तसं असेलही, पण आता चालत नाही तसं. आपल्या स्पर्धक कंपन्यांमध्ये दर दुसऱ्या आठवड्यात दोन दिवसांची सुट्टी आहे, शिवाय पगारही आपल्यापेक्षा पाच-सहा हजार येन जास्तच- हळूहळू दुसरीकडे जायला लागलेत हो लोक.''

''खुशाल जाऊ दे ज्यांना जायचंय त्यांना!'' त्सुनेयोशीने त्याचे बोलणे उडवून लावले ''कामचुकार लोक कितीही गोळा झाले तरी धंदा होत नाही!''

''ठीक आहे.'' अखेर केन्जीने एक उसासा सोडला. नाद सोडलेलाच बरा!

''तर मग युनियनला तसे उत्तर पाठवतो. परिस्थिती आणखीच चिघळेल असं वाटतंय.''

केन्जी गेल्यानंतर त्सुनेयोशीने ओठात चिरुट सरकवला आणि तो शिलगावला. डॉक्टरांनी खरंतर त्यालाही मनाई केली होती.

नूडल्स विकणाऱ्या लहानशा टपरीपासून सुरुवात करून हिराता त्सुनेयोशी आज वीस-पंचवीस ठिकाणी शाखा असलेल्या हॉटेल व्यवसायाचा मालक बनला होता - धडपड करून वर चढलेल्या 'सेल्फमेड' कंपनीचालकांचे मूर्तिमंत उदाहरण! असे व्यावसायिक स्वत: तर कडक शिस्तीचे असतातच, आणि कंपनीतल्या इतर लोकांकडूनही त्यांना तशाच कडक शिस्तीची अपेक्षा असते.

काम करणे हाच त्सुनेयोशीच्या दृष्टीने आनंद होता आणि मिळेल तितकी सुट्टी घेणे ही मानसिकता तो समजूच शकत नव्हता.

''चला, जाऊन येतो मी.'' त्सुनेयोशी जवळपासच्या लोकांना - सेक्रेटरीसारखे निरर्थक लोक त्याने कधी ठेवलेच नव्हते- असे म्हणून कंपनीबाहेर पडला.

आठवड्यात एकदा तो असा बाहेर पडून स्वत:च्या मालकीच्या हॉटेलच्या कोणत्या तरी शाखेत जायचा. हॉटेलमधल्या वेट्रेसनी अर्थातच कंपनीमालकांचा चेहरा कधीच पाहिलेला नसायचा. तोही एक गिऱ्हाईक असल्यासारखा आत शिरायचा आणि हॉटेलची व्यवस्था, कर्मचाऱ्यांचं वागणे वगैरे गोष्टींचे निरीक्षण करायचा.

कंपनीतून बाहेर पडून सबवे स्टेशनच्या दिशेने तो जात असताना त्याला अचानक छातीत कळ आल्यासारखे वाटले आणि क्षणभर डोळ्यांपुढे काळाकुट्ट अंधार पसरला.

कधीकधी त्याच्या छातीतून अशी कळ यायची खरी, पण आज ते जरा जास्तच वाटत होते.

जरा वेळ तसंच थांबल्यावर अखेर कळ थांबली- आज जावे का तसंच परत, क्षणभर त्याला वाटले, नाही, नाही. असं करून कसं चालेल? तो स्वत:वरच उखडला आणि पुन्हा चालायला लागला.

आजचे हॉटेल त्याच्या हॉटेल चेनमधल्या मोठ्या हॉटेलांपैकी एक होते. कर्मचाऱ्यांवर बराच पैसा खर्च होत होता, पण त्या मानाने फारसे चांगले चालले नव्हते. त्यामुळे त्सुनेयोशीलाही ते चांगलाच वैताग आणत होते.

हॉटेलच्या दारापाशी उभे राहून त्सुनेयोशीने आतल्या परिस्थितीचा अंदाज घेतला. दुपारी तीनची वेळ असल्यामुळे हॉटेल अर्धे रिकामेच होते. हॉटेलमधल्या वेट्रेसेस दरवाजाकडे बघत नाहीत हे त्याच्या नजरेने हेरले आणि तो आत शिरला. सर्वात लांबचे, आतल्या बाजूचे टेबल निवडले आणि तो टेबलाशी जाऊन बसला.

अगदी मोठ्या आवाजात स्वागत केले नाही तरी चालेल, पण नव्यानं आलेलं गिऱ्हाइक पाहून वेटरनं ताबडतोब टेबलापाशी आलंच पाहिजे हा त्सुनेयोशीच्या दृष्टीने हॉटेलच्या मूल्यमापनाचा पाया होता. पाणी आणि मेन्यूकार्ड घेऊन वेटरनं लगबगीनं टेबलापाशी येणे अपेक्षित होतं, पण जेमतेम पंचवीस टक्के हॉटेलांमधेच ही तत्परता होती. अगदीच हलगर्जीपणा असलेल्या ठिकाणी तर तब्बल पंधरा मिनिटं वाट बघावी लागायची. मग अर्थातच त्या हॉटेलच्या मॅनेजरला तो चांगलंच फैलावर

घ्यायचा.

आता इथे काय होतंय बघू या तरी...

काम नसलेल्या वेट्रेसेस हसत-खिदळत एकमेकींशी गप्पा मारत आहेत हे त्सुनेयोशीच्या करड्या नजरेने टिपले, आणि तो चांगलाच खट्टू झाला. गिऱ्हाईकांसमोर वाईट दिसतं ते वेगळंच, आणि तिकडचं गिऱ्हाईक हात उंचावून बोलावतंय तिकडे लक्ष तरी आहे का यांचं?

पदार्थ सर्व्ह करण्याची पद्धतही यथातथाच दिसतेय. बशा आवरताना असा दाणदाण आवाज करतं का कुणी? अरे देवा! काटा पाडला खाली! काय हे! एका क्षणात हॉटेलबद्दलचं मत वाईट होतं अशानं गिऱ्हाईकांचं!

त्सुनेयोशीने खेदाने मान हलवली आणि सुस्कारा सोडला.

टेबलाशी बसल्यापासून जवळजवळ पाच मिनिटं तो हॉटेलचं निरीक्षण करण्यातच गर्क होता पण दहा मिनिटं झाली, पंधरा मिनिटं झाली तसा त्याचा पारा हळूहळू चढू लागला. चाललंय काय या हॉटेलमध्ये? अजूनही आलेल्या गिऱ्हाईकाकडे लक्ष जात नाहीये मूर्खांचं! हात उंचावून कुणाला बोलवावं का असंही त्याला वाटलं. पण त्यानं स्वत:ला आवरलं. नको, राहू दे. किती वेळ लावतायत ते बघावंच एकदा. त्यानं मनगटी घड्याळाकडे नजर टाकली. सतरा मिनिटं झाली होती.

वीस मिनिटं... पंचवीस मिनिटं... तीस मिनिटं...

त्सुनेयोशीचा संताप आता अनावर झाला होता. इथल्या मॅनेजरला तर उद्याच्या उद्या डच्चू द्यायला हवा! एकूण एक कर्मचारी बदलून टाकले पाहिजेत इथले!

- पण हॉटेलमधे गिऱ्हाइकांसमोर बोलावून कानउघाडणी करणंही बरं नाही. गिऱ्हाईकांचं मत आणखीनच वाईट व्हायचं.

अखेर त्याचा घसा कोरडा पडला. त्यानं रागाचा उद्रेक कसाबसा आवरला, आणि ''अग ए!'' असं म्हणून जवळच्याच टेबलाशी आलेल्या वेट्रेसला बोलावलं.... आणि तो थक्क झाला. चांगल्या मोठ्या आवाजात हाक मारलेली असूनही त्याच्याकडे न पाहता ती निघून गेली.

काय हा उर्मटपणा! काय शिकवलंय तरी काय हिला? आपल्याच मालकीच्या हॉटेलात असा प्रकार घडतो... त्याचा विश्वासच बसत नव्हता.

तेवढ्यात मॅनेजरच्या गणवेषातील एकजण काउंटरपाशी आला. त्सुनेयोशी हात उंचावून मोठ्याने ओरडला,

''अरे ए!''

पण मॅनेजर त्याच्या दिशेनं वळलाही नाही. तेवढ्यातच आलेला फोन त्यानं घेतला आणि तो बोलण्यात गर्क झाला.

त्सुनेयोशीचे शरीर आता संतापाने थरथरत होते. तो खुर्चीवरून उठायला लागला...

"पण असं खरंच चालेल का?"

हॉटेल मॅनेजर हलक्या आवाजात रिसीव्हरच्या तोंडाशी बोलत होता. "आपण हे काय करतोय असं वाटतंय?"

पलीकडून हिराता केन्जीचा आवाज आला, "चालेल रे तसं. असं केल्यानं माझ्या वडिलांनाही कळून येईल, एखाद्यानं वाट बघायला लावली की कसं वाटतं ते!'

"हं..."

"तुमच्या आयुष्याचा प्रश्न असलेल्या, कळकळीच्या मागण्या माझ्या वडिलांनी धड ऐकूनसुद्धा घेतल्या नाहीत. आजवर तुम्हाला सतत ताटकळत ठेवलं त्यांनी. त्यांनासुद्धा चांगला धडा मिळेल आज. कळू दे त्यांना, दुर्लक्ष केल्यावर येणारा संताप आणि वाट बघणाऱ्या माणसाची अगतिकता कशी असते ती!"

"ते खरंच आहे हो साहेब, पण..."

"अरे, ते जर ओरडले तर खुशाल सांग त्यांना, मीच तुम्हाला असं करायला सांगितलंय म्हणून! तुला काहीही त्रास होणार नाही याची खात्री बाळग."

"हात जोडतो साहेब. केवळ माझ्याच नाही तर सगळ्या वेट्रेसेसच्या आयुष्याचा प्रश्न आहे हा!"

"अरे, ठीक होईल सगळं! निर्धास्त राहा रे तू!"

"मग ठीक आहे..."

पांढऱ्याफटक चेहऱ्यानं आपल्याकडे धावत येणाऱ्या वेट्रेसला पाहून मॅनेजरनं बोलणं आवरतं घेतलं.

"भलताच प्रकार झालाय, साहेब!" कापऱ्या आवाजात वेट्रेस म्हणाली.

"ते... ते तिथे बसलेले... अचानक गेले हो..." आणि ती मटकन खालीच बसली.

"हे असं काही होईल असं...."


धक्क्यानं मॅनेजरच्या तोंडातून शब्दही फुटत नव्हते. केन्जीनं त्याच्या खांद्यावर थोपटल्यासारखं केलं, सांत्वन करत असल्याप्रमाणे.

"जे घडलं त्यात तुझा काहीच दोष नाही. तू फक्त मी सांगितलं तसं केलंस. खरा जबाबदार तर मी आहे. काळजी करण्यासारखं काही नाही."

"आता तुम्हीच असं म्हटल्यावर..."

कंपनी मालकांच्या खोलीतून हॉटेल मॅनेजर निघून गेल्यावर केन्जीने भिंतीवरच्या वडिलांच्या फोटोकडे बघितले आणि त्याच्या मुद्रेवर एक हलके स्मित झळकले.- "चला, झालो बुवा कंपनीचे मालक आपण!" तो म्हणाला, "वाट बघून बघून वैताग आला होता हो, बाबा!"

❒




**नवे कोरे**

# व्हिदर जस्टिस

**नंदिनी ओझा**

अनुवाद

**प्रियंका कुलकर्णी**

११०रु. पोस्टेज ३०रु.

अनेक शतके परीघाबाहेर राहिल्यानंतर आज भारतीय स्त्रियांनी सार्वजनिक क्षेत्रात आघाडीचे स्थान मिळवले आहे. स्वतंत्र अन् निर्भय झाल्यामुळे आज स्त्रिया आपल्या मार्गातील अडथळे ओलांडताहेत, अधिकाधिक सबल बनताहेत.

ह्या पुस्तकात अशा स्त्रिया नाहीत.

हे पुस्तक मूक स्त्रियांचे बोल मांडते, विस्मृतीत गेलेल्या नावांना उजाळा देते आणि शोषित स्त्रिया ज्यासाठी झुरतात तो न्याय त्यांना देते.


'व्हिदर जस्टिस' हा भारतातील तुरुंगातील स्त्रियांवर टाकलेला एक दृष्टिक्षेप आहे. ह्यात हकीकती आहेत त्यांनी दिलेल्या विविध लढ्यांच्या - सरकारविरुद्ध, कुटुंबियांविरुद्ध, गरीबीविरुद्ध.

समाज स्वत:च खलप्रवृत्तींना जन्मास घालतो. अन् त्यांना विनाविलंब सजाही देतो. ह्या बिनचेहऱ्याच्या, बिनआवाजाच्या आणि विस्मृतीत गेलेल्या स्त्रिया

अशा समाजात राहून लढा देत राहतात.

उद्ध्वस्त झालेली स्वप्ने आणि तरीही मागे रेंगाळणाऱ्या आशा यांच्या हकीकती येथे कथारूपात मांडलेल्या आहेत.

नवे कोरे




# दुभाष्या

**दाऊद हॅरी**
अनुवाद
**अजित व्यं. कुलकर्णी**


१७५रु. पोस्टेज ३०रु.

पुस्तकाचा लेखक सुदान देशातील डारफर प्रांताचा रहिवासी आहे.
वंशाने तो 'झॅघावा' आहे. 'झॅघावा' ही डारफर मधील भटकी जमात.
अरब आणि आफ्रिकन या दोन्ही वंशाचे लोक डारफरमध्ये
गेली हजारो वर्षे गुण्यागोविंदाने राहत आहेत.
पण गेली काही वर्षे डारफर प्रांतात
भयंकर वंशविच्छेद सुरू आहे.
स्वत:ला 'उच्च' समजणाऱ्या अरब वंशीयांना
त्यांचे मूळ आफ्रिकन बांधव नकोसे झाले आहेत.
सत्ताधारी अरब आणि त्यांना पाठिंबा देणारे माथेफिरू;
हे मूळ आफ्रिकन वंशीयांना त्यांच्याच भूमीतून
हाकलून देत आहेत.
मूळ रहिवाश्यांच्या गावांवर आणि वस्त्यांवर हल्ले करून
त्यांना जीवे मारण्यात येत आहे.
स्त्रियांवर आणि कोवळ्या मुलींवर अत्याचार होत आहेत.
लाखो विस्थापितांचे लोंढेच्या लोंढे
शेजारील चॅड या राष्ट्रात आश्रय घेत आहेत.
आधुनिक जगाला या घडामोडींचा मागमूसही नाही.

## अभिप्राय

# नि:स्वार्थी सेवेचा वस्तुपाठ

वैद्यकीय क्षेत्रात अलीकडे लागलेल्या नवनवीन शोधांमुळे कोणताही रुग्ण दुर्धर आजारातूनही लवकरात लवकर बरा होऊन आपले जीवन आनंदाने व्यतीत करू शकतो. परंतु कुष्ठरोगाने पीडित व्यक्ती मात्र आपल्या कुटुंबापासून आणि समाजापासून दूर फेकली जाते. त्या व्यक्तीला नोकरी किंवा




उद्योगधंदा करण्याचे सर्व मार्ग बंद होतात आणि पोटाची खळगी भरण्यासाठी अखेर त्या व्यक्तीला भीक मागावी लागते; परंतु अशाच कुष्ठरोगपीडित व्यक्तीच्या जीवनात आशेचा किरण पसरवून त्यांचे आयुष्य उजळवून टाकणारा एक अवलिया भारतात येतो आणि कोट्यवधी कुष्ठरोग्यांवर उपचार करून त्यांच्या जीवनाचे नंदनवन बनवतो. या महान सत्पुरुषाचे - डॉ. पॉल ब्रँड यांचे चरित्र 'टेन फिंगर्स फॉर गॉड' या नावाने डोरोथी क्लार्क विल्सन यांनी लिहिले आहे. नीला चांदोरकर यांनी या पुस्तकाचा 'हात विधात्याचे' असा अनुवाद केला आहे.

पॉल हा दक्षिण भारतात सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या मिशनरी दांपत्याचा मुलगा. त्याचा जन्म भारतात झाला, पण आठ-नऊ वर्षांचा असताना त्याला इंग्लंडला पाठवले. तेथे वेगवेगळ्या विषयांचे प्रशिक्षण घेऊन अखेर तो वैद्यकीय शिक्षणही पुरे करतो आणि डॉ. पॉल बनून पुन्हा आपल्या जन्मभूमीत येतो. डॉ. पॉल ब्रँड मद्रास येथील वेल्लोर येथे ख्रिश्चन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात शल्य

विशारद म्हणून रुजू होतात. तेथे प्राध्यापक म्हणून काम करताना या संस्थाही चालवतात. पुढे कुष्ठ रोग्यांसाठी 'नवजीवनधाम'ची स्थापना करतात. काही कालावधीनंतर ते एक रुग्णालय, संशोधन शाळा, डॉक्टरांसाठी निवासस्थाने व रुग्णांसाठी कुटीर असा मोठा प्रकल्प उभारतात. तेथेच कृत्रिम अवयव, चप्पल-बूट तयार करण्यासाठी कार्यशाळा सुरू करतात. त्यांची किर्ती जगभर पसरते आणि कुष्ठरोगावर उपचार करण्यासाठी आणि व्याख्याने देण्यासाठी त्यांना निमंत्रणे येऊ लागतात. भारतातील कुष्ठरोग्यांची सुमारे १८ वर्षे सेवा करून कुष्ठरोग्यांवरील अधिक संशोधन करण्यासाठी ते अमेरिकेतील कॉरव्हील रुग्णालयात रूजू होतात. त्यांचा हा जीवनप्रवास या पुस्तकातून चित्रित केला आहे.

या चरित्राच्या सुरवातीलाच डॉ. पॉल यांनी उपचार केलेल्या लाखो कुष्ठरोग्यांचा प्रतिनिधी म्हणून सदागोपन यांची कथा सांगितलेली आहे. तसेच डॉ. पॉल यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रेरित होऊन आणि त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन अनेक व्यक्तींनी आपल्या जीवनाला वळण दिलेले दिसून येते. या चरित्र ग्रंथाला प्रस्तावना लिहिणारे 'फिलिप यॅन्सी' हे त्यांचे प्रातिनिधिक उदाहरण आहे. डॉ. पॉल यांच्या सहवासात अनेक व्यक्ती आल्या, त्यापैकी ख्रिश्चन धर्माचे प्रसारक म्हणून भारतात आलेले जेस ब्रँड, डॉ. कोकरेन, शल्यविशारद अनेस्ट फ्रिसची, प्रशिक्षित फिजिओथेरपिस्ट रूथा थॉमस, डॉ. पॉल यांना मदत करणारी डॉ. आयडा, एक विद्यार्थिनी मेरी, श्रीमंत घरात जन्मलेला पण कुष्ठरोग्यांची कणव येऊन वेल्लोर येथे रुग्णांची सेवा करण्यासाठी आलेला जॉन गार्बिंग आणि डॉ. पॉल यांची पत्नी. अशा अनेक व्यक्तींची व्यक्तिचित्रे येथे ठळकपणे साकार झाली आहेत. याशिवाय त्यांना भेटलेले रुग्ण, सहकारी डॉक्टर आणि इतर व्यक्ती यांच्याशी त्यांचे असलेले संबंध व त्यांच्या सहवासात घडलेल्या घटना व प्रसंग यांचे चित्रणही येथे आहे.

दैवाची अवकृपा झाल्यामुळे समाजाची कटुता पदरी पडलेल्या कुष्ठरोग्यांच्या सान्निध्यात राहून रुग्णांची निरीक्षणे करून, कुष्ठरोग कसा होतो, त्यावर कोणते आणि कसे उपचार करावेत, हातापायांची काळजी कशी घ्यावी आणि या रोगाची लागण झालेल्या रुग्णांनी, विविध टप्प्यांवर पोहोचलेल्या रुग्णांनी कोणकोणते व्यवसाय करावेत आणि स्वावलंबी कसे बनावे, याचा वस्तुपाठ या चरित्राद्वारे घालून दिला आहे.


डॉ. पॉल यांच्या वैयक्तिक आयुष्यात त्यांना अनेक कौटुंबिक समस्यांना तोंड द्यावे लागले आहे; परंतु या समस्यांमधून ते धैर्याने कसे बाहेर पडले याचीही प्रेरणादायी माहिती येथे मिळते. त्यांचे हे जीवनकार्य उलगडून दाखवताना लेखकाने भारतीतील व परदेशातील तत्कालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा परामर्श घेतला आहे.

सुखासीन जगण्याचे नाकारून परक्या देशात जाऊन कुष्ठरोग्यांना जीवनाचा नवा मंत्र देण्याचे महान कार्य करणाऱ्या महात्म्याचे संपूर्ण जीवन येथे अधोरेखित झाले आहे.

लोकांविषयी तळमळ, देवावरचा अढळ विश्वास आणि प्रचंड शारीरिक व मानसिक उत्साह आणि सकारात्मक दृष्टिकोन या गुणांमुळे आपल्या कार्यात निर्भेळ यश संपादन केलेल्या डॉ. पॉल ब्रँड यांचे हे चरित्र वाचकांनी एकदा अवश्य वाचावे असेच आहे.

**कमलाकर राऊत**

दै. लोकसत्ता, दिनांक -२२/०१/२०१२




आगामी

# कार्गोची कणसं


**नरेंद्र माहुरतळे**

गाव, गावकीतील अनेक प्रश्न, विकासाच्या नावानं पुन्हा भकास होताना दिसतात. या भकासपणात होरपळ होते ती गावाखेड्यात राहणाऱ्या सामान्यांचीच! आर्थिक विषमतेमुळे हे भकासपण पुन्हा डोळ्यात सलू लागतं. ‘इमला व पाया’ संस्कृतीत गुंतून पडलेलं हे भीषण वास्तव गावाशी घट्ट जुळलेल्या नाळेपासून वेगळं होण्याचा प्रयत्नही जेव्हा करू देत नाही, तेव्हा पुन्हा भेसूर व्हायला लागतं.

# मनाचं विश्लेषण करणाऱ्या वेधक कथा

मिलिंद जोशी. एक कथालेखक. नियतकालिकांमधून त्यांचे लेख आणि कथा वेळोवेळी प्रकाशित झाल्या आहेत. 'एका परिसाची कथा' हा त्यांचा नुकताच प्रकाशित झालेला कथासंग्रह. या कथासंग्रहात सोळा कथा समाविष्ट केल्या आहेत. त्यापैकी एका परिसाची कथा ही एक दिर्घ कथा असून तो कोकण परिसरातील आहे. भारत देश हा सुद्धा इतर देशांप्रमाणे लोककथांचे मूलस्थान आहे. कुठल्याही देशापेक्षा भारताने जगाला जास्त व प्राचीन कथांचा साठा पुरविला आहे. इतिहासाची व संस्कृतीची भरपूर सामग्री उपलब्ध करून दिली आहे. एका परिसाची कथा ही अशाच कथांपैकी एक कथा आहे. कथेचेच नाव पुस्तकाला दिले आहे.

एखाद्या कथेचा अगदी लहान पण स्वतंत्र व स्वयंपूर्ण असा अंश किंवा घटक घेऊन जोशींनी वेगवेगळ्या लेखकांच्या वेगवेगळ्या भाषेंच्या कथांच्या आधारावर या साऱ्या कथा कथित केल्या आहेत.




गणा महार - पत्नी रखमा. त्यांचे अपत्य सोनू व गणाच्या पाठीशी अखेरपर्यंत राहणारा पाठचा भाऊ नाथा यांच्या संघर्षमय जीवनाची ही कथा. चऱ्याचे काम करीत असताना गणाला परिस सापडतो. हे गावातील लोकांना समजते. त्याच्याकडून तो परीस हिसकावून घेण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. एवढेच काय त्याचे जीवन उद्ध्वस्त करण्याचा चंगच बांधला जातो. रातोरात गणा रखमासह गाव सोडतो. गुंड पाठलाग करतात. जीव वाचविण्यासाठी ते ज्या खस्ता खातात त्या पाहताना आश्चर्य वाटते. जोशींनी त्या स्थितीचे, त्या परिसरात वावरणाऱ्या, डॉक्टर, भटजी व समाजातील अन्य माणसांच्या मनाचे विश्लेषण फारच वेधक केले. आहे.

जीव मुठीत घेऊन जगणाऱ्या गणा व रखमा यांना जीवन नकोसं होतं. शेवटी ते तो परिस समुद्रात फेकून देतात. हीच ती परिसाची कथा होय.

जोशींची भाषाशैली प्रासादिक, मधुर व प्रवाही असल्यामुळे कथा अधिक परिणामकारक झाली आहे. कोकणच्या माणसाचे दारिद्र्य व अज्ञान हा नेहमीचाच चित्रीत होणारा विषय. अशा लोकांच्या सडलेल्या वेदना, अर्थ-अनर्थ, मनात निर्माण होणाऱ्या अग्निज्वाला जोशींनी योग्य शब्दात उभ्या केल्या आहेत.

मनोविश्लेषण करणाऱ्या अशा अनेक कथा या संग्रहात आहेत.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या एका स्वातंत्र्य सैनिकाची सुलताना ही कथा. राजाराम कऱ्हाडे व जंगलाची अनभिषिक्त सम्राज्ञी भासणारी चित्तीण सुलताना, यांच्या आगळ्या वेगळ्या प्रेमाची कथा दोतोर दे बालझॅक यांच्या 'पॅशन इन द डेझर्ट'या फ्रेंच कथेवर आधारित आहे,

रोजच्या मीठभाकरी इतकाच देश महत्त्वाचा आहे. भाकरी मिळवणं जेवढं गरजेचं आहे तेवढेच भाकरीचं रक्षण करणंही गरजेचे आहे, असे सूचित करणारी कथा पिरांदिलो यांच्या 'वॉर' या इंग्लिश कथेवर आधारलेली आहे.

प्रेमी युगुलांच्या मनाचं रसभरीत वर्णन करणारी 'चंद्रप्रकाश' ही कथा गाय द मोपासां यांच्या 'क्लेअ दे ल्यूनअ' या फ्रेंच कथेवर आधारित आहे. या कथा वाचताना वाचकाला वेगळ्याच विश्वात गेल्याचा भास होतो.

कर्मविपाक ही सॉमरसेट मॉम यांच्या 'द अँट द ग्रासटॉपर' या इंग्लिश कथेवर आधारित कथा, गिधाड्या ही 'टिल-टेलहॉर्ट' या इंग्लिश कथेवर आधारित कथा अशा अनेक कथांचा आस्वाद घेण्यात वाचकांना निर्भेळ आनंद मिळवून देणारा हा कथासंग्रह म्हणजे मराठी साहित्यातील एक ठेवाच होय.


या संग्रहातील बऱ्याच कथा या फ्रेंच, इंग्लिश, रशियन कथांवर आधारित अशा आहेत. जोशींनी केलेले मराठी रूपांतर इतके सुंदर आहे की जणू काही त्या कथा मूळ मराठीच आहेत, असे वाटते. या कथांमध्ये माणसांच्या मनाचं विश्लेषण, अधून-मधून उतरणारे आक्रोश व त्यांचे साद पडसाद, त्यातून निर्माण होणारे श्वास, उच्छवास, दु:खाने कोंडमारा झालेल्या मनाचे आडवे-उभे धागे गुंफले आहेत हेच 'एका परिसाची कथा' या कथासंग्रहाचे मुख्य गमक आहे. लेखकाच्या प्रासादिक, प्रवाहमय आणि रसाळ भाषाशैलीमुळे कथा वाचनीय झाल्या आहेत. एक चांगला कथासंग्रह प्रकाशकाने वाचकांच्या हाती दिला आहे.

**प्रा. बळीराम कानशिडे**

दै.तरुण भारत, दिनांक११/०३/२०१२

## शब्दांचा मागोवा

प्रत्येक भाषा ही एखाद्या दुथडी भरून वाहणाऱ्या नदीसारखी असते. तिच्या प्रवाहात, प्रवासात अनेक चांगल्यावाईट गोष्टी मिसळत जातात. भाषाभाषांमधील संकर अव्याहत चालू राहतो आणि त्यातून विविध भाषांमध्ये अन्य भाषांचे शब्द केव्हा, कसे नकळत मिसळले आणि बोली व लिखित भाषेचा अविभाज्य भाग बनून गेले हे लक्षात येत नाही. ते फक्त भाषातज्ज्ञच जाणत असतात. इंग्रजांबरोबर इंग्लिश भाषा भारतात आली. ती भारतीयांनी आत्मसात केली. इतकी दशके उलटल्यानंतर आता भारतीय इंग्लिशचा एक ब्रॅण्डच, ज्याला 'हिंग्लिश' (अनेक हिंदी शब्द इंडियन इंग्लिशमध्ये मिसळल्यानंतर) म्हणतात, तयार झाला आहे. अनेक भारतीय भाषांमध्ये इंग्लिश शब्द नकळत मिसळत, विरघळत जाऊन त्यांचेही स्वरूप बदलत आहे. मराठी भाषेत 'देवनागरी इंग्लिश' शब्दांचा मोठ्या प्रमाणात भरणा, वापर होऊन एक नवे 'मिंग्लिश' तयार होत आहे. हे असले तरी व्याकरणाला सोडचिठ्ठी देऊन चालत नाही आणि शब्दांची व्युत्पत्ती लक्षात घेऊन लिखाणात अचूक



शब्दांचा वापर करणे अनाठायी ठरत नाही.

'शब्दचर्चा' हे डॉ. म. बा. कुलकर्णी यांचे पुस्तक. एक हजार मराठी शब्दांची व्युत्पत्तीसह उकल करण्याचा प्रयत्न करणारे.

लेखक एम. ए. संस्कृत, एम. ए. मराठी, पीएच. डी. संस्कृत, बी. एड. असे उच्चविद्याविभूषित. तेव्हा त्यांच्या अधिकाराबद्दल शंका उपस्थित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यांनी प्रारंभीची काही वर्षे पत्रकार, माध्यमिक शिक्षक, नंतर दहा वर्षे रत्नागिरीच्या गोगटे महाविद्यालयात व त्यानंतर नाशिकच्या गोखले एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयांमध्ये एकवीस वर्षे पदवी व पदव्युत्तर विभागांत मराठी व संस्कृत विषयांचे अध्यापन, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात संस्कृत विषयात पीएच. डी.चे मार्गदर्शक म्हणून काम केले आहे. या नीटनेटक्या छापलेल्या पुस्तकाला दत्ता सराफ यांची यथार्थ प्रस्तावना आहे. 'आपण मराठी भाषिक आहोत याचा अभिमान बाळगणारांना सादर अर्पण' अशी अर्पणपत्रिका आहे.

प्रस्तावनेत श्री. सराफ म्हणतात, ''आपण विचार करतो. म्हणजे काही वेळा आपण ठरवून विचार करतो. काही वेळा विचार आपोआप सुरू होतात. काही वेळा

कोणी तरी आपणाला उद्युक्त करतो. काही वेळा विचार आपणावर लादले जातात. काही वेळा आपण कोणावर तरी ते लादत असतो. जोपर्यंत विचार मनातल्या मनात असतात तोपर्यंत शब्द-भाषा-व्याकरण-शुद्धता यांचा काही संबंध नसतो; पण जेव्हा मनातले विचार आपण उघडपणे बोलू लागतो, लिहू लागतो तेव्हा शब्द-भाषा-व्याकरण-शुद्धता यांच्या मांडवाखालून सहीसलामत जावेच लागते, इलाजच नसतो. भाषा लवचिक असते. जशी वाकवावी तशी वाकते. वाकवणारा जितका निष्णात, तितके त्याचे बोलणे, लिहिणे परिणामकारक. ऐकणाराला आणि वाचणारालाही गुंगवून टाकणारे आणि संपन्न करणारे. भाषाप्रभुत्व ही सहजसाध्य गोष्ट नव्हे. म्हणूनच तर कोणीही उत्तम वक्ता लेखक होऊ शकत नाही. मात्र, भाषेला नको तेथे, नको तितकी वाकवून, पिरगाळून तिची मोडतोड करणारे जागोजागी भेटतात. वारंवार त्यांचे ऐकून आणि वाचून आपणही कावळ्याला कोकीळ आणि बदकाला राजहंस समजू लागतो. भाषा खालावत जाते. जाणिवा बोथट होऊ लागतात. चुकीचेच बिनदिक्कत रेटून नेण्याची सवय लागते. शुद्ध-अशुद्ध, चूक-बरोबर, योग्य-अयोग्य यांचा विधिनिषेध क्षीण होत जातो. एक प्रकारे 'हम करे सो कायदा' अशी प्रवृत्ती बळावत जाते.''

लिहिताना अनेक शब्द, वाक्प्रचार आपण सर्रास चुकीचे वापरतो. त्याचा अर्थ शोधण्याच्या फंदात कधीच पडत नाही. त्यातील दोन उदाहरणे तरी इथे द्यायला हरकत नाही. 'अठरा विश्वे दारिद्र्य' असे सर्रास बोलले, लिहिले जाते. पण ही 'विश्वे' कोणती? लेखकाच्या मते, हा शब्दप्रयोग 'अठराविसे' असा असायला हवा. अठराविसे (अठरा गुणिले वीस) म्हणजे ३६०. म्हणजे वर्षाचे बाराही महिने दारिद्र्य. 'अक्करमाशा' किंवा 'अकरमाशा' हा एक शब्द दुसऱ्याला तुच्छ लेखण्यासाठी मराठी भाषेत वापरला जातो. अनौरस संतती, व्यभिचारातून जन्मलेली संतती या अर्थाने एखाद्याला हीन ठरविण्यासाठी हा शब्द वापरला जातो. डॉ. म. बा. कुलकर्णी 'सांगतात खरे तर स्वत: असभ्यच वर्तन करणारा मनुष्य त्या शब्दाचा मूळ अर्थ जाणतोच असे नाही! गुंज, मासा, तोळा, छटाक, आदपाव इत्यादि वजने प्रचारात होती, तेव्हा आठ गुंजांचा एक मासा व बारा माशांचा एक तोळा असे या वजनांचे प्रमाण असे. त्यात बारा माशांच्या ठिकाणी अकराच मासे वजन भरले, तर तो 'तोळा' अकरमाशा म्हणजे अपेक्षित तोलामोलाचा होत नसे. माणसाचे मोल जन्मावरून ठरविणाऱ्या समाजात त्यामुळेच हीन जन्माचा म्हणून 'अकरमाशा' हा शब्द आला. आता खरे तर हा शब्द 'कर्मभ्रष्ट' माणसांसाठी वापरायला हवा.


वाचकांनी हे पुस्तक क्रमाने वाचण्याची अपेक्षा नाही. कोणतेही पान उघडून त्यावरील शब्द पाहता येतील किंवा हवा असलेला शब्द शोधता येईल. मराठी भाषेवर सध्या दिवसागणिक अनेक प्रकारचे 'प्रयोग' होत असताना असे पुस्तक

प्रसिद्ध होणे ही नक्कीच स्वागतार्ह बाब आहे. भाषा विषयांत रस असणाऱ्या, स्वत:ची मराठी भाषा सुधारू इच्छिणाऱ्या, जिज्ञासू, अभ्यासू, लेखक आदींसाठी हे पुस्तक उपयुक्त ठरू शकेल.

**विश्वास डिग्गीकर**

महाराष्ट्र टाइम्स, दिनांक २२/०१/२०१२

आगामी




## ‘हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र.’

**डेबरा ब्रेव्हरमन, एम.डी.**

अनुवाद

**डॉ. अश्विनी घैसास**

डॉ. डेबरा ब्रेव्हरमन यांची ई.ई.सी.पी.मधील तज्ज्ञ म्हणून देशभर ख्याती आहे. अर्ली शो, टाइम इ.मधील त्यांचा सहभाग सर्वज्ञातच आहे. त्या कॉर्नेल युनिव्हर्सिटी मेडिकल कॉलेजच्या (आताचे वेल मेडिकल कॉलेज ऑफ कॉर्नेल युनिव्हर्सिटी) पदवीधर असून अमेरिकन बोर्ड ऑफ फिजिकल मेडिसिन ॲन्ड रिहॅबिलिटेशनच्या सर्टिफिकेटधारक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हानिया स्कूल ऑफ मेडिसिनमध्ये त्या असिस्टंट प्रोफेसर आहेत व ब्रेव्हरमन ई.ई.सी.पी. हार्ट सेंटरच्या (पूर्वीचे व्हायटल हार्ट ई.ई.सी.पी. क्लिनिक) संस्थापकही आहेत. देशातील सर्वांत जास्त पेशंटना ई.ई.सी.पी. उपचार देणाऱ्या डॉ. ब्रेव्हरमन फिलाडेल्फियामध्ये स्थायिक आहेत.



ओळख लेखकांची

# डॉ.आनंद यादव

डॉ. आनंद यादव यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९३५ साली कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या गावी झाला. ग्रामीण साहित्यविषयक चळवळीला त्यांनी १९७४ पासून प्रारंभ केला.

केवळ विनोद निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या ग्रामीण पात्रांच्या आयुष्यातील व्यथा, वेदना, त्यांची भीषण सुखदु:ख त्यांनी जगासमोर मांडली.

१९८० पासून आजतागायत अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. साहित्यक्षेत्राशी संबंधित अनेक मंडळे, समित्या यांचे ते सदस्य आहेत. त्यांनी हाताळलेल्या अनेक साहित्य प्रकारात त्यांना महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे पुरस्कार मिळाले आहेत.

आनंद यादव यांच्या अनेक साहित्यकृतींचे हिंदी, बंगाली, उर्दू, कन्नड, इंग्रजी, फ्रेंच या भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व कर्नाटक येथील मराठी विषय असलेल्या विद्यापीठांतून त्यांच्या पुस्तकांचा, साहित्यकृतींचा अभ्यास सातत्याने केला जातो.

तसेच क्रमिक पाठ्यपुस्तकांतूनही त्यांच्या विविध साहित्यकृतींचा सातत्याने समावेश केला जातो.

‘झोंबी’ हे त्यांचे आत्मचरित्र खूपच लोकप्रिय झाले आहे. या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार व राज्य पुरस्कार यांच्यासह एकूण आठ पुरस्कार पराप्त झाले आहेत.

## डॉ. आनंद यादव यांची साहित्यसंपदा

| **आत्मचरित्र** | **किंमत** |
|---|---|
| झोंबी | ३०० |
| नांगरणी | २८० |
| घरभिंती | ३५० |
| काचवेल | २५० |

| **कादंबरी** | **किंमत** |
|---|---|
| लोकसखा ज्ञानेश्वर | ३५० |
| एकलकोंडा | आ.सं. |
| माऊली | १५० |
| नटरंग | १४० |
| कलेचे कातडे | २०० |

| **कथासंग्रह** | **किंमत** |
|---|---|
| माळावरची मैना | ११० |
| घरजावई | १५० |
| शेवटची लढाई | ०९० |
| आदिताल | १२० |
| डवरणी | १४० |
| खळाळ | १४० |
| उखडलेली झाडं | १५० |
| भूमिकन्या | ०९० |
| झाडवाटा | ०९० |
| उगवती मने | १०० |

| **बाल-कुमार साहित्य** | **किंमत** |
|---|---|
| सैनिक हो,तुमच्यासाठी... | ०४० |

| **काव्य** | **किंमत** |
|---|---|
| मळ्याची माती | १०० |
| माय लेकरं | आ. सं. |

| **वैचारिक/ललितगद्य** | **किंमत** |
|---|---|
| स्पर्शकमळे | १०० |
| पाणभवरे | १५० |
| साहित्यिक जडण-घडण | १५० |
| मातीखालची माती | १४० |
| ग्राम संस्कृती | १७० |
| साहित्यिकाचा गाव | ०९० |

| **संदर्भ ग्रंथ** | **किंमत** |
|---|---|
| ग्रामीण साहित्य :स्वरूप व समस्या | आ. सं. |
| ग्रामीणता :साहित्य आणि वास्तव | आ. सं. |
| मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती | आ. सं. |
| साहित्याची निर्मिती प्रक्रिया | १३० |
| मराठी लघुनिबंधाचा इतिहास | आ. सं. |
| आत्मचरित्र मामांसा | आ. सं. |
| १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह | १५० |

❐

## डॉ. आनंद यादव यांच्या झोंबी पुस्तकातील काही भाग

ताराचं लग्न झालेलं ताराला माहीत नाही. ती एक वर्षाची असताना तिचं लग्न झालं. तिच्या पाळण्यालाच बाशिंग बांधलं होतं. रतनू त्या वेळी आठ-नऊ वर्षांचा होता. ''वरातीच्या वक्ताला लगाम धरून एकटाच घोड्यावर बसलो हुतो; त्येची आठवण हाय.'' असं सांगत होता. त्याला तेवढंच आठवतं.

रतनूचा बा आणि ताराचा बा हे दोस्त. रतनूच्या बाऽला दहा-बारा पोरं झाली. त्यांत आठ मुलगे झाले. पण ते लहानपणीच एक-दोन एक-दोन वर्षांचे होऊन मरत असत.

नवरा-बायकोला संशय यायचा. त्यांना वाटायचं भाऊबंदच पोरांना बाध्या घालतात किंवा लिंबू मंतरून मारतात. भाऊबंद म्हणजे रतनूच्या बाऽचे सख्खे चार भाऊ आणि त्यांच्या बायका. हे पाचीही भाऊ, त्यांचा बा मेल्यावर वाली-सुग्रीवासारखे एकमेकांत भांडू लागले. भांडणं, माऱ्यामाऱ्या, खून हे ह्या घराण्याच्या पाचवीला पुजलेलं.

ह्या घराण्याचा मूळ पुरुष कर्नाटकातून आपल्या बहिणीसह एका रात्रीत पळून कोल्हापूर संस्थानात– कागलला आला होता. पळून येण्याचं कारण; त्यानं कर्नाटकातल्या आपल्या राहत्या गावच्या पाटलाचा खून केला होता. पाटलानं याच्या विधवा बहिणीला ओढण्याचा प्रयत्न केला होता. कागल भाग हा कर्नाटकाच्या सीमेवर आहे. सीमा अगदी दोन मैलांवर चालू होते. त्या मुलखात खेड्यापाड्यांत खुनांचे प्रमाण भरपूर.

त्या कानडी खेड्यात आमच्या मूळ पूर्वजाचा पिंड पोसलेला. त्याचा स्वभाव संतापी, भांडखोर आणि आडव्या डोस्क्यानं वागण्याचा. या घराण्याच्या मूळ पुरुषापासून रतनूच्या बाऽची पाचवी पिढी होती. या पाचव्या पिढीचे पाच सख्खे भाऊ. त्यांचा बाऽ असेतोपर्यंत ते एकजुटीनं राहिले. हूमदांडगे, दादागिरी करणारे म्हणून ते गावात प्रसिद्ध. त्या पाच जणांच्या बाऽला, कागलला होणाऱ्या गुरांच्या बाजाराची जकात गोळा करण्याची कामगिरी असे. तीच कामगिरी या पाच मुलांकडं आलेली. महाराष्ट्र आणि कानडी मुलूख यांच्या सीमेवरचा हा भाग असल्यानं, जकात गोळा करणं फार जिकिरीचं काम होतं. अडाणी माणसं जकात चुकवत. न देता दांडगाईनं निघून जाण्याचा प्रयत्न करत. कमी देण्याची धडपड करत. पुष्कळ वेळा भांडत, मारामाऱ्या करत. त्यात हे पाच जण तयार झालेले. याच काळात ते 'यादवां'चे 'जकाते' झाले.

पुढं; बाऽ मेल्यावर हे पाचजण भाऊ स्वतंत्र झाले. त्यांतील एकाला मूलबाळ

नव्हतं, म्हणून त्याला बाकीचे चौघेजण भाऊ वाटा देण्यास तयार नव्हते. पण त्यानं तो भांडून घेतला. नोटांपेक्षा चांदीचे रुपये जास्त वापरात होते. मुलंबाळं असलेल्या भावांवर चिडून, त्यानं वाटणीला आलेले सगळे पैसे एका फाटक्या पोत्यात घालून, ते पोतं एका रेड्यावर लादलं नि रेडा गावभर उधळवला. गावाला पैसे खिरापत म्हणून विस्कटून दिले. ''मी माझ्या गावाला सारी इस्टेट देईन. पर ह्या मांगाच्या बोड्याच्या भावांस्नी एक पै बी देणार न्हाई.'' अशी त्याची प्रतिज्ञा. जकातीचा पैसा भरपूर आलेला.

पुढं; कागलचा गुरांचा बाजार बंद झाला आणि कोल्हापुरास गेला. त्याबरोबर ह्यांचं जकातीचं काम बंद पडलं. मागं फक्त 'जकाते' हे पड-नाव राहिलं. मग ह्या पाच भावांचा सगळ्या गावालाच त्रास होऊ लागला. पाचांतील दुसरा भाऊ जळितं करण्यात प्रसिद्ध. तिसरा मग सरकारी रानं लिलावात घेऊन, तीच निम्मीनिम्मी वाटून, जास्त पैसे घेऊन पोटवाट्यानं देऊ लागला. चौथा शेती करत असे. पाचवा; म्हणचे रतनूचा वडील, शेती बघता बघताच लांबलांबच्या गावांना जाऊन, तेथून धान्य खरेदी करून दुसऱ्या मुलुखाला नेऊन विके. असा उद्योग करण्यासाठी मनगटात भरपूर सामर्थ्य लागे. वाटा आडरानांतल्या. रानांत लुटालूट, दरोडे नेहमी होत. परक्या गावात आलेल्या माणसाजवळची नगद रक्कम लुटली जाई. त्यामुळं बरोबर ताकदीची माणसं घेऊन, सानेचे विळे, भाले, कुऱ्हाडी घेऊन खरेदीला जावं लागत असे. रतनूही आपल्या बाऽ बरोबर पुष्कळ वेळा खरेदीला जाई. पण पुढं रतनूच्या बाऽला वाटलं; एकुलतं एक पोरगं. अशा जोखमीच्या धंद्यात घालण्यापेक्षा त्येला शेतकरीच करावा.

...पाची भाऊ आपापल्या घरात सवते होते; पण एकमेकांचे वैर विसरले नव्हते. एकमेकाच्या वैरणी जाळायचे. कापणीला आलेली पिकं कापून न्यायचे, चोरून गवतं कापायचे. अधनं मधनं एखादं जनावर टाचा खुरडून मरायचं नि प्रत्येकाच्या पोटात संशयाचा गोळा उठायचा... रतनूच्या आई-वडलांना वाटायचं; ह्या भाऊबंदकीत आपलं एकबी पोरगं जगणार नाही. म्हणून रतनूच्या वडलानं लांब जाऊन मांगवाड्याशेजारी जागा विकत घेतली नि तिथं तीन जप्त्यांचं साधं घर बांधलं. त्या घरात त्याची तीन पोरं जगली. त्यांतला थोरला रतनू. त्याच्या खालच्या दोन बहिणी; कंबळा नि आकणी... ह्या तिघांतही घराण्याचे गुण उतरलेले.

अंगातली शक्ती कमी होईल, वय वाढत जाईल तसं रतनूच्या वडलाचं ध्यान शेतीकडं जास्त लागलं. गावात मिळेल त्याची पाच-सात एकरांची जमीन तो फाळ्यानं करायचा. त्यातच ऊस, माळवं, मिरची, गहू-हरभरा पिकवायचा. फाळा भागवून मिळेल तेवढ्यात तो दर साल गुदरायचा. सुगी झाली की, कधीमधी जवळपासच्या खेड्यावरच जायचा नि जोंधळ्या-तांदळाची खरेदी करायचा. कोल्हापुरात

गाडीनं नेऊन विकायचा. कधी चार पैसे उरायचे, कधी जेवढ्यास तेवढंच व्हायचं. चार दिसाचं पोटपाणी बाहेर पडायचं. ''निदान बैलभाडं नि आमची पोटं तरी बाहीर पडली. बसून घरातलंच खाण्यापेक्षा हे काय वंगाळ न्हाई.'' अशी तो स्वत:ची नि बायकोची समजूत घालायचा. पण हळूहळू त्यानं हा व्यापार बंद करून टाकला नि पोराबाळांसह शेतावरच कष्टपाणी करू लागला... तरी भाऊबंदकीची भुणभूण अधनंमधनं चालूच होती. हाडवैरी असलेल्या मधल्या भावानं त्याच्या शेजारीच मोकळी जागा घेऊन, इर्षेला पडून टोलेजंग घर बांधलं.

ताराला दोन भाऊ. एक मोठा आणि एक धाकटा. रामा आणि लिंगाप्पा. रामा तारापेक्षा सहासात वर्षांनी मोठा आणि लिंगाप्पा बऱ्याच वर्षांनी लहान. ताराचा बाऽ शिवाप्पा जाधव वाळली शेती फाळ्यानं करायचा. मृगापासनं संक्रान्तीपर्यंत त्या शेतात राबायचा. उन्हाळ्यात मोलमजुरी करायचा. घाण्यागुऱ्हाळात गुळव्याच्या हाताबुडी आडसोडी म्हणून काम करायचा. सालाच्या बेजमीचा गूळ मिळवायचा. सुगीच्या दिसांत आपली सुगी झटक्यासरशी घरात आणून, कुणाकुणाच्या इथं भात-जोंधळा कापायला जायचा. त्याचं शेर-पायली मिळत राहायचं. पावसाळ्याचं दीस जवळ आलं की, भटाबामणांची घरं शाकारायचा. ह्या सगळ्या कामांना साध्या रोजगारापेक्षा दोन आणे जास्त मजुरी असायची. ती उन्हाळभर पदरात पाडून घ्यायचा. त्या वरच्या दोन आण्यांची रोज रात्री गुत्त्यावर जाऊन नेमानं दारू प्यायचा.

ताराचा बाऽ शिवाप्पा आणि रतनूचा बाऽ आप्पाजी हे कधीतरी, रानाकडेला रान आल्यानं एकमेकाचे दोस्त झाले. एकमेकाला बारीसारीक गोष्टीत मदत करू लागले, आधार देत गेले.

रतनू आता आठनऊ वर्षांचा पोरगा झाला होता. एकुलता एक जगल्यामुळं लाडात वाढत होता. घरातलं म्हशीचं दुभतं एकटा खात होता. भाऊबंदांच्या इर्षेवर वाढत असणारं पोरगं. सातव्या वर्षीच तालमीत जाऊ लागलं. भोकरी रंगाचं पाणीदार डोळं. कट्यारीच्या आकाराचं धारदार नाक. फुगवट नाकपुड्या. गुटगुटीत अंग. तांबूस गोरा रंग. उन्हात तापला की गाजरासारखा दिसे. शाहूमहाराजांच्या तांबड्या मातीत लोळू लागल्यावर तर, तांब्याच्या घासलेल्या घागरीसारखा दिसू लागे. बोलताना रागात, आक्रमक पवित्र्यात बोलल्यागत वाटे. त्यात पुन्हा आवाज मोठा. ओरडला की जनावरंही मागं फिरत असत. आता तर तालमीमुळं त्याच्या अंगात खुमखुमीची पैदास होऊ लागली.

कागल हे शाहूमहाराजांचं औरस गाव. वर्षाला गैबीच्या उरुसात जंगी कुस्त्यांचं मैदान व्हायचं. बैलगाड्यांच्या शर्यती, रेड्या-बकऱ्यांच्या टकरी, ताकदीनं अवजड वस्तू ओढण्याच्या पैजा व्हायच्या. शाहू महाराजांचा हात पाठीवरनं फिरायचा. प्रत्येक शेतकऱ्याला वाटायचं; आपल्या पोराच्या पाठीवरनं तो फिरावा. बैलांच्या पाठीवर

महाराजांची थाप पडावी. बकऱ्याच्या तोंडात महाराजांची मूठभर डाळ स्वहस्ते जावी... वर्षभर गाव घुमू लागायचं. प्रत्येक गल्लीच्या तिकटीला तालीम. पहाट झाली की, बारकीसारकी पोरं घुमायची नि अंगं तांबड्या मातीत घुसळायची. गावाच्या उगवतीच्या माळाला कायमचाच बैलगाड्यांच्या शर्यतीचा राऊंड केलेला. त्या राऊंडवर, पावसाळा झाल्यावर रोज एखाद-दुसरी गाडी सरावासाठी पळतेली दिसायची. माळाला पोरंटोरं दीसभर बकऱ्यांच्या, रेडकांच्या टकरी लावून चुरस करायची. तांबूळ रानात हीच पोरं कुस्त्या लावून बटनं, पैसा-दोन पैसे जिंकून घ्यायची. असा कायमचा शाहू महाराजांचा वारा प्यालेलं गाव.

रतनूलाही तोच नाद लागला. त्याच्या बाऽलाही वाटलं, पोरगं नाद करतंय तर करू दे. म्हणून बाऽनं त्याला मळ्यातच एक आखणी तालीम घालून दिली. शिवाप्पा जाधवाचा राम, पलीकडच्या वस्तीवरलं माळ्याचं गणप्या, मिसाळाचा लक्ष्मू अशी कुणीबुणी पोरं त्या तालमीत घुमू लागली.

गावात भाऊबंदांची पोरं ताठर होत चालली होती. त्यांच्याकडं बघून रतनूच्या बाऽलाही वाटायचं– तोडीस तोड पोरगं झालं पाहिजे. अंगात रग ऱ्हायली तर जगंल; ऱ्हाईतर जाईल मातीत मिसळून बघता बघता... म्हणून त्यानं मळ्यात तालीम घालून दिली.

पण दुसऱ्या वर्षी गावात कसलातरी रोग आगीसारखा पसरला. माणसांना भडाभड उलट्या होऊ लागल्या. तांदूळ धुतल्यावरच्या पाण्यासारखे पांढरे जुलाब पिचकाऱ्या मारल्यागत होऊ लागले. हातापायांत गोळे येऊन अंगातली शक्ती एकदम गुंडाळल्यागत होऊ लागली. डोळे पांढरे करत, गरागरा फिरवत माणसं पडायची. त्यांच्या तोंडाला कडक कोरड पडायची. त्यातनं मग उठायचीच नाहीत. रतनूचे दोन चुलते त्यात होत्याचे नव्हते झाले. धाकट्या चुलत्याची बायको मरता मरता वाचली. रोगराई आली नि चांगली तीन-चार महिने राहिली. गावभर कसलीबसली औषधं मारली.

पावसाळा आला नि रोगराई धुऊन गेली. पण रतनूच्या बाऽनं हाय खाल्ली. पावसाळा आला की, दम्यासारखा असलेला त्याचा खोकला वाढू लागे. त्या वर्षी तो जास्तच वाढला. त्याला वाटू लागलं; आता काय खरं न्हवं. आज हाय तर उद्या न्हाई. देवाची खैर म्हणून घरादारावर मरगाईचा फेरा फिरला न्हाई... पर भाऊबंद असं वायटावर. आपल्या अंगात तर आता पैल्यागत रग न्हाई. पोटाला पोरगं एकटंच. आपल्या मागं ह्या पोराला कुणाचा दुमाला मिळणार? निदान पिंड द्याय पुरता तरी माझा वस ह्या भाऊबंदाच्या नि रोगराईच्या तडाख्यातनं वाढला पाहिजे... मी असा फटक्यासरशी गेल्यावर मागं पोराचं लगीन कोण करणार?...

नवरा-बायकोची बोलणी झाली. विचार करून करून त्यांनी बेत ठरविला.

''पोराचं लगीन आवंदा करून टाकूया. साताठ वर्सांचं हाय. अजून त्येचा बापय व्हायला बारा-चौंदा वरसं तरी लागतील. त्यो बापय हुयाला नि पोरगी पदराला यायला गाठ पडावी, अशीच पोरगी कराय पाहिजे.''

शेजारी असलेल्या शिवाप्पा जाधवाशी बोलणं झालं. रतनूच्या बाऽला वाटलं; शेजारी हाय नि जातीगोतीचाबी हाय. ह्येलाच इवाई करून घ्यावा. बांधाला बांध भिडून रानं हाईत. रानं टिकतील तवर टिकतील; पर दोन्ही घरं एक हुतील. पोरांत पोरं मिसळून वाढतील... शिवाप्पाचा थोरला पोरगा रामा. तो रतूनच्या जवळजवळ वारगीचा होता. दोघं एकमेकासंगं कुस्त्या खेळायचं.

शिवाप्पालाही वाटलं, आप्पा जकात्यासारखा वाघ आपल्या दावणीला आपण होऊन येतोय. गावात आता आपल्याकडं वाकडा डोळा करून बघायची कुणाची टाप न्हाई. आपली दोस्ती घट्ट हुईल नि एकमेकांची एकमेकाला येळपर्संगाला मदतबी हुईल.

लग्न ठरलं. मुलगी धड एक वर्षाचीही नव्हती.

या लग्नात मुलामुलीच्या आईबापांनीच आपली हौस भागवून घेतली. रतनूला, आपलं लग्न होतंय याचीच गंमत वाटली.

... सबंध लगीनभर, तारा आपल्या पाळण्याला बांधलेल्या रंगीत बाशिंगाकडं काजळभरल्या डोळ्यांनी कौतुकानं बघत, हातपाय हलवत, हाऽ हूऽ करत पडलेली.

अधनंमधनं; तिची ऐनपंचविशीतली चुलती तिला पाळण्यातनं हळूच उचलत होती नि हळदी-आंघोळीसाठी मांडवात नेत होती... एक वर्षाच्या ताराच्या गळ्यात बांधलेलं काळ्याभोर मण्यांचं मंगळसूत्र, डोरलं मोठं चमत्कारिक दिसत होतं. पुढं वीस एक वर्षांनी तरुण अंगाला लावली जाणारी हळद, तरुण चुलती न्हाऊ घालताना मांडीवर घेऊन डाळीचं पीठ लावावं तशी लावत होती. चिमुरड्या पोरीला तीटकाजळ करता करताच, कुंकू-मळवटही भरत होती. तिची सुरकी बदलतानाच, तिच्यासमोर वरातीचा शालू आणून त्याची घडी पाळण्यावर ठेवत होती. ती घडी पुढं वीस वर्षांनी मोडली जाणार होती... हातात; मंगळसूत्र घातलेला एक तांब्या धरून, रतनूची एकट्याचीच घोड्यावरून वरात निघाली, वर्षाची पत्नी इकडं पाळण्यात गाढ झोपी गेलेली. तिला यातलं काहीही माहीत नव्हतं. तिकडं तिची नियती परस्पर ठरविली जात होती. सासू-सासरे, विहीण-व्याही आपापली हौस भागवून घेत होते.

२

कळू लागलं तसं ताराला नांदायला जावं लागलं. एके दिवशी लांबून तिला तिचा नवरा दाखवून देण्यात आला.

''ह्यो बघ तुझा न्हवरा.''

त्यालाच का 'न्हवरा' म्हणायचं, हे तिच्या बालबुद्धीला कळलं नाही. पण ती

आपल्या आईनं दाखवून दिलेल्या मुलाला नवरा मानू लागली.

मात्र दाखवून दिलेल्या घरात ती पहिल्या दिवशी राहायला तयार नव्हती. ध्यानात आल्याबरोबर, ती हळूच सोडून जाणाऱ्या आईच्या पाठोपाठ ''आई, मी येणार; आई, मी येणार.'' करत जाऊ लागली. मग तिच्या सासूनं अचानक तिच्या दंडाला हात घालून, एखादं कोकरू खाटिकखान्यात नेतात तसं तिला अल्लादी उचलून स्वैपाकघराच्या अंधारात आणून ठेवलं नि घराचं दार झाकून टाकलं. त्या दिवसापासून चिमुकल्या ताराचं नांदणं सुरू झालं. ती सहासात वर्षांची होती.

नांदायच्या घरात तिला आई नि बाप कुणीच नव्हतं. सासू हाताखाली घेऊन कामं करून घेत होती. थोरली नणंद नि धाकटी नणंद भांडणं काढत होती. तारा त्या घरात गेल्यापासनं सगळीजणं सटरफटर, बारकीसारकी कामं तिलाच सांगत. ती मोलकरणीच्या मुलीसारखी, सांगतील ती कामं करू लागली. त्यामुळं ती कैंगटून जाऊन, संधी मिळेल तेव्हा अधनंमधनं आपल्या आईच्या घराकडं पळून जाई.

पळून जायचं आणखी एक कारण होतं. तिच्यात आणि तिच्या नवऱ्यात आठनऊ वर्षांचं अंतर होते. नवरा पैलवान, त्यामुळं; तिला कळू लागलं तेव्हा तो तिच्या नजरेला मोठ्या पुरुषासारखा दिसू लागला. तशात तो तापट स्वभावाचा. लाडाचा. त्यामुळं त्याचा रागलोभ आई-बाऽपुढं चालत असे. त्याची तिला भीती वाटे. ती पळून गेली की तिला परत आणायला त्याला पाठवीत असत. तो तिला हाताला धरून फरफटत आणी. कित्येक वेळा, हातात लिंगडीची छडी काढून तिला बडवत घरी नेई. त्यामुळे; तो डोळ्यांसमोर असला की, तिच्या पोटात उगीचच भीतीचा गोळा फिरत राही.

हळूहळू वर्षभरानंतर, त्याची न्याहारी घेऊन सकाळी तिला मळ्याकडं जावं लागे. मग ती वाटेवर लागणाऱ्या आपल्या आईच्या घरी थोडा वेळ जाई. पोटभर रडून घेई. परकराच्या ओट्यात आईनं दिलेला शेंगागूळ खात खात मळ्यावर जाई.

तिथं वेगळंच वाढून ठेवलेलं असे.

''एवढा का उशीर न्ह्यारीला?'' नवऱ्याचा पहिला सवाल झडे.

''भाकरी लवकर झाल्या न्हाईत.''

''तुझ्या आयला तुझ्या! एवढ्या उशीरपतोर भाकरी हुईत न्हाईत? खरं सांग, तुझ्या आईकडं जाऊन बसली हुतीस का न्हाई?''

''न्हाई.''

''खोटं बोलतीस!'' म्हणून काड्दिशी खांद्यावरच्या चाबकाची वादी तिच्या पाठीवर फुटे... नवरा मोट मारत असे.

ती एका चाबकाच्या वादाड्यातच परकरात मुते. खरं बोलल्यावर पुन्हा वादाडा बसणार नाही, म्हणून ती ''आता पुन्ना जाणार न्हाई'' असं ओरडली की,

''मग आदूगर का सांगितलं न्हाईस तुझ्या आयला! खोटं बोलतीस?'' असं म्हणून पाचसात वादाडे बसून ती आडवी पडल्यावरच नवऱ्याचा हात थंड होई.

न्याहारी घेऊन गेली की, तिला उंच उसात पाण्याची दारं मोडावी लागत. रानडुकरं, कोल्ही उसातून हिंडत. ऐनवेळी समोरून रानडुक्कर दिसला की तिच्या काळजाचं पाणी होई नि ती घाबरून रडत, ओरडत बाहेर येई. पुन्हा तिला आत जायची भीती वाटे.

''मी न्हाई उसात जाणार पाणी पाजायला.'' ती बाहेर येऊन म्हणे.

''का गं?''

''मला भ्या वाटतंय. आत रानढुकरं आल्यात.''

''उगंच भिऊ नगं. कळ काढली न्हाई तर ढुकरं काय तुला खाईत न्हाईत.'' रतनू धावंवरनंच ओरडून म्हणे.

त्याचा आवाज ऐकल्यावर नि हातात चाबूक बघितल्यावर, ती जीव मुठीत धरून, डोळे दाही दिशांनी फिरवत, पाणी पाजायला पुन्हा उसात जाई. पण जरा जरी काही खसफसलं की बाहेर पळत येई आणि पळून आली की, ''एवढं कशाला घाबरतीस?'' म्हणून चाबकाचा मार मिळे.

त्यामुळं पाणी पाजायला उसात जायचं तिच्या जिवावर येई नि सांजचं घरी परत जायच्या वेळी ती आपल्या आईकडंच जाऊन, ''मी न्हाई जा जाणार. मला रानढुक्कार फाडून खाईल.'' म्हणून हटून बसे.

दुसरे दिवशी सकाळीच तिची आई तिच्या सासूकडं जाऊन विनवणी करी, ''घरचं काम लावा. लेकरू अजून बारकं हाय; संभाळून घ्या.'' म्हणून सांगे. ''हो हो'' म्हणून प्रसंग निभावला जाई नि दुसरे दिवशी न्याहारी घेऊन गेली की, ''तुझ्या आयला तुझ्या! पळून जातीस; थांब तुझा पायच मोडून ठेवतो.'' म्हणून नवरा हिसकीनं नाहीतर ठेंग्यानं, तिच्या पायांच्या नळ्या गवसून मार देई... अशी नांदणूक चालली होती.

ताराचं रानडुकराचं भय वाढतच होतं. ती बाहेर पळून येत होती. नवऱ्याचा मार खात होती. सासूला तिच्या आईनं सांगितलं तरी त्याचा उपयोग होत नव्हता. मळ्यात नवराच राजा होता. सासरा कधी असे आणि कधी नसे. त्याला अधनंमधनं व्यापाराची लहर येत असे. उगीच परगावी जाऊन धान्यांच्या भावाची चौकाशी करून तो येत असे. दोन्ही नणंदा; तारा घरात आल्यावर कामं लावीत असत. घरात आणि रानात, दोन्हीकडं तिला कामाचा चाप लागत असे. न झेपणारी कामं ओढावी लागत. तंगून तंगून जाई.

शेवटी कावकिक्क येऊन ती आपल्या आईकडं पळून गेली; ती पुन्हा नवऱ्याकडं जायला तयारच होईना. तिच्या आईबाऽच्याही लक्षात आलं की, बारक्या

पोरीचा जीव केवढा ते लक्षात न घेता तिला रातध्याड कामानं चिंबिवली जातीय. त्यांनीही लावून द्यायची नाही, असं ठरवलं.

तशात शिवाप्पाचं रान तीन वर्षांपूर्वी सुटलं होतं. त्याच उन्हाळ्यात त्याची तिथली खोप जळाली होती. सगळी जनावरं खुंट्यांलाच मरून पडलेली. संसार रसातळाला गेलेला. तरी वर येण्याचा तो प्रयत्न करीत होता. पण रेटत नव्हतं. त्यातनंच दारूचं व्यसन वाढलेलं. यातनं लोकांची रानं फाळ्यानं करण्याचं त्यानं सोडून दिलेलं. तो आता नुसती मजुरीच करू लागला होता. विहीण-व्याहीपणातलं नवेपण जाऊन कधीच जुनेपण आलं होतं. त्याचे चार दोन टवके उडाले होते. दीस पालटल्यासारखे झाले होते.

तारा माहेरातच होती. पाच-सहा महिने झाले तरी लावून दिली नाही. एकदा तिचा बाऽ आणि थोरला भाऊ कामाला गेले होते. त्यांची भाकरी बुट्टीत घेऊन ती चालली होती. राम मंदिराच्या कोपऱ्यावर आली नि तिच्या नवऱ्यानं एकदम तिला अडवली. अगोदरच डाव आखून दबा धरून तो बसला होता. त्याच्याबरोबर त्याच्या मळ्यातला गडी.

नवरा चाबूक घेऊन आलेला. त्यानं तिच्या डोईवरची बुट्टी गटारात फेकून दिली नि एका हातानं बुचडा धरून, दुसऱ्या हातानं चाबकाचे वादाडे देत तो तिला मळ्याकडं घेऊन गेला. मरूस्तवर बडवून काढली. चाबकाचे कोयंडे डोईत मारल्यानं, चोळी परकर रक्तात न्हाऊन निघालं. शेवटी सासूनं सोडवून घेतली नि हुईच्या जखमा धुऊन त्यात दातवण भरलं.

''आता फिरून जर पळून गेलीस तर तुला ठारच मारतो का न्हाई, बघ तू. मग येऊ दे तुझा बाऽ आणि आई.''

दिवस जात होते. ती कष्ट उपसत होती. दरम्यान तिची आई आजारपणात वारली. गावठी औषधांचा काही उपयोग झाला नाही. धाकटा भाऊ त्यावेळी वर्षाचासुद्धा नव्हता. आईच्या मढ्यावरच तो तिचं शेवटचं दूध प्याला. बायका ताराला म्हणाल्या; ''पाज पोरी त्येला. हे शेवटचंच आता.'' त्याला पाजवलं नि मढं हलवलं. अशी तऱ्हा.

तिची आई मेल्यावर, तिच्या बाऽचे आणि भावांचे फार हाल होऊ लागले. शिवाप्पालाच स्वैपाक करावा लागे. पुढं पुढं थोरल्या भावानं स्वैपाक शिकून घेतला. तेव्हापासनं ताराला माहेरचा ओढा जास्तच लागला. बाप-भाऊ स्वत: हातानं करून खातात, त्यांचे पोटासाठी हाल हाल चाललेत, हे तिला बघवेना. तिचं आतडं तुटू लागलं. मळ्याकडं जाता येता ती चोरून-मारून भावांना मूठपसा देऊ लागली. लहानग्या लिंगाप्पासाठी तिच्या जिवाची सारखी कालवाकालव व्हायची. पण फारसं काही करता येत नव्हतं.

दिवस चालले. तिच्या बाऽचं दारू पिणं जास्तच वाढलं. तो कुठंही झिंगून पडू लागला. पोरं उपाशी मरू लागली. त्यांचे चुलता-चुलती त्यांना कधीमधी अर्धीचतकोर भाकरी देऊ लागले. कुठं तरी ती रोजगाराला जाऊ लागली. दरम्यान; ताराच्या लग्नात तिला घातलेल्या पुतळ्या तिच्या बाऽनं विकून टाकल्याची बातमी तिच्या सासऱ्याला कळली. त्यानं त्या पुतळ्या त्याच्याकडं मागितल्या. पण देणार कुठून?

ताराचा बाऽ असाच एकदा दारू पिऊन आपल्या लेकीकडं भाकरी मागायला आला. झिंगत कोलमडत आलेला शिवाप्पा बघून रतनूच्या बाऽचं टाळकं सरकलं. नुकताच तो मळ्याकडनं आला होता. 'देवा' म्हणून तंबाखू ओढत बसला होता. विकलेल्या पुतळ्या मागून मागून त्याचा जीव वैतागला होता. सगळे मार्ग संपले होते. वर्ष झालं तरी तो परत देण्याची भाषा बोलत नव्हता. पुतळ्या विकून गावभर दारू पीत हिंडतोय याची त्याला माहिती होतीच. अधनंमधनं कुठंही बाजारात गाठ पडला की, 'चार पैसे उसनं दे' म्हणायचा. आप्पाजीला चार लोकांत काहीच करायला येत नव्हतं. शरमेनं मान खाली घालावी लागत होती. पाव्हणा केला एका इराद्यानं आणि झालं भलतंच... त्याचा संताप झाला.

शिवाप्पानं उंबऱ्यात पाऊल घालताच तो म्हणाला, ''का आलाईस रं हितं घोड्याचा मूत पिऊन?''

''का म्हंजे? माझ्या लेकीकडं आलोय. तू कोण इच्चारणार?'' पाय ओढत जड जिभेनं तो बोलला. तसाच आत चालला.

''कोण इच्चारणार? खज्जाळीच्या! मागं फीर आधी.'' त्यानं शिवाप्पाला मानगुटाला धरून बाहेर ढकलला. तो रस्त्यात जाऊन कोलमडला. ''पुन्ना घरात पाय टाकलास तर पाऽपायताणानं ठोकीनं.''

''कोऽण मला ठोकणार हाय? माझ्या लेकीच्या घरात मी येणार– तारा, मला वाढ गं. कालपासानं माझ्या पोटात काय न्हाई.'' तो आत येऊ लागला.

''तुझ्या आयला तुझ्या! दीसभर दारू पिऊन हितं भाकरी मागायला आलाईस! सगळं घरदार ढांकेला लावून आता माझ्या घरावर गाढवाचा नांगर फिरवाय आलाईस व्हय? पुतळ्या काढ माझ्या आधी.''

''माझ्या लेकीच्या पुतळ्यांचं मी काय वाट्टेल ते करीन. तू इच्चारणार कोण?''

आप्पाजीचं डोसकं भणभणलं. अनेक दिवस साठलेला राग उसळला नि त्यानं सरळ पायातलं काढून त्याला दणकायला सुरुवात केली. तो रस्त्यातच आडवा पडला तरी सोडला नाही. नालाच्या पायताणासकट लाथा घातल्या.

ताराच्या डोळ्यांदेखत हे चाललेलं. तिनं तोंडात बोळा कोंबून हे सगळं

पाहिलं. त्या बारक्या जिवानं गल्लीला हाका मारून माणसं जमवली. ''या होऽ कुणी तरी. माझ्या बाऽला एवढं सोडवून घ्या. मी तुमच्या पाया पडतो. तेवढं त्येला त्येच्या घरात घालवून या. माझा बाऽ मरतोय गंऽऽ बाई आता... सोडा होऽऽ मामाजी त्येला. नका मारू. दारू प्यालाय त्यो. त्येला काय कळतंय?'' तिनं सासऱ्यासमोरच भोकाड पसरलं. हातापाया पडून सोडवून घेतलं.

पाचसात महिने पुन्हा गेले. पुतळ्या मागून मागून आप्पाजी कंटाळला. पण त्या काही परत मिळायचं चिन्ह दिसेना. हाकनाक आपण अडीच तोळ्यांच्या पुतळ्यांना बुडालो असं त्याला वाटू लागलं.

मग दुसरा उपाय सुरू झाला. त्यांनी सुनेचा छळ सुरू केला. तिच्यावर कामाचा रंटा पडू लागला. घरात खायला भरपूर असूनही तिच्या नशिबी शिळं येऊ लागलं. बारीक सारीक गोष्टीसाठी तिचा नवरा तिला मारू लागला. तिच्या पाठीवर कोयंड्याचे वळ उठू लागले. प्रत्येक वेळी ''जा म्हायारला नि आण माझ्या पुतळ्या.'' म्हणून नवरा कुचलू लागला.

त्या पोरीनं आपल्या लग्नातल्या पुतळ्या कधी पाहिल्याच नव्हत्या. ती लहान होती तोवर ''कुणी तरी हिसका मारून न्हील'' म्हणून तिच्या अंगावर घातल्या जात नव्हत्या. जरा जरा कळू लागलं तेव्हा त्या गहाण टाकल्या होत्या. पुढं त्या विकल्या गेल्या. पण त्या आणण्यासाठी मात्र जन्मभर मार खावा लागला. मार देणं ही दाल्लेपणाची खूण होती. रतनूचे हात मारायला शिवशिवत असत. बहिणींना मनासारखं मारता येत नसे. त्या नुकतीच लग्नं होऊनही गेल्या होत्या. घरच्या स्वैपाकपाण्याचा ताण तारावरच पडत होता.


ती बारातेरा वर्षांची झाली नि तिचा बाऽही वारला. उपासमारीनं नि दारू पिऊन पिऊन खंगून गेला होता. ही तीनही पोरं आता पोरकी झाली. ताराचं माहेर संपलं. चुलता चुलती नावाला होते. आता तिला मेलं तरी सासरात राहणं जरूर होतं. दोघेही भाऊ रोजगार करून, कोणाची तरी ढोरं राखत पोटं भरू लागले. कधी कधी चोरून ताराकडं येऊन भाकरी खाऊ लागले. पाटलाची ढोर राखत हिंडणाऱ्या चिरमुड्या लिंगाप्पासाठी तिचा जीव अधिक ओढ घेत होता. पण तिला फारसं काही करता येत नव्हतं. रामा तसा स्वत:चं पोट भरण्याइतका ताठर झालेला. कुठंही कामाला जाऊन तो पोट भरत होता.

पंधरा-सोळाव्या वर्षी तिला पदर आला. अठराव्या वर्षी तिला मुलगी झाली. तिचं नाव अनसूया.

म्हातारपणामुळं थकलेले सासूसासरे उत्सुकतेनं नातवाची वाट बघत होते. पण पहिली नातच झाली.

❐

आगामी




# नेव्हर टू रिटर्न


**सँडी रीड** /अनुवाद **सुनीता कट्टी**

हिरावलेल्या बालपणाची अंत:करण पिळवटून टाकणारी सत्यकथा.

समाजकल्याण खात्यानं सँडी रीडला आपल्या ताब्यात घेतलं, तेव्हा तो फक्त एक वर्षाचा होता. त्या वेळी त्याच्या आईला कल्पनाही नव्हती की, तो जन्मात परत कधी तिच्या नजरेला पडणार नव्हता.

'नेव्हर टू रिटर्न' ही स्कॉटलंडमधील टिंकर ह्या भटक्या जमातीत जन्मलेल्या सँडी रीड व त्याची मोठी बहीण मॅगी ह्यांची विलक्षण गोष्ट आहे. कोवळ्या वयात त्यांना त्यांच्या आई-वडलांपासून व विशिष्ट जीवनपद्धतीपासून दूर केल्यानंतर त्यांच्या आयुष्याची परवड झाली. एका हिवाळ्यातील रात्री समाजकल्याणखात्याच्या अधिकाऱ्यांनी भटक्या जमातीच्या ह्या लोकांच्या जंगलातील तंबूवर छापा घातला. त्यांच्या छाप्याचा उद्देश होता, त्यांच्या सगळ्यात लहान मुलांना आपल्या ताब्यात घेऊन त्यांना चांगले जीवन देणे. पण त्यांनी विचार केला होता तसे जास्त चांगले आयुष्य ह्या मुलांना मिळालेच नाही.

इंग्रजी मध्येही उपलब्ध




नवे कोरे

# मराठीतील बारामास काव्ये

**डॉ. वसंत स. जोशी**

१२०रु. पोस्टेज ३०रु.

कविवर्य ग.दि. माडगूळकर यांच्यासारखी
रसिक हृदयात विरहवेदनेची कळ उमटविणारी दीर्घ विरहगीते
मराठीत फारशी लिहिली गेली नाहीत.
स्वतंत्र निसर्ग कविताही प्राचीन कवींनी लिहिलेली दिसत नाहीत.
तथापि उत्तर भारतातील पंजाबी, राजस्थानी, गुजराती, बंगाली,
भोजपुरी, इत्यादी भाषांतून पती जवळ नसल्याने विरहाने
ग्रासलेल्या नायिकेच्या भावना व्यक्त करणारी पदे
विपुल प्रमाणात लिहिली गेली आहेत.
त्यांना 'बारामास काव्ये' असे म्हणतात.
हा लोकभाषेतील एक प्रकार आहे. आणि काही ठिकाणी
तो समूहरूपातही गायिला जातो.
त्या-त्या भाषेत या काव्यांवर अभ्यासपूर्ण समीक्षा ग्रंथ
लिहिले गेले आहेत.
त्या दृष्टीने मराठीतील अशा विरहगीतांचा शोध धुळ्यापासून
तंजावरपर्यंतच्या ग्रंथसंग्रहांतून घेतला
तेव्हा फार थोडी काव्ये उपलब्ध झाली.
तीच प्रस्तुत संग्रहात समाविष्ट केली आहेत.
रसिकांपुढे हा अल्पज्ञात अभिनव काव्यप्रकार ठेवण्याचा एक
अभ्यासपूर्ण प्रयत्न.




*** ज्येष्ठ कवी ग्रेस**

साहित्य अकादमी पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी ग्रेस यांचे आजारपणामुळे २६ मार्च रोजी सकाळी पुण्यात निधन झाले. गेले काही दिवस घशाच्या कर्करोगाने आजारी असणाऱ्या ग्रेस यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचारांदरम्यान अखेरचा श्वास घेतला. १० मे १९३७ साली नागपूरमध्ये जन्म झालेल्या माणिक सीताराम गोडघाटे उर्फ ग्रेस हे अनेक कवितासंग्रहामुळे चर्चेत आले. १९६८ साली त्यांना 'संध्याकाळच्या कविता' या संग्रहासाठी महाराष्ट्र शासनाचे कवी केशवसुत पारितोषिक मिळाले तर 'वाऱ्याने हलते रान' या ललितसंग्रहाला २०११ सालचा 'साहित्य अकादमी पुरस्कार' जाहीर झाला होता.

संध्याकाळच्या कविता, राजपुत्र आणि डार्लिंग, सांध्यपर्वातील वैष्णवी, सांजभयाच्या साजणी, चंद्रमाधवीचे प्रदेश हे त्यांचे काही गाजलेले कविता संग्रह तर चर्चबेल, मितवा, संध्यामग्न पुरुषाची लक्षणे, मृगजळाचे बांधकाम, कावळे उडाले स्वामी हे त्यांचे गाजलेले ललित लेखसंग्रह होते.

घर थकलेले संन्यासी, ती गेली तेव्हा, निष्पर्ण तरूंची राई, मरण या त्यांच्या गाजलेल्या कविता रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील.

भावगंधर्व हृदयनाथ मंगेशकर कविवर्य ग्रेस यांच्या काव्याचे वैशिष्ट्य सांगताना म्हणाले, ग्रेसांच्या बोलण्याला माझे संगीत अस्तर आहे. आम्ही कार्यक्रमापूर्वी कधीही भेटत नव्हतो. चर्चाही करीत नव्हतो. कार्यक्रमाची सहजता यामुळेच टिकून असते. कविवर्य ग्रेस यांना दुर्बोध म्हणून संबोधले जात असले तरी त्यांच्या कवितेत सारे सूर आहेत. त्यांच्या कविता म्हणजे बारा सुरांची भैरवी. महाराष्ट्रात एकच प्रतिभावंत आहे. ते दुर्बोध नाही, आपण दुर्बोध असल्याचे महेश एलकुंचवारांनी

म्हटल्याची आठवण यावेळी पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी सांगितली. संवेदनशील मनावर सुर पडला की, तो प्रत्ययकारी असतो. ग्रेस यांच्या कवितातही सर्व सूर आहेत. मला चाल लावताना त्यांची कविता कधी अवघड वाटली नाही, असे ते म्हणाले.

❐


**सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता**

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net


## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरुर आणावे
ही नम्र विनंती.




Dear Ms. Shaligram,

I read your Marathi translation of 'Ayodhyecha Ravan aani Lankecha Ram' .

It's a great book with an altogether different perspective.

I tried to contact the auther Mr. Joshi on his cell number but could not get him.

The translation done by you is excellent.

I have also ordered other books such as 'Mahabharatil Matruvandana' & 'Mahabharatatil Pitruvandana' written by Mr. Joshi & translated by you.

Datta Damodar Naik, Margoa, Goa

---

मा. अशोक पाध्ये


आपण अनुवादित केलेले ॲलिस्टर मॅक्लीन यांचे ‘द डार्क क्रुसेडर’ हे पुस्तक वाचले आणि आपल्या ओघवत्या अनुवाद शैलीने भारावून गेलो.

ॲलिस्टर मॅक्लिन यांचे अद्भूत रहस्यमय जग तुम्ही मराठी वाचकांसाठी खुले केले. अन्यथा इंग्रजीमधील हे साहित्य आम्हाला अनुभवता आले नसते. त्याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत.

‘द गोल्डन रॉन्देव्हू’ आणि ‘द गोल्डन गेट’ ही पुस्तके चंद्रपुर येथील साहित्य संमेलनात विकत घेऊन वाचली व ती खूप आवडली.

सुनील काटकर, चंद्रपूर

**नवे कोरे**




१२०रु. पोस्टेज ३०रु.

# आय एम अ टॅक्सी

**डेबोरा एलिस**

अनुवाद

**मेघना ढोके**

काळीकुट्ट रात्र...
मिट्ट काळोख आणि घनदाट जंगल;
पायाखालची अनोळखी वाट तुडवत दिएगो चालत होता.
तो कुठं जातोय, काय करणार याची त्याला काही कल्पना नव्हती. जंगलातून माकडांच्या भयाण किंकाळ्या कानावर पडत होत्या, बेडकांचे कर्कश्य डरॉंवऽ डरॉंवऽ ऐकून पोटात कालवत होतं. हे असं भयाण जंगल त्यानं आजवर कधी पाहिलंही नव्हतं.
पहाडी भागातला हा मुलगा, दऱ्याखोऱ्यात त्याचं लहानसं कुटुंब.
पण काळानं असा काही घात केला की,
सारं कुटुंबच तुरुंगाच्या चार भिंतीआड बंदिस्त झालं.
दिएगोही तुरुं०गातच राहायचा, शहरातल्या तुरुंगात.
शहरभर पायाला चाकं लावून फिरायचा. त्या तुरुंगात रात्र झाली तरी दिवस सरायचा नाही, रात्रभर तुरुंगातले दिवे उजळायचे, पहारेकरणी काठ्या आपटत इकडून तिकडे फिरायच्या, कोठड्यांच्या दारांना घातलेली कुलुपं उघडायची – बंद व्हायची.
चाव्यांचा किलकिलाट कानावर पडायचा. त्यात तुरुंगातली कच्ची-बच्ची रात्री भोकाड पसरायची, कैदी म्हणून जगणाऱ्या त्यांच्या आयाही ओरडायच्या, रडायच्या.

# बालनगरी

**भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी**

**मंत्रावळी सुपारी**

(मागील अंकावरून)

रामभरोसे भेळवाल्याच्या गाडीकडे बघताच तेजाला भुकेची जाणीव झाली.

'दोन रगडापुरी.' तेजाने थाटात मागणी नोंदवली.

त्या गरमागरम पुऱ्या अख्ख्या तोंडात कोंबायची कसरत करता करता ओमने विचारले, 'मंत्रावळी कधी खायच्या? त्या फार चविष्ट असतात का?'

'फुस्स..' करून तेजाच्या तोंडातली पुरी आणि रगडा बाहेर उडाला. तिला ठसका बसला. तो आणि हसू कसेबसे आवरून ती म्हणाली. 'आधी हे तर खाऊन घे. मग मी तुला दाखवते ती कशी खायची.'

ओम रगडा पुरीची चव विसरला. भरभर तोंडात कोंबून त्याने त्या संपविल्या. तेजाचा खायचा वेग गाठणं तरीही त्याला अशक्य होतं. मग ती त्याला गर्दीतून एका बाजूला घेऊन गेली.

'मला आई एकदा तिथे घेऊन आलेली तेव्हा मी जी मंत्रावळी चावली ना, ती वायुतत्त्वाची होती. तुला तत्त्वे माहीत आहेत ना? जमीन, हवा, पाणी, आग आणि आकाश.' ओमने मान डोलावली. आज पहिल्यांदा तो तेजाच्या तोंडून तिच्या घरच्यांचा उल्लेख ऐकत होता. त्याची आई ही त्याला तिथे घेऊन येत असे. आया सगळ्या सारख्याच असतात तर! ते ऐकून त्याला बरे वाटले.

तेजाने एक मंत्रावळी जपून काढून त्याच्या हातात दिली. 'गिळू नकोस. मी सांगेपर्यंत अजिबात बोलू वा तोंड उघडू नकोस.'

ओम तो छोटा तुकडा चघळू लागला. त्याचे तोंड एका अवर्णनीय सुवासाने भरून गेले. त्या सुवासाने त्याच्या डोक्यात कसलेतरी तरंग उठू लागले. अगदी हलके, हलके वाटू लागले, जणू आपण तरंगतोय. एखाद्या मंत्राचा जप तोंडात चालू आहे असे त्याला वाटू लागले.

तेजाने त्याचा हात घट्ट धरला होता. बंड्या जमिनीवरून सुटला आणि तिने त्याला परत जमिनीवर टेकवले. ती उत्तेजित सुरात चित्कारली, 'हे सुद्धा मरुत मंत्र आहेत. मी ना तेव्हा लांबून वेतोबाच्या घुमटीवरली दिवटी विझवली होती. माहिताय?''

ओमने हाताने मी काय करू आता अशी पृच्छा केली.

'तू पण काहीतरी विझव ना!' तिने आजूबाजूला पाहिले. समोरच गांधीजींच्या पुतळ्यावर मोठ्ठे, प्रकाशझोत सोडलेले. 'ते गांधीजींवरचे दिवे विझव.'

'कसे?' ओमने पुन्हा हात फिरवले.

'मनात तसा विचार कर आणि फुंक मार त्यांच्यावर.'

ओमने तसे केले. एकदम आपल्या नाका-कानातून जोरदार वारे गेल्यासारखे त्याला वाटले. समोर काही घडले नाही. त्याने पुन्हा खुणेने विचारले.

'थोडा वेळ जाऊ दे रे. ती सुपारी लक्ष जप आपोआप पुरे करते. जसजसा जप पुरा होत जाईल, आपले काम होत जाते.' तेजाने त्याला धीर दिला.

तो आतुरतेने समोर पाहू लागला. थोड्या वेळाने एक झोत बंद पडला. ही जादू आपण केली आहे यावर ओमचा विश्वास बसत नव्हता. तो निव्वळ योगायोग असावा. म्हणता अजून एक झोत विझला. जसजसा मंत्र पुढे जाऊ लागला, पुतळ्यापाशीचे रोषणाईचे दिवे हळूहळू मंद होऊ लागले. एक एक करत ते विझत गेले. एकामागून एक दिवे विझत काळोखाचे साम्राज्य आजूबाजूला फैलावू लागले आणि त्याच्यामागोमाग गोंधळ. ओमला तोंडातला जप थांबवता येईना. थोड्याच वेळात परिसरात युद्धाच्या वेळी ब्लॅक आऊट असतो तसा मिट्ट अंधार पसरला.

'ओम, सुपारी गिळ.' तेजा त्याच्या कानाशी फिस्कारली. ओम सुपारी गिळतच होता आणि त्याच्यापासून काही अंतरावर कोणीतरी लायटरने विडी पेटवायचा प्रयत्न केला. काळोखात त्या लायटरच्या प्रकाशाने त्याच्या उजळलेल्या चेहऱ्याने, नेमके दोघांचे लक्ष वेधून घेतले. पुढच्या क्षणी सारा आसमंत प्रकाशाने पुन: उजळला आणि साऱ्यांचे डोळे दिपून गेले.

'जाड्या.' ओमचा आवाज थरथरला. लाल शर्टातला अक्राळविक्राळ राक्षस. त्याच्यापासून जेमतेम वीस हातावर उभा होता, विडी शिलगावत.

'जाड्या.' तेजाचा आवाज थरथरला. भीतीने नव्हे. रागाने. कधीचे तिचे हात त्याच्याशी दोन हात करायला
शिवशिवत होते.

तिची कुपी तिला परत मिळवायची होती, 'आता तू माझ्या तावडीतून सुटणार नाहीस. ओम चल.' ती ओमचा हात धरून त्याला जाड्याच्या दिशेने खेचू लागली.

'तो आपल्या दोघांना मारून टाकेल.' ओम तिला विरोध करत बोलला.

'तू बघच आता, मी त्याला कसा सरळ करते!' तीची नजर त्याच्या गळ्यात चमचमणाऱ्या कुपीकडे लागली होती. तिने एक मंत्रावळी तोंडात टाकली. तीच्या चेहऱ्यावर क्रुद्ध भाव होते. ती थरथरू लागली. ती आता जमिनीवरून सुटेल याची जाणीव होताच ओमने तीचा हात गच्च धरून ठेवला. जाड्या ओली झालेली विडी शिलगवायचा प्रयत्न करत होता.

ही तेजा त्याचा लायटर विझवून काय मोठ्ठासा तीर मारणार आहे? तेजाने फुंकर घालायला आणि जाड्याने लायटर पेटवायला एकच गाठ पडली. भक्कन तिथे मोठा जाळ झाला. अख्खीच्या अख्खी विडी क्षणार्धात पेटून गेली. जाड्याला चांगला चटका बसला असेल! त्याहीपेक्षा विडीचा धूर एकदम छातीतल्या धूराने घुसमटू लागला. थरथर जागच्या जागी उलटसुलट नाचू लागला.

'ओमऽऽ कुपीऽऽ आणऽऽ.' तेजा तारस्वरात किंचाळली.

ओम बेभान झाला. जाड्याची ही गलितगात्र अवस्था पाहून वाटणारी सारी भीती नाहीशी झाली. तो मात्र एक माणूस होता, राक्षस नव्हता.

ओम आवेशाने जाड्याकडे झेपावला. जाड्याच्या शर्टावर पकड घालत जाड्याच्या गळ्याकडे झेप घातली आणि कुपीला हात घातला.

इकडे तेजा किंचाळली आणि मंत्रावळीचा जप बंद पडला. आत कोंडला गेलेला सारा धूर, जाड्याच्या नाकातोंडातून बाहेर पडू लागला. तो ठसके काढू लागला. त्या ठसक्याच्या जोराने ओम दूर उडाला. ओमच्या हातात हिसकावलेली कुपी होती. जिवाच्या आकांताने जाड्या ओमवर झडप घालून कुपी खेचू लागला. आपला त्याच्यापुढे फार काळ निभाव लागणार नाही हे लक्षात येताच ओमने ती तेजाकडे फेकली. ती तेजापर्यंत पोहोचली नाही. एक माल भरलेला टेम्पो त्यांच्यामधून पसार झाला. त्यात कुठेतरी ती...



जाड्याची नजर कुपीमागोमाग धावली. त्याचे लक्ष विचलीत झालेले पाहून ओम हिसडा मारून पकडीतून सुटला.

जाड्याने पळता पळता त्याचे बखोट धरले. तोच तेजा त्याच्यासमोर पोहोचली. तिने घाईघाईने तिसरी मंत्रावळी तोंडात टाकली आणि जाड्यावर फुंक घातली. ती ओमला जाड्यापासून दूर खेचू लागली.

तेजाने ओमला जाड्यापासून वेगळे केले. त्याचा हात धरून गर्दीतून वाट फुटेल तिथे ती पळत सुटली.

झिमझिमणारा पाऊस आता सरसरू लागला होता. दोघांची अंगे पाण्याने पूर्ण भिजून गेली होती. जाड्याने त्यांचा पाठलाग करायचा प्रयत्न केला. कोणाची तरी चाहूल लागल्याने दोघे धापा टाकत पुन्हा पळू लागले.

अचानक शाळेची पिवळी बस आली. तेजा आपला परवलीचा ओरडली. बस पुढे जाऊन थांबली. तेजा धडाडत तिकडे गेली. एक पाय दारात ठेवून ओमला चल चल खुणावू लागली. बसवाहकाने डोके बाहेर काढून पाहिले आणि दारावर थाप ठोकली. बस चालू झाली. ओमला मागच्या बाजूने कोणाचे हात लागले. बेभानपणे आठवली ती सारी सारी मंत्राक्षरे म्हणत ओम बसच्या दारापाशी पोहोचला. कोणीतरी त्याला दोन हातांनी उचलून घेतले. तो कितीतरी वेळ वेड्यासारखा रडत राहिला. कोणीतरी त्याचे गदगदणारे अंग आणि डोके मांडीवर घेऊन त्याला शांत केले.

'ते काय?' बसमधल्या माणसाने कुठेतरी बोट दाखवले.

'बघ, तिकडे!'

'हो.' बसमधले लोक बस पुतळ्यापाशी येऊन वळली तेव्हा समोरचे विचित्र दृश्य पाहू लागले. एका माणसाच्या कपड्यांमध्ये जणू हवा भरली होती. तो हवेत तरंगत होता.

'आयला.' तेजाने एकदम जीभ चावली. त्याबरोबर तो जाडा माणूस खाली पडला.

बसमधले सगळे तेजाकडे चमकून पाहू लागले. तिने क्षणात स्वतःला सावरले आणि आपण जणू त्या गावचेच नाही असे दाखवत ती ओम जवळ गेली.

'ओम रडू नको. तो दारूडा आता इथे येणार नाही. आपण सुखरूप घरी पोहोचू.'

मग तिने सांग्रसंगीत अमुदि वाचनालयातून बाहेर पडल्यावर एक दारूडा कसा आपल्या मागे लागला होता आणि त्याने आपला मुका

घ्यायचाही कसा प्रयत्न चालवलेला वगैरे वगैरे कहाणी त्या थोर लोकांना सुनावली. या बसमध्ये लहान मुले नव्हती. सर्व मोठी माणसे होती. ओम मुसमुसताना तीचे बोलणे कानात साठवत होता आणि आपल्याला काय भूमिका घ्यायचीय ते ठरवत होता.

'पण तुमचा पाठलाग करत होता तो दारूडा लाल कपड्यात नाही, निळ्या कपड्यात होता आणि जाडा नाही खूप बारीक, उंचसा होता.' बसवाहक शांतपणे म्हणाले.

ओम सर्द झाला. तो 'तो' नव्हता तर तो 'तो' होता. त्याचे रडे थांबले आणि तो मांडीवरून डोके उचलून सरळ होऊन त्या भगवी कफनीवाल्या दाढीदीक्षितांच्या शेजारी बसला. त्यांचा स्पर्श प्रेमळ होता आणि ते त्याला थोपटत होते. शांत शांत वाटत होते. दाढीदीक्षितांनी त्यांचे हिरवे डोळे थोडा वेळ ते मिटून घेतले. उघडल्यावर ते पुन्हा प्रसन्नपणे हसले.

'हि मुले जिवावरच्या संकटातून वाचली आहेत. नाही का हो औदुंबरायण?' त्यांचा धीरगंभीर आवाज घुमला.

'होय कुलगुरू.' डोक्याला लाल पागोटे गुंडाळलेल्या गृहस्थांनी दुजोरा दिला.

तेजा थिजली. साक्षात कुलगुरू संसारनाथ (विसाव्वे) यांच्यासमोर ती होती. तिची बोलती बंद झाली. ओमला मात्र हे सर्व लोक कोण आहेत याचा अंदाज नव्हता. ते कोणीतरी साबरी लोक होते. तो आता सुखरूप होता. आनंदाची गोष्ट म्हणजे तो साबरी शाळेच्या बसमध्ये चढू शकला होता.

त्याने बसचे अंतरंग कुतूहलाने निरखले. बसमध्ये दहा बारा मोठी माणसे होती. त्यांनी पायघोळ कफन्या घातल्या होत्या. त्यांच्या गळ्यात, हातात रूद्राक्षांच्या माळा होत्या. बहुतेकांच्या दाढीमिश्या, जटा वाढलेल्या होत्या. काहींच्या पांढऱ्या होत्या.

ते सारे ओमकडे कुतूहलाने पाहत होते. तेजाकडे नव्हे. तिच्याकडे कोणी लक्ष देत नव्हते, याबद्दल ती खूष होती. रस्त्यात नको ते पराक्रम करताना शाळेच्या शिक्षकांसमोर पकडले जायला कोणा विद्यार्थ्याला

आवडेल?

भीती संपल्यावर ओम विचार करू लागला. त्याचा परवलीचा? तो त्याला हवा होता. ज्याच्यामुळे बस त्याच्यासाठी थांबली तो अक्षरांचा क्रम. ती दांडगोबा तेजा तो व्यवस्थित लक्षात ठेविल याची काही हमी देता येत नव्हती. स्वतःचा क्रम सुद्धा ती कितीतरी वेळा उलट सुलट करून ठेवत असे. भले तर बसमध्ये सगळे लोक त्याला हसले तरी चालतील. कोणत्याही किंमतीवर तो आता परत हरवता कामा नये. बसवाहकाने तो ऐकला असणार म्हणून तर त्याने बस थांबवली. ओम त्याच्याकडे वळला, 'मी तुम्हाला काय हाक मारू?'

'माझे नाव शांतभैरव.' धिप्पाड शरीराचा बसवाहक उत्तरला.

'शांतभैरव काका, तुम्ही माझा परवलीचा ऐकला.'

'होय.'

'तुम्ही मला त्याचा... अं! म्हणजे माझा.. अं! म्हणजे तो काय होता सांगाल का जरा?'

शांतभैरवाने ओठांचा चंबू केला. त्याला हा प्रश्न फार विचित्र वाटला होता. ओमला त्याची कल्पना होती. 'म्हणजे मी ना... मी ना त्याचा क्रम विसरून गेलोय.' आपली चूक कबूल करताना ओमला शरम वाटत होती.


'मुला तुला हा क्रम कशाला हवाय?' त्याच्या शेजारी बसलेल्या कुलगुरूंनी प्रश्न केला.

'मी तो विसरलोय ना, म्हणून शाळेची बस मला आत घेत नाही. माझा परवलीचा कोणाला ऐकू येत नाही.'

(क्रमशः)


समीर बागायतकर, वेंगुर्ला
९८६०४९८८६२
इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in

## चित्र रंगवा



# ओळखा पाहू

## सांध्यपर्वात रंगलेला मराठीतील प्रतिभावंत कवी



विजेत्यास २००रु. किंमतीचे पुस्तक भेट म्हणून पाठवण्यात येईल

आपली उत्तरे दिनांक १५ मे २०१२ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल जून २०१२ च्या अंकात जाहीर होईल.

## 'फेब्रुवारी' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

४थ्या विश्वसाहित्य संमेलनाचे अध्यक्ष - ना. धों. महानोर

स्पर्धेचे विजेते - **सागर महाडिक - उस्मानाबाद**

साक्षी कुलकर्णी, साधना दुसाने, श्रावणी साळुंके - कोल्हापूर, रा. द.ढुमणे, यश चव्हाण, तन्मय काकडे, सुजाता वेळे, मिनाक्षी पारखी, अमिता गाढवे, राजू चिंचोळे, साहिल मुसळे, नीला चितळे, प्रतिभा मुरकुटे, चित्रा साठे, - पुणे, आशोक साळे, संगीता कुलकर्णी, सुरेखा हावळ, अनघा विभुते - कोल्हापूर, अनिरुद्ध पाटील- यवतमाळ, अश्विनी भोसले, - सांगली, शोभा ढेपे, अंजू सराफ, रामचंद्र धर्माधिकारी, अंजली जोशी , सुरेश पवार- अहमदनगर, लता विद्वांस - इन्दौर, प्रज्ञा घोडेस्वार, चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, राहूल जाधव, संतोष पाटील - सातारा, सुधिर भिडे, राजू जोशी - नाशिक, संजय मुळे, शिवमंगल चव्हाण - अमरावती,

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत

**एक वर्षाला २०%   तीन वर्षांना २५%   पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच**
**वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'लोखंड खाणारे उंदीर'** आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका - वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'**
आणि **'चला जाणून घेऊ या प्रार्थना'**
प्रत्येकी ४०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.













भेट पुस्तके
प्रती शिल्लक
असेपर्यंतच


**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 April. 2012

# New Book

## Tamil Tigress




Niromi de Soyza
Price Rs. - 395/

Two days before Christmas in 1987, at the age of 17, Niromi de Soyza found herself in an ambush as part of a small platoon of militant Tamil Tigers fighting government forces in the bloody civil war that was to engulf Sri Lanka for decades. With her was her lifelong friend, Ajanthi, also aged 17. Leaving behind them their shocked middle-class families, the teenagers had become part of the Tamil Tigers' first female contingent. Equipped with little more than a rifle and a cyanide capsule, Niromi's group managed to survive on their wits in the jungle, facing not only the perils of war but starvation, illness, and growing internal tensions among the militant Tigers. And then events erupted in ways that she could no longer bear.

How was it that this well-educated, mixed-race, middle-class girl from a respectable family came to be fighting with the Tamil Tigers? Today she lives in Sydney with her husband and children; but Niromi de Soyza is not your ordinary woman and this is her compelling story.

---

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,
_______________
_______________
_______________
_______________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.